सोलापूर तरुण भारत
आसमंत

भारतीय संस्कृतीची मशागत होण्यामध्ये रामायणाचा सिंहाचा वाटा आहे. दुसरे असे की, ही विजय गाथा आहे. धर्माचा अधर्मावर, सद्गुणाचा दुर्गुणावर, सन्नीतीचा अनीतीवर विजय रामायणात आहेच; पण तो केवळ शस्त्रसामर्थ्याने नाही तर श्रेष्ठ सदाचरणाने प्राप्त झाला आहे. त्यामुळे युगानुयुगे रामायणातून सदाचरणाची प्रेरणा मिळत आली आहे. जडण घडण मर्यादा पुरुषोत्तमांची समजून घेऊ...

# मर्यादा पुरुषोत्तम

प्रासंगिक

डॉ. साधना कुलकर्णी



आज श्रीराम नवमीचा, प्रभू श्रीरामाचे जो तो आपल्या परीने श्रीरामाची उपासना करीत आहे. प्रभू श्रीरामाला भारतीय जनमानसात अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'रामायण' या महाकाव्याची निर्मिती त्रेतायुगात झाली. त्यानंतर द्वापार युग सुरू झाले आणि आता आपण कलियुगात आहोत. पण आजही रामायणाचे गारुड तसेच आहे; किंबहुना ते वाढताना दिसत आहे. याचे काय कारण असावे? भारतीय संस्कृतीची मशागत होण्यामध्ये रामायणाचा सिंहाचा वाटा आहे. दुसरे असे की, ही विजय गाथा आहे. धर्माचा अधर्मावर, सद्गुणाचा दुर्गुणावर, सन्नीतीचा अनीतीवर विजय रामायणात आहेच; पण तो केवळ शस्त्रसामर्थ्याने नाही तर श्रेष्ठ सदाचरणाने प्राप्त झाला आहे. त्यामुळे युगानुयुगे रामायणातून सदाचरणाची प्रेरणा मिळत आली आहे. तिसरे कारण म्हणजे रामायणातील पात्रांनी आदर्शांचे मापदंड प्रस्थापित केले आहेत. हे आदर्श आणि सिद्धांत काळाच्या प्रत्येक लाटेच्या कसोटीवर खरे उतरले आहेत. त्यामुळे आजही रामकथा कालसुसंगत आहे. चौथे कारण म्हणजे रामराज्य हे मूल्यांचे राज्य आहे. कर्तव्याच्या तुलनेत वैयक्तिक मोह, भावना, प्रेम यांना महत्त्व न देता, केवळ प्रजाहिताला या राज्यात प्राधान्य दिले आहे. आजच्या काळात अशा रामराज्याच्या स्मरणानेही समाजाला आत्मिक समाधान लाभते. पाचवे कारण म्हणजे प्रभू श्रीराम ही एक व्यक्ती किंवा ईश्वर नाही तर राम ही वृत्ती आहे, विचार आहे, आचरण आहे. एवढेच नाही तर राम हे तत्त्व आहे. असा हा राम प्रत्येकाच्या हृदयात असतो. रामकथेत तो 'आत्माराम' जागृत करण्याची शक्ती आहे. त्यामुळे रामायण हे भारतीयांच्या रक्त मांसपेशीत रुजले आहे आणि पिढी-दर- पिढी ते त्याच उत्कटतेने झिरपते आहे.

आचार्य विनोबा भावे म्हणतात, 'माझा राम आधी विश्वनंदन आहे आणि मागाहून दशरथनंदन आहे.' रामायणातील सगळी पात्रे आपल्याला खूप जवळची वाटतात. यातील राजस्त्रियांच्या चरित्रात डोकावून बघितले तर स्त्रीशक्तीची असामान्य रूपे आपल्याला स्तिमित करतात. मातृशक्ती, त्याग, समर्पण, निष्ठा, संयम इत्यादी गुणांचा उत्तुंग आविष्कार म्हणजे रामायणातील स्त्रिया. रघुकुलातील राजांनी शस्त्रसामर्थ्याने रणभूमीवर विजय मिळविला. त्याच वेळी या राजस्त्रियांनाही अनेक लढ्यांना सामोरे जावे लागले; तेही राजमहालाच्या चार भिंतीत आणि शस्त्रांशिवाय. कुणी वासनांध वृत्तीशी, कुणी विश्वासघाताशी, कुणी संशयपिशाच्चाशी, कुणी उपेक्षेशी तर कुणी नियतीच्या अगम्य खेळीशी लढा दिला आहे. ही लढाई त्यांना कधी आप्तस्वकीयांशी तर कधी स्वतःशीही करावी लागली आहे. या युद्धात धैर्य, संयम, विवेक, मर्यादा, पातिव्रत्य, श्रद्धा या शस्त्रांद्वारे त्यांनी यश मिळविले आहे. या विजयाची नोंद घेणे अत्यंत गरजेचे आहे. कारण रामायणाची उत्तुंगता या राजस्त्रियांमुळे कमालीची उंचावली आहे.

वास्तविक, या प्रत्येक राजस्त्रीच्या ललाटावर नियतीने एका अटळ व्यथेचा शिक्का मारून ठेवला आहे. प्रत्येकीच्या राजवैभवी जीवनाला वेदनेची किनार आहे. राणी कौसल्या, कैकेयी आणि सुमित्रेला सुरुवातीला अपत्यहीनतेचे शल्य उरात बाळगून जगण्याला सामोरे जावे लागले. यात नियतीचा काय हेतू असावा? पुढे स्वतःच्या गुणांनी रमवणारा आणि ज्याच्या कथेत योगी रमतात असा राम, सुलक्षणांनी युक्त लक्ष्मण, विश्वाचे भरणपोषण करणारा भरत आणि शत्रूंचा नाश करणारा शत्रुघ्न अशा चार अलौकिक आणि दिव्य पुत्रांची प्राप्ती तीनही राण्यांना झाली. हे चारही पुत्र यथावकाश राजनीती, युद्धनीती, प्रजा धर्म, कर्तव्यनिष्ठा यांचे धडे ऋषिवरांच्या मार्गदर्शनात गिरवत होते. त्याच वेळी त्यांच्यातला ऋजू, समंजस, सात्त्विक, प्रेमळ, संयमी, निश्चयी असा माणूस घडत होता तो त्यांच्या तीनही मातांच्या संस्कारांमुळे. सद्गुणांनी परिपूर्ण अशा पुत्रांची जडणघडण, ज्यांना आज आपण भावनिक बुद्ध्यांक किंवा 'सॉफ्ट स्किल्स' म्हणतो; त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. बालवयात पुत्रांवर या उन्नत भावनांचे रोपण करण्याचे श्रेय या तीनही मातांचे आहे.

रामायणातला हा एक अतिशय महत्त्वाचा पैलू आहे. वाल्मीकि रामायणात रामाचे ७२ गुण सांगितले आहेत. राणी कौसल्या ही मातृत्वाचे प्रतीक म्हणून नेहमीच गौरवली जाते. तिरुपती बालाजी मंदिरात देवाला जागे करताना 'कौसल्या सुप्रजा रामा, पूर्वा संध्या प्रवर्तते' या भूपाळीमध्ये पहिला उल्लेख कौसल्या मातेचा आला आहे. वनवासाला जाणाऱ्या रामाला बघून ती कोसळते, उन्मळून पडते; पण रामानेच समजूत घालून तिला शांत केले आहे.

राजधर्म आणि कुलधर्माचे भान ठेवून ती कमालीच्या धैर्याने या प्रसंगाला सामोरी गेली. कैकेयीचा अपराध तिने शांतपणे पोटात घातला. संतप्त झालेल्या भरताला तिने आत्मीयतेने, प्रेमाने कर्तव्याची जाणीव करून दिली. रामाला तिने १४ वर्षे आपल्या नजरेत साठवून ठेवले असून वनवासातल्या रामाला तिच्या दिव्यदृष्टीतून प्रेम आणि बळ मिळाले आहे. म्हणूनच रामरक्षेत **'कौसल्येयो दृशोः पातु'** असे म्हटले आहे. राणी कैकेयी ही युद्धनिपूण, बुद्धिमान आणि निग्रही आहे. राजा दशरथाला तिने अनेकदा राज्य कारभारात योग्य सल्ला दिला. तिचे श्रीरामावर भरतापेक्षाही अधिक प्रेम आहे. रामाच्या राज्याभिषेकाच्या वार्तेने ती आनंदून गेली आहे. अशा वेळी या असामान्य राजस्त्रीला मत्सराची बाधा कशी होऊ शकते, हा प्रश्न नेहमीच पडतो. पण याचे उत्तर कैकेयीच्या आईमध्ये तर दडले नसावे? राजा अश्वपती आणि शुभलक्षणा यांची ही कन्या.

राजा अश्वपतीला पक्ष्यांची भाषा अवगत होती, पण त्यांचे संभाषण कोणालाही सांगण्याची त्याला अनुमती नव्हती. हे संभाषण सांगितल्यास अश्वपतीचा मृत्यू अटळ होता. एकदा राणी शुभलक्षणाने हे संभाषण सांगण्याचा हट्ट राजाजवळ धरला. या हट्टापायी माझा मृत्यू होऊ शकतो, असे राजाने तिला समजावून सांगितले. तेव्हा राणीचे उत्तर होते, 'मग तुम्ही मरा, पण मला संभाषण सांगा.' अश्वपती राजाने अशा राणीचा त्याग केला आहे. त्यामुळे कैकेयीला मातृसुख मिळाले नाही. पण कदाचित आईचा आततायी, अविवेकी स्वभाव तिच्यात उतरला असावा का? अर्थातच रामायण घडण्यासाठी कैकेयीचा मत्सरभाव जागृत होणे हे विधिलिखितच होते. पण नंतर काही काळाने आपल्या कृत्याचा तिला पश्चात्तापही झाला आहे. महत्त्वाचे हे की, या प्रसंगामुळे भरताने कैकेयीची निर्भर्त्सना केली आहे. मात्र, रामाच्या मनातील तिचे स्थान अजिबात डळमळीत झालेले नाही. कायम सन्मार्गाने जाणारी ती राणी सुमित्रा. सौमित्र तिचा पुत्र. पण त्याआधी तो रामाचा उजवा हात, रामाचा बहिश्चर प्राण आणि रामाची सावली आहे, हे ती जाणून आहे. त्यामुळे रामासोबत वनवासात जाण्याच्या निश्चयापासून ती लक्ष्मणाला परावृत्त करत नाही. रामाचे संरक्षण करण्याची क्षमता लक्ष्मणातच आहे, हे तिला पक्के ठाऊक आहे. कर्तव्य आणि ममता यांच्यात निवड करायची झाल्यास ममतेला मागे सारणे हा सुमित्रेचा स्वभाव लक्ष्मणातही पूर्णतः उतरला आहे. विवेकी आणि खंबीर असलेली सुमित्रा राजमहालाच्या एका अभेद्य भिंतीप्रमाणे कुटुंबीयांना आधार देत राहिली. पुत्रवियोगाने राजा दशरथाचे प्राण गेले, पण तीनही राण्या पुत्रवियोग आणि पतिवियोग होऊनही चिवटपणे झुंज देत राहिल्या. श्रीरामांच्या अस्तित्वातून स्वतःची शक्ती एकवटत राहिल्या. लक्ष्मणाची पत्नी उर्मिला ही सीतेची लहान बहीण आहे. श्रीराम आणि लक्ष्मण यांच्यातील अद्वैत समजून घेणे आणि ते पचवणे हे उर्मिलेतील पत्नीला किती अवघड झाले असेल? सीतेप्रमाणे तीदेखील वनवासात जाण्याचा हट्ट करू शकली असती, पण तिने तसे केले नाही. वनवासात श्रीराम आणि सीतेचे रक्षण करण्याचे लक्ष्मणाचे कर्तव्य आहे, हे ती जाणून आहे आणि त्या कर्तव्याच्या आड येण्याचे संस्कार तिच्यावर नाहीत. उर्मिलाच्या मूकसंमतीची खात्री असल्यामुळे तिचा पाठिंबा हे लक्ष्मणाचे बळ आहे. लक्ष्मण आणि उर्मिलेमधील अव्यक्त असे परस्पर सामंजस्य हे खरे त्यांच्या नात्याचे बलस्थान आहे. उर्मिलेने महालात राहून वनवास भोगला आहे. रामायणाची महानायिका म्हणजे सीता. 'सहचारिणी' हे नाते तिने सर्वोच्च उंचीवर नेऊन ठेवले. श्रीरामाबरोबर सीता काया, वाचा, मन आणि आत्म्याच्या स्तरावर एकरूप झाली आहे. श्रीराम वनवासाला निघाले त्यावेळी वसिष्ठ ऋषींनी सीतेला राजगादीवर बसण्याची सूचना केली होती. यावरूनच तिचे सामर्थ्य लक्षात येते. वनवासात अनेक तात्त्विक मुद्द्यांवर सीता आणि श्रीरामाच्या चर्चा झाल्या आहेत.

(पान ४ वर)

# मुस्लीमही 'वक्फ' घोटाळ्यांचे बळी!

निमित्त...

हर्ष रंजन

केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी बहुचर्चित वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत सादर केले. या विधेयकावर दुपारपासून ते मध्यरात्रीपर्यंत झालेल्या दीर्घ चर्चेनंतर मतदानामधून अखेरीस वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभेत पारित झाले. यावेळी या विधेयकाच्या बाजूने २८८ तर, विरोधात २३२ मते पडली. हे विधेयक लोकसभेत पारित होणे हे केंद्रातील मोदी सरकारसाठी मोठे यश मानले जाते. लोकसभेनंतर राज्यसभेतही वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाले. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल. राष्ट्रपतींची मंजुरी मिळताच त्याचे कायद्यात रूपांतर होईल. आता ठराविक समुदायामध्ये सरकारविरुद्ध वातावरण निर्माण करून स्वतःचे राजकीय मनसुबे पूर्ण करण्याचे विरोधी पक्षाचे प्रयत्न यापुढे यशस्वी होणार नाहीत, हे मात्र नक्की.

'वक्फ'मध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या भ्रष्टाचारामुळे मुस्लीम समुदायातसुद्धा अस्वस्थता वाढत आहे. तथापि, हा गैरव्यवहार उघडपणे व्यापक प्रमाणात ढळढळीतपणे दिसून येत असला, तरी समुदायातील बहुतेक सदस्य, सामाजिक पडसाद, दबावामुळे, भीतीने त्याबाबत बोलणे टाळतात. त्यामुळे मुस्लीमही 'वक्फ' घोटाळ्यांचे बळी ठरले आहेत.

लोकसभेनंतर राज्यसभेतही वक्फ दुरुस्ती विधेयक रात्री २.३० वाजताच्या सुमारास मंजूर झाले. हे विधेयक सभागृहात मंजूर होण्यापूर्वी, १२ तासांहून अधिक काळ मॅरेथॉन चर्चा झाली. यावेळी गृहमंत्री अमित शहा यांच्यापासून ते सर्व खासदारांनी आपले मत व्यक्त केले. चर्चा संपताच, वक्फ दुरुस्ती विधेयक २०२५ च्या बाजूने एकूण १२८ मते पडली तर ९५ सदस्यांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केले. विधेयक मंजूर झाल्यावर गृहमंत्री अमित शहा स्वतः पहाटे चार वाजता राज्यसभेतून बाहेर पडले. हे ऐतिहास बील दोन्ही सभागृहात मंजूर होणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचे हे मोठे यश समजले जाते. हे विधेयक आणण्याअगोदर भाजपने मोठा गृहपाठ केला होता, असे म्हणावे लागेल.

कारण त्यासाठी सरकारने गेल्या आठ वर्षांत मुस्लीम समुदायाशी व्यापक सल्लामसलत केली आहे. 'वक्फ सुधारणा विधेयक' 'वक्फ' मालमत्तांच्या बेकायदेशीर विक्री आणि अतिक्रमणांना आळा घालणारे आहे. त्यामुळे या मुस्लीम प्रभावशाली व्यक्ती या विधेयकाकडे संधीसाधू हितसंबंधितांचे आर्थिक नुकसान घडवून आणू शकणारा एक धोका म्हणून पाहतात. तथापि, या सुधारणांमुळे सामुदायिक मालमत्तेचे पुढील शोषणापासून संरक्षण होईल हे ओळखून, सर्वसामान्य मुस्लीम समाज, विशेषतः मुस्लीम महिलांनी सरकारच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

लष्कर आणि रेल्वेनंतर भारतात, 'वक्फ मंडळ' तिसऱ्या क्रमांकाचे मालमत्ताधारक आहे. 'भारतीय वक्फ मालमत्ता व्यवस्थापन व्यवस्था' संकेतस्थळानुसार, भारतातील 'वक्फ' मालमत्तेचे एकूण क्षेत्रफळ ३७ लाख, ३९ हजार एकरपेक्षा जास्त आहे. भारतातील २८ राज्ये आणि सात केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण ३२ 'वक्फ मंडळे' कार्यरत आहेत. भारतात 'वक्फ' मालमत्तेचे प्रमाण ८ लाख, ७२ हजार, ८०२ इतके प्रचंड आहे. याव्यतिरिक्त ४ लाख, ०२ हजार, ०८९ 'वक्फ बाय युजर्स' अर्थात 'वापरकर्त्यांद्वारे वक्फ' मालमत्ताही आहेत. परंतु, त्याबाबत कोणतीही योग्य कागदपत्रे उपलब्ध नाहीत. शिवाय, फक्त १ हजार, ०८८ 'वक्फ व्यवहार' नोंदणीकृत आहेत आणि २६ हजार, ६७६ खासगी 'वक्फ' मालमत्ता आहेत.

**' भारतातील 'वक्फ'चा इतिहास-**

सध्याचे प्रशासन सुधारणे आणि गैरव्यवस्थापन रोखणे या उद्देशाने भारतातील 'वक्फ' मालमत्तेचे व्यवस्थापन अनेक कायदेशीर बदलांमधून विकसित झाले आहे. १८९४ साली 'प्रिव्ही काऊन्सिल'च्या निर्णयापासून, 'मुस्लीम वक्फ कायदे' (१९१३, १९२३, १९३०), 'वक्फ कायदा १९५४' आणि त्यानंतरच्या सुधारणांसह विविध कायदे, 'वक्फ' प्रशासनाला आकार देत आहेत. 'वक्फ कायदा, १९९५'ने नियामक यंत्रणांना आणखी बळकटी दिली, तर २०१३ साली एका मोठ्या दुरुस्तीने त्याची व्याप्ती वाढवली. इतका गौरवशाली इतिहास असूनही, भारतातील 'वक्फ मंडळे' भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापनाच्या आरोपांनी ग्रासलेली आहेत. अहवाल असे सूचित करतात की, 'वक्फ' मालमत्ता वारंवार बेकायदेशीरपणे विकल्या जातात किंवा कायदेशीर प्रक्रियांना बगल देत खासगी संस्थांना कवडीमोल किमतीत भाड्याने दिल्या जातात. तसेच, अतिक्रमणे, बेकायदेशीर जमीन व्यवहार आणि कायदेशीर वादही वाढत आहेत.




**अतिक्रमणे आणि कायदेशीर वाद-**

'वक्फ' मालमत्तेचा बराचसा भाग अतिक्रमणाखाली आहे. 'डब्लूएएमएसआय' संकेतस्थळानुसार, सध्या 'वक्फ' मालमत्तेवर अतिक्रमणाची ५८ हजार, ८९० प्रकरणे आहेत. 'वक्फ' मालमत्तेशी संबंधित एकूण खटल्यांची संख्या ३१ हजार, ९९९ आहे. त्यापैकी १६ हजार, १४० प्रकरणे विशेष करुन अतिक्रमणांशी संबंधित आहेत. त्यापैकी ३ हजार, १६५ प्रकरणे मुस्लीम याचिकाकर्त्यांनी दाखल केली आहेत.

**मुस्लीम समाजांतर्गत संघर्ष-**

'वक्फ' मालमत्तेच्या गैरव्यवस्थापनामुळे प्रामुख्याने मुस्लिमांचेच नुकसान होते, हे लोकांना जाणवत असल्याने, समुदायात अंतर्गत कलह वाढत आहे. तथापि, सामाजिक दबावामुळे उघडपणे टीका करण्यास कुणी फारसे धजावत नाही. किंबहुना, याबाबत उघड टीका दुरापास्तच आहे. अनेक सामाजिक कार्यकर्ते, प्रमुख सुधारक बुद्धिवादी मुस्लीम धुरिण, शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंतांनी 'वक्फ' कायद्यातील सुधारणांच्या तातडीच्या गरजेवर वाढते, पण अव्यक्त अलिखित एकमत, ठळकपणे व्यक्त केले आहे. तथापि, धार्मिक आणि राजकीय गटांकडून पडसाद उमटण्याच्या भीतीने समुदायाचे अनेक नेते सार्वजनिकपणे या मुद्द्यावर बोलण्यास कचरतात, हे त्यांनी नमूद केले आहे.

**खटले आणि तक्रारी-**

अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाला संपूर्ण भारतात 'वक्फ' मालमत्तेवरील अतिक्रमणांबाबत असंख्य तक्रारी आणि निवेदने मिळाली आहेत. वेगवेगळ्या शहरांमधील अनेक प्रकरणे संकटाची व्याप्ती अधोरेखित करतात. हैदराबादमध्ये निव्वळ २०२१ सालीच अतिक्रमण करणाऱ्यांना ७६५ नोटिसा बजावण्यात आल्या होत्या; तर भारतातील सर्वांत श्रीमंत मंडळांपैकी एक असलेल्या तेलंगणच्या 'वक्फ' मंडळाकडे पाच लाख कोटी रुपयांची मालमत्ता आहे, तरीही त्यांच्याकडील ७५ टक्के जमिनीवर अतिक्रमण आहे. मुंबईत, महाराष्ट्रातील 'वक्फ' जमिनीपैकी ६० टक्क्यांपेक्षा जास्त जमिनींवर बेकायदेशीरपणे कब्जा करण्यात आला आहे.

**'वक्फ सुधारणा विधेयक, २०२५'ची वैशिष्ट्ये-**

'वक्फ' मंडळांमधील प्रशासकीय अकार्यक्षमता दूर करणे, हा या विधेयकाचा उद्देश आहे. अभिलेखांचे डिजिटायझेशन आणि ते 'डब्लूएएमएसआय' संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणारे अपयश, ही यामध्ये येत असलेली एक प्रमुख समस्या आहे. अधिक पारदर्शकता आणि सुलभतेची हमी देत, सर्व 'वक्फ' मालमत्तांची नोंदणी सहा महिन्यांच्या आत ऑनलाईन व्हावी, हा या दुरुस्तीमागील आणखीन एक महत्त्वाचा उद्देश म्हणता येईल. २००६ मध्ये देशात ४.९ लाख वक्फ मालमत्ता होत्या आणि त्यापासून मिळणारे एकूण उत्पन्न फक्त १६३ कोटी रुपये होते, तर २०१३ मध्ये बदल केल्यानंतरही उत्पन्न फक्त ३ कोटी रुपयांनी वाढले. आज देशात एकूण ८.७२ लाख वक्फ मालमत्ता आहेत. विधेयकात वक्फ मालमत्तेचे व्यवस्थापन, तिचे प्रशासन आणि देखरेख करणाऱ्या मुतवल्लीसाठी तरतूद आहे. 'वक्फ' मालमत्तेचे संकट केवळ कायदेशीर आणि प्रशासकीय अपयशच नाही, तर मुस्लीम समुदायासाठी नैतिक दुहेरी संकटदेखील आहे. या जमिनींचे निःपक्ष व्यवस्थापन निश्चित करण्यासाठी धाडसी पावले उचलली जात नाहीत, तोपर्यंत नुकसान वाढतच राहील आणि त्याचा सर्वाधिक फटका 'वक्फ' साधनसंपत्तीवर अवलंबून असलेल्यांना बसेल. 'वक्फ सुधारणा विधेयक, २०२५' एक संरचित आणि पारदर्शक उपाय देत असल्याने, प्रश्न असा उरतो, समुदाय व्यापक सामाजिक हितासाठी सुधारणांना पाठिंबा देईल की, अंतर्गत सत्ता संघर्ष प्रगतीमध्ये अडथळे निर्माण करतच राहील.

राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# ट्रम्प यांना शिंगावर घेणारे कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी आणि कॅनडा-भारत संबंध

जस्टिन ट्रुडो यांच्या राजीनाम्यानंतर कॅनडातील सत्ताधारी लिबरल पक्षाने आपला नवा नेता निवडला. मार्क कार्नी हे कॅनडाचे पंतप्रधान असतील. हा काळ कॅनडासाठी सर्वांत कठीण आहे. व्यापार युद्धापासून ते थेट अमेरिकेचे ५१ वे राज्य करण्यापर्यंत धमक्या डोनाल्ड ट्रम्प देत आहेत. अर्थतज्ज्ञ असलेले कार्नी मात्र न डगमगता ट्रम्प यांना शिंगावर घेत आहेत. या संकटांमधून आपल्या देशाला ते बाहेर काढू शकतील का? भारताबरोबरचे बिघडलेले संबंध सुधारण्यासाठी कार्नी किती प्रयत्न करणार? नुकताच कार्नी यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी समारंभ पार पडला, ज्यामध्ये भारतीय वंशाच्या अनिता आनंद आणि कमल खेरा या महिलांना मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. ५८ वर्षीय अनिता आनंद यांना नावीन्यता, विज्ञान आणि उद्योग मंत्री तर ३६ वर्षीय कमल खेरा यांना आरोग्य मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.



### भारतासोबतचे संबंध सुधारणार

आपण पंतप्रधानपदावर आल्यास भारतासोबतचे संबंध सुधारण्यावर भर देणार असल्याचे कार्नी यांनी सांगितले होते. ते म्हणाले होते की, ''सम विचारी देशांबरोबर कॅनडा व्यापारी संबंध वाढवेल. भारताबरोबर संबंध सुधारण्याचीही संधी आहे. मी त्या दिशेने पुढे जाण्याचा प्रयत्न करीन.'' ट्रुडो यांच्या काळात भारत आणि कॅनडामधील संबंध रसातळाला गेले होते.

### भारताबाबत दृष्टिकोन आणि संभाव्य संबंध

भारताच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीबाबत कार्नी यांचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. भारताची वित्तीय बाजारपेठ आणि बँकिंग प्रणाली सतत विकसित होत असून जागतिक अर्थव्यवस्थेत भारताची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत असल्याचे त्यांचे मत आहे. भारताची डिजिटल आर्थिक धोरणे, युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) प्रणालीचा प्रभावी वापर याचे ते प्रशंसक आहेत. भारतात अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीकडे ते सकारात्मकतेने पाहतात. अर्थात 'अर्थतज्ज्ञ' कार्नी हे भारताची स्तुती करत असले, तरी 'राजकारणी' कार्नी आपली धोरणे आगामी काळात कशी राबवितात, हे महत्त्वाचे आहे. कारण मावळते पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी खलिस्तानवाद्यांची भलामण केल्यामुळे सध्या दोन्ही देशांचे संबंध ताणले गेले आहेत.

### अमेरिका-कॅनडातील व्यापार/आयात कर युद्धामुळे भारताला फायदा

अमेरिका आणि मेक्सिको, युरोपीय महासंघ (ईयू) चीन, कॅनडा बरोबर व्यापार युद्ध किंवा आयात कर युद्ध भारतासाठी महत्त्वाच्या संधी निर्माण करीत आहे. अशा संघर्षांमुळे देशांतील व्यापारात अडथळे निर्माण होतात आणि पर्यायी बाजारपेठांची गरज निर्माण होते.

**व्यापार संधी :** अमेरिका आणि कॅनडा यांनी परस्पर आयात शुल्क वाढविले आहे, त्यामुळे दोन्ही देश पर्यायी पुरवठादार शोधतील. भारतासाठी हे एक उत्तम संधीचे व्यासपीठ आहे. अमेरिका आणि कॅनडाने एकमेकांच्या वस्तूंवर कर लावल्यामुळे त्या वस्तू महाग होतील. त्यामुळे भारत या दोन्ही देशांना स्वस्त दरात वस्तू निर्यात करू शकतो. विशेषतः कापड, इलेक्ट्रॉनिक वस्तू, औषधे आणि कृषी उत्पादने, पोलादी व ॲल्युमिनियम उत्पादने यांच्या निर्यातीत वाढ होऊ शकते. अन्न प्रक्रिया उद्योग आणि कृषी उत्पादने (जसे की तांदूळ, मसाले, चहा आणि कॉफी) निर्यातीत वाढ होण्याची शक्यता आहे. व्यापार युद्धामुळे कंपन्या त्यांच्या पुरवठा साखळीचे विकेंद्रीकरण करण्याचा विचार करतील आणि भारतासारख्या स्थिर अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीला प्राधान्य देतील. भारतीय उत्पादन उद्योग (Make in India) याचा मोठा फायदा घेऊ शकतो.

**गुंतवणूक वाढ :** व्यापार युद्धामुळे अमेरिका आणि कॅनडा या देशांतील कंपन्यांना त्यांच्या उत्पादनासाठी नवीन ठिकाणे शोधावी लागतील. भारत एक मोठी बाजारपेठ आणि कुशल कामगार असल्याने या कंपन्या भारतात गुंतवणूक करू शकतात. निर्यात आणि परकीय गुंतवणुकीत वाढ झाल्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यामुळे रोजगार निर्मिती वाढेल आणि देशाचा आर्थिक विकास होईल.

### भारताच्या सेवा क्षेत्राला चालना

कॅनडा आणि अमेरिकेमधील व्यावसायिक तणावामुळे दोन्ही देश IT आणि BPO क्षेत्रातील सेवांसाठी भारताकडे वळू शकतात. विशेषतः सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा सायन्स, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारख्या क्षेत्रांना फायदा होईल. अमेरिका-कॅनडा व्यापार तणावामुळे ऊर्जा पुरवठ्यात अस्थिरता आल्यास भारताला तेल आणि नैसर्गिक वायूच्या बाबतीत अधिक अनुकूल करार करता येतिल.

### भारतासाठी नवीन संधींचे दार

भारताने आपल्या व्यापार धोरणांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे; जेणेकरून या संधीचा पुरेपूर फायदा घेता येईल. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हच्या (GTRI) अहवालानुसार, अमेरिका आणि चीन व्यापार संघर्षात भारताला निर्यातीमध्ये ३६.८ अब्ज डॉलर्सचा फायदा झाला आहे. अमेरिका-कॅनडा व्यापार युद्ध भारतासाठी नवीन संधींचे दार उघडू शकते, विशेषतः उत्पादन, सेवा क्षेत्र, आणि ऊर्जा क्षेत्रात. भारताने धोरणात्मक दृष्टिकोन ठेवून, व्यापार धोरणे सुधारून आणि निर्यात अनुकूल वातावरण निर्माण करून या संधींचा जास्तीत जास्त फायदा घ्यायला हवा.

### भारताला दुहेरी फायदा

व्यापार युद्ध सुरू झाल्यानंतर तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये मोठी वाढ दिसून येईल. अमेरिकन बाजारपेठेत भारताची निर्यात वाढू शकते. दोन्ही देशांनी एकमेकांच्या वस्तूंवर शुल्क लादल्यानंतर ते महाग होतील आणि त्यानंतर भारताला दोन्ही बाजारपेठांमध्ये आपला माल निर्यात करण्याची उत्तम संधी मिळेल. कापड, कपडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि ग्राहकोपयोगी उत्पादनांशी संबंधित कंपन्यांना याचा खूप फायदा होऊ शकतो. याशिवाय फार्मा, ऑटो कंपोनेंट, मशिनरी, केमिकल्सशी संबंधित कंपन्यादेखील नफ्यात असू शकतात. निर्यातीतील वाढीबरोबरच भारतात थेट परकीय गुंतवणूक (FDI) वाढण्याची अपेक्षा आहे. कारण अनेक मोठ्या कंपन्या त्यांची उत्पादन केंद्रे अमेरिका, मेक्सिको, युरोपीय महासंघ (ईयू) चीन, कॅनडा बाहेर हलवण्याचा विचार करू शकतात आणि भारताच्या कमी कामगार शुल्कामुळे आणि मोठ्या बाजारपेठेमुळे त्या या देशाकडे वळू शकतात.

भारत-अमेरिका व्यापारावर नजर डोनाल्ड ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात जेव्हा अमेरिका-चीन व्यापार युद्ध झाले तेव्हा भारताची निर्यात ७२७३ अब्ज डॉलर्सच्या पातळीवर वाढली होती. गेल्या आर्थिक वर्षाच्या एप्रिल-नोव्हेंबरमध्ये भारत अमेरिकेचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार म्हणून उदयास आला आहे आणि दोघांमध्ये ८२.५२ अब्जचा व्यापार झाला आहे. यामध्ये ५२.८९ अब्ज डॉलर्सची निर्यात आणि २९.६३ अब्ज डॉलर्सची आयात समाविष्ट आहे. भारताने अमेरिका आणि मेक्सिको, युरोपीय महासंघ (ईयू) चीन, कॅनडामधील व्यापार युद्ध या संधीचा लाभ घ्यावा आणि ज्या वस्तू कॅनडा आज अमेरिकेला निर्यात करीत आहे, त्या भारतात 'मेक इन इंडिया'खाली (भारतात उत्पादित केलेल्या वस्तू) सिद्ध करून जागा घ्यावी. अर्थात हे आव्हान पेलण्यासाठी प्रचंड प्रयत्न करावे लागतील. आर्टिक समुद्रात असलेला बर्फ वितळत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये जागतिक व्यापाराकरिता हा रस्ता उघडा होऊ शकतो. अर्थात आर्टिक भागांमध्ये कॅनडा एक महत्त्वाचा देश आहे. कॅनडा आता 'जी सेवनची समिट' आयोजित करीत आहे. जर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या समीटकरिता बोलावले तर ते एक चांगले पाऊल असेल. याशिवाय याआधी भारत आणि कॅनडाने एकमेकाचे हाय कमिशनर्स खलिस्तानी वादावरून परत बोलवले होते. ते जर पुन्हा परत आले तर चांगले होईल. थोडक्यात भारत आणि कॅनडा नाते हे ट्रम्प यांच्या व्यापार युद्ध किंवा आयात कर युद्धापासून सुरक्षित राहायचे असेल तर त्याकरिता ते अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. पंतप्रधान झाल्यानंतर कार्नी यांनी भारताबरोबर संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे विधान सकारात्मक असले, तरी राजकीयदृष्ट्या ते खरोखर काय पावले उचलतात, यावर दोन्ही देशांचे भावी संबंध अवलंबून असतील.

(लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

# संतांनी सांगितलेला ज्ञानप्राप्तीचा उपाय

संज्ञानासारखे पवित्र या जगामध्ये दुसरे काहीही नाही. व्यक्तीला पवित्र, पावन, शुद्ध करणारे केवळ ज्ञान आहे. आत्मसाक्षात्काराची ज्याच्या मनाला ओढ लागलेली आहे व ज्याला सर्व विषयांचा वीट आलेला आहे. जो पुरुष कधीही इंद्रियांचे चोचले न पुरविता त्यांच्याप्रमाणे धावत नाही. जो सतत मनाला आवर घालतो. जो कर्माचे कर्तृत्व स्वतःकडे कधीही घेत नाही, अशा पुरुषाला खरी ज्ञानप्राप्ती होत असते. त्या ज्ञानी माणसाला अखंडपणे सुख मिळते.

संत तुकारामांनी ज्ञानयज्ञामध्ये देहत्रयाची आहुती दिल्यानंतर त्यांची जी अवस्था होती, ती 'देहातीत ब्रह्मरूप' अशी होती. परमेश्वराचा ज्ञानबोध झाल्यानंतर ते या परमपदाला पोहोचले.

**निरंजनी आम्ही बांधियले घर ।**
**निराकारी निरंतर राहिलो आम्ही ।।**
**निराभासी पूर्ण झालो समरस ।**
**खंड ऐक्यास पावलो आम्ही ।।धृ।।**
**तुका म्हणे आता नाही अहंकार ।**
**जालो तदाकार नित्य शुद्ध ।।२।।**

आपल्याला आपल्या अवती भवतीच्या जगामध्ये पावित्र्य जोपासणाऱ्या काही वस्तू पाहावयास मिळतात. त्यामध्ये तुळस, फुले, दुर्वा, गोमूत्र इ. चा समावेश होतो. परंतु, या वस्तूंचे पावित्र्य चिरकाल टिकणारे नसते. ज्ञान मात्र या सर्वांहून वेगळे आहे. ज्ञान हे कालातीत पवित्र आहे. ज्ञानाच्या पावित्र्याला दुसऱ्या कशाचीही उपमा योग्य होणार नाही. ज्ञानाइतके पवित्र फक्त ज्ञानच आहे. दुसऱ्या कोणत्याही वस्तूची तुलना ज्ञानासोबत होऊ शकत नाही.

**नही ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**
**तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मानि विन्दति ।।**

संत ज्ञानेश्वरसुद्धा अनन्वय अलंकाराद्वारे ज्ञानाचे पावित्र्य पटवून देतात.

**जैसी अमृताची चवी निवडिजे ।**
**तरी अमृताचिसारखी म्हणिजे ।।**
**तैसे ज्ञान हे उपमिजे । ज्ञानेसीचि ।।**

ज्याप्रमाणे अमृताची चव कशी आहे अमृतासारखीच आहे, असे म्हणावे लागते. त्याप्रमाणे ज्ञानाला कशाची उपमा द्यायची झाल्यास ती केवळ ज्ञानाचीच द्यावी लागेल. या पवित्रपणाचा एकच ठेवा म्हणजे ज्ञान आहे. त्यायोगे विटाळलेले मन शुद्ध व पवित्र होते.

**ज्ञान व अज्ञानाची व्याख्या**

ज्ञानेश्वरांनी ज्ञान, अज्ञान व विज्ञानाच्या व्याख्या 'ज्ञानेश्वरी'मध्ये केलेल्या आहेत. मायारूपी संसार हा लटिका म्हणजे खोटा आहे. संसारामध्ये जे काही व्यवहार केले जातात तेसुद्धा लटके म्हणजे खोटे आहेत. परंतु, लोक त्यास सत्य समजून वागतात, हे त्यांचे अज्ञान आहे. क्षेत्र म्हणजे शरीर व क्षेत्रज्ञ म्हणजे त्याला जाणणारा. त्यांना यथार्थपणे जाणण्याला संत तुकाराम ज्ञान संबोधतात.

**आडवा तो उभा । असे दाटोनियां प्रभा ।।१।।**
**देव नाही एकविध । एक भाव असे शुद्ध ।।धृ।।**
**भेदाभेद आटी । नाही फार कोठे तुटी ।।२।।**
**तुका म्हणे गोवा ।**

उगवा व्यवहाराचा हेवा भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये असे सांगतात की, ज्या ज्ञानामुळे परमात्मदर्शन म्हणजेच साक्षात्कार होतो ते खरे ज्ञान. तर, भौतिक ज्ञान म्हणजे अज्ञान मानावे.

**अध्यात्मज्ञान नित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।**
**एतज्ज्ञानमिती प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ।।**

ज्या ज्ञानामुळे मनुष्याला आत्मसाक्षात्काराची अनुभाती येते तेच खरे ज्ञान आहे. इहलोकापासून इंद्रचंद्रादी भौतिक विज्ञानाच्या सर्व शाखांतील ज्ञानाची अज्ञानामध्ये गणना केली जाते. कारण अशा प्रकारच्या ज्ञानापासून कोणत्याही मनुष्यास आत्मसाक्षात्कार होऊ शकत नाही. संत वाङ्मयाची विचारधारा अशी आहे की, जगातील सर्व भौतिक ज्ञान कितीही प्रगत असले, तरी त्यापासून फक्त निष्कर्ष काढता येईल. परंतु आत्मसाक्षात्कार मिळणार नाही त्यामुळे ते अज्ञानात मोडते. ज्ञानप्राप्तीचा उपाय ज्ञानप्राप्तीसाठी अंतःकरणाची शुद्धता पाहिजे. अंगामध्ये नम्रता असणे आवश्यक आहे. ज्या कोणत्या गुरूकडून तुम्ही ज्ञान घेणार आहात त्याच्यावर विश्वास पाहिजे. त्यांना अनन्यभावाने शरण गेल्याशिवाय तुम्हाला ज्ञानप्राप्ती होणार नाही. ते **ज्ञानप्राप्ती खुण। एके पांडवा लक्षण।। अधी सद्भावे नमन। मग प्रश्न आवडीचा ।।१।। सेवा भावार्थे करावी। निरपेक्षता असावी।। तेव्हा कृपा उपजे जीवीं। मग तो होय उपदेशु।।२।। शास्त्रज्ञ तत्त्वज्ञ ज्ञान सांगती सर्वज्ञ। तेव्हा सहज वर्मज्ञ। तुका म्हणे भाविकु।।३।।** मनुष्यास ज्या ज्ञानामुळे आत्मसाक्षात्कार होतो ते ज्ञान प्राप्त करण्यासाठी आत्मसाक्षात्कारी अधिकारी पुरुषाजवळ जावे. त्यांना साष्टांग नमस्काराने, विनम्रतेने साक्षात्काराविषयी प्रश्न विचारून त्यांची सेवाशुश्रूषा करावी व ते ज्ञान त्यांच्याकडून प्राप्त करून घ्यावे. पुढील श्लोकामधील पूर्वार्धात भगवान श्रीकृष्णांनी ज्ञानप्राप्तीचे तीन उपाय सांगितलेले आहेत.

**तद् विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेने सेवया। उपदेक्ष्यंन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन। प्रणिपातेनः** श्रीगुरूकडे ज्ञानप्राप्तीसाठी गेल्यानंतर सर्वप्रथम काय करावे, त्याबद्दल संत तुकाराम सांगतात **श्री संतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हे करी दंडवत ।।१।। विश्रांती पावलो सांभाळउतरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुखें ।।धु।।** (तु.गा. २१७८) संतांकडे गेल्यानंतर सर्वप्रथम विनम्रतापूर्वक साष्टांग नमस्कार करावा. संतचरणी साष्टांग प्रणिपात हा प्रथम उपाय तुकारामांनी सांगितला आहे.




**सेवा :** संताकडे गेल्यानंतर त्यांची सर्वभावे अगर्वतेने सेवा हा दुसरा उपाय ज्ञानप्राप्तीसाठी सांगितला आहे. **ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी। तरी का हिंपुटी वेदशास्त्रे।। याजसाठी संतपाय हे सेवावे। तरिच तरावे तुका म्हणे।।** (तु. गा. २२४९) त्यांची सर्वभावे सेवा केल्यानंतर त्यांची प्रसन्नता ओळखून प्रसन्नतेत त्यांना प्रश्न करावा.

परिप्रश्नेन : त्यांना साक्षात्कारविषयक प्रश्न विचारावेत. मी कोण, ईश्वर कोण, जगतविचार काय आहे अशा प्रकारचे आध्यात्मिक प्रश्न विचारावेत व त्यांच्याकडून साक्षात्काराविषयी संपूर्ण ज्ञान मिळवावे. भारतीय संस्कृतीमध्ये सांदीपनी ऋषी-श्रीकृष्ण, वसिष्ठ मुनी-श्रीराम प्रभू, निवृत्तिनाथसंत ज्ञानेश्वर, संत तुकाराम-निळोबाराय इत्यादी आदर्श गुरूशिष्य परंपरा आहे. त्यांनी श्रीगुरूंची मनोभावे सेवा करूनच विद्या संपादन केलेली आहे. ज्ञानसंपादनासाठी श्रद्धा, तत्परता, इंद्रियसंयम या तीन गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत, असे भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये सांगतात. **श्रद्धावाल्लभते ज्ञानं तत्परः संयेतेन्दियाः । ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेनाधिगच्छति ।।** (गीता ४/३९)

**श्रद्धा :** ज्या व्यक्तींकडून ज्ञानप्राप्ती करून घ्यायची त्यांच्यावर अपार श्रद्धा, निष्ठा असल्याशिवाय ज्ञान मिळणार नाही. **श्रद्धाळू तो ज्ञान पावे हे तु जाण। पूर्ण समाधान जयापासी निरंतर।। जो को इंद्रियाते आणित हारिते। आणि ब्रह्मत्वाते तत्पर जो।। ज्ञानास पाऊनी शांतीस घेउनी। बैसे निगमवनी म्हणे तुका ।।** (संत तुकारामांचे गीता अभंग २०१) तत्परता : सेवा करण्यासाठी तत्पर असावे लागते. ज्ञान ग्रहणासाठीसुद्धा अत्यंत तत्परता आवश्यक आहे.

आळस न करता अत्यंत सावधानता असावी लागते. हा दुसरा उपाय आहे. **इंद्रिय संयम साधकाची दशा उदास असावी। उपाधी नसावी अंतर्बाही ।। लोलुप्यता काय निद्रेते जिणावे। भोजन करावे परिमित।। एकांती लोकांती स्त्रियांशी भाषण। प्राण गेल्या जाण बोलो नये ।। तुका म्हणे ऐशा साधनी जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ।।** (तु. गा. २७२४) ज्ञानप्राप्तीसाठी तिसरा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे साधक हा इंद्रिय संयमी असणे आवश्यक आहे. अभिमान असणाऱ्या मनुष्यास कधीही ज्ञानप्राप्ती होऊ शकत नाही. कदाचित झालीच तर, ती त्यास पचवताही येणार नाही. आत्मज्ञान प्राप्तीसाठी साधकाने कोणते उपाय करावेत, हे संत तुकारामांनी सांगितले आहे. त्यामुळे खात्रीने ज्ञानप्राप्ती होते. स्त्रियांशी संभाषण टाळावे, अल्प आहार असावा, झोपेवर नियंत्रण असावे. अंतर्बाह्य उपाधी डोक्यात नसावी. इंद्रियावर सावधानीपूर्वक विजय मिळवावा.लोकांमध्ये विनाकारण बसू नये. अभ्यासाचे ठिकाण आश्रम, गुहा, निसर्गरम्य ठिकाण असावे. जास्त बोलू नये. संतांनी अशा प्रकारे दिव्य ज्ञान प्राप्तीचा उपाय सांगितला आहे. हा ज्ञानप्राप्तीचा उपाय मानवी जीवनामध्ये अत्यंत उपयोगी असून तो मनुष्याला जीवन जगताना खूप दिशादर्शक आहे.

---




कथा

डॉ. मृणालिनी दोडके

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे आणि तो सामाजिक रचनेमधे आपले कर्तृत्व, वक्तृत्व, सर्जनशीलता, बौद्धिक ऊर्जा याची देवाण-घेवाण करीत असतो. समाज रचनेमधे तो स्वत:ला निश्चिंत आणि सुरक्षित ठेवू शकतो. या समाजरचनेत शिक्षण व्यवस्था, कुटुंब व्यवस्था, विवाह व्यवस्था, उद्योग-नोकरी व्यवस्था इत्यादी माणसाला प्रगत बनवायला वर्षानुवर्षे कार्यरत आहे. साधारण १९७०-१९७५ दरम्यान एखाद्या कुटुंबात तीन किंवा चार मुले असणे अगदी सामान्य बाब होती. हे दृश्य अगदी शहरात सुद्धा होते. पण नंतर जसा जसा माणूस शिक्षित होत गेला आणि मुख्यत: स्त्रीवर्ग अर्थार्जनासाठी बाहेर पडला तसे तसे कुटुंब चौकोनी होत गेले.

चौकोनी कुटुंब, दुप्पट उत्पन्न, जागतिकीकरण या सर्व विस्तारवादाने मुलांना शिक्षित करणे हे पालकांचे ध्येय बनले आणि शहरांमधे मुलींचे लग्नाचे वय जे २४२५ होते ते २०२५ मधे २८-२९ झाले. आज अनेक शिक्षित मुली नोकरी करून आपल्या पायावर उभ्या आहेत. आज दुप्पट उत्पन्न आणि लग्नानंतर एकच पाल्य हा समाजासाठी दंडक बनलेला आपण पाहात आहोत. महानगरातच नव्हे तर नंबर दोन शहरात सुद्धा हेच दृष्य आहे. यात आणखी एक प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे आता मुलांना लग्नाची घाई नसते. यात काही मुले आणि मुली परदेशात उच्चशिक्षणासाठी जातात आणी आपले करीअर करण्यास प्राधान्य देतात. एकदा उच्चशिक्षण, चांगली नोकरी म्हटलं की, मुलांच्या अपेक्षा सहाजिकच वाढतात आणि योग्य जोडीदार मिळणे ह्यात वेळ निघून जातो. भल्या मोठ्या पगाराची नोकरी, हाती पैसा आणि पाहिजे ती सेवा घेण्याची कुवत यामुळे पहिले काही वर्ष नवलाईचे आणि कौतुकाचे जातात. ह्यात आईवडिलांचा पाठिंबा असतो. कालांतराने मुलामुलींचे वय वाढते आणि विवाह या समाज संस्थेपासून ते दूर जातात. तेव्हाच सुरू होतो तो काठावरचा प्रवास. मुख्य प्रवाहापासून दूर रहाणे. याच उच्चशिक्षित मुलांबरोबर असलेले काही समवयस्क मुली आणि मुले विवाहबंधन स्वीकारून आपला पुढला प्रवास एकमेकांच्या सहवासात सुरू करतात आणि उच्चशिक्षित मुले समाजरचनेचा परिपाठ न स्वीकारता काठावर उभे रहातात. वय वाढते तसे त्यांचा जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलत जातो आणि नकळत विवाहबंधनाकडे 'एक न पेलणारा धोका' म्हणून पाहिले जाते. नोकरीतले ताणतणाव आणि लग्नाचे आव्हान यात विवाह करणे राहून जाते आणि त्यांचे जीवन एकसुरी बनण्यास सुरुवात होते.

सहाजिकच विवाहाबद्दल त्यांचे आकर्षण कमी होऊन, शारीरिक गरजांकडे डोळेझाक केली जाते आणि मग ही मुले कामामधे स्वत:ला जास्तीत जास्त झोकून देतात. हळूहळू ह्या मुलांना घरगुती कार्यक्रम, समारंभ तसेच सामाजिक व्यवस्था याविषयी एक अलिप्तपणा येतो आणि समाज देखील त्यांना आता वेगळा समजू लागतो. या सगळ्यांमध्ये सारी भौतिक सुखे असून सुद्धा मनमुराद आनंद किंवा जीवनातल्या छोट्या छोट्या आनंद देणाऱ्या गोष्टी सुटत जातात. काही विधायक कार्यासाठी विवाह बंधनात न अडकणे वेगळे आणि तडजोड न करता एकांगी आयुष्य जगणे हे नंतर फार आव्हानात्मक बनू शकते. आपण पहातोच की, समाजात कितीतरी अशी उदाहरणे आहेत की आईवडील असेपर्यंत काठावरची मुले शाश्वत असतात पण एकदा ही वरची फळी संपली की समवयस्क लोक सुद्धा काठावरच्या लोकांना आपल्यात घेत नाही. आता हा एकाकी प्रवास आणखीनच त्रासदायक होतो, जेव्हा ही मंडळी परदेशी वास्तव्यास असतात. आपल्या देशात, आपल्या माणसात कधीतरी स्पर्श, भावना, प्रेम वाट्याला येऊ शकते. पण परदेशात हे दुरापास्त असते आणि सहाजिकच याचा ताण मनावर येतो. मला कोणी नाही ही भावना जेव्हा डोके वर काढायला लागते, तेव्हा मग तो प्रवास आणखी खडतर होऊ लागतो. आता स्वत:साठीच जगणे हा पगडा इतका घट्ट होतो की, मन केवळ एकाच गोष्टी भोवती फिरायला लागते आणि ते म्हणजे आपले स्वत:चे शरीर.. मग तो पैसा कामी येत नाही किंवा तुम्ही तुमच्या नोकरी व्यवसायासाठी केलेले योगदान सुद्धा. नोकरी किंवा व्यवसायात एकल म्हणून सोशल कार्यक्रमात सुद्धा 'काठावरच्या लोकांना' समरस होऊन भाग घेता येत नाही.

आज हा लेख लिहिण्याचे औचित्य म्हणजे अशी कितीतरी कुटुंबे आहेत की त्यांची तरुण उच्चशिक्षित मुलेमुली देशात आणि परदेशात आहेत पण ते विवाहबंधन स्वीकारायला तयार नाहीत. सगळेच चकाकणारे सोने नसते किंवा लग्न म्हणजे केवळ जबाबदारीच नसते ही जाणीव मुलांना होणे गरजेचे आहे. शेवटी आयुष्य ही एक मिळालेली संधी आहे. त्याचा सगळ्या बाजूने विचार करून एक संपन्न आयुष्य जगावे एवढेच सांगणे.

# भावनांवर नियंत्रण; सुखाला निमंत्रण!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८


१. माझ्या क्लिनिकमध्ये आली तेव्हा तिची मानसिक स्थिती फारच नाजूक होती. तिच्या मनावर खूप ताण होता. ज्याच्यावर तिचं प्रेम होतं त्याचे शिक्षण सुरू असल्यामुळे तो अद्याप नोकरीला किंवा व्यवसायाला लागलेला नव्हता. इकडे वय वाढतंय म्हणून आईवडील तिचे लग्न जुळवायची घाई करीत होते. तिने अद्याप कुणालाच तिच्या मनातील गोष्टी सांगितलेल्या नव्हत्या. मुलीचा साधा, अबोल स्वभाव, म्हणून ती अशी कुणाच्या प्रेमात पडेल, असे कुणालाच वाटले नाही. शेतकरी आईवडील खेड्यात राहत असल्यामुळे ती नागपुरात शिकायला आली. खरे तर तिने आधी कला शाखेत एम.ए. केलेले होते व एका डिप्लोमा कोर्समध्ये तिने प्रवेश घेतला होता. कॉलेजमधीलच एका कार्यक्रमात तिची या मुलाशी ओळख झाली. तो मुलगाही चांगल्या संस्कारात वाढलेला आहे. दोघेही एकाच शहरात व कॉलेजमध्ये असल्यामुळे हळूहळू भेटी वाढल्या आणि नकळत दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडलेत. इकडे पालकांनी तिच्यासाठी वरसंशोधनाची तयारी जोरात चालवली होती.

आईवडिलांना मानसिक धक्का बसेल म्हणून ती त्यांना आपल्या प्रेमाबद्दल सांगायला घाबरत होती. शेवटी तिने हिंमत करून आपल्या आईवडिलांना आपल्या ओळखीच्या मुलासोबत लग्न करायचे आहे असे सांगितले. ते ऐकून सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला. तिची आई लगेच आजारी झाली व तिला दवाखान्यात भरती करावे लागले. वडिलांनी स्वतःला सावरले. पालक मानसिक धक्का सहन करू शकणार नाही, याची तिला आधीच भीती होती. आईच्या आजारपणामुळे दोन आठवडे घरी सर्वांचेच खूप तणावात गेले. आईला घरी आणल्यावर वडिलांनी मुलाला भेटायला घेऊन ये असे तिला म्हटले. पालक मुलाला नाकारतील या भीतीने तिने अंतर दूरचे आहे म्हणून त्याला घरी बोलावणे टाळले व आधी त्याच्याशी फोनवर बोलणे करून देते, असे वडिलांना सांगितले. फोनवर बोलताना तिच्या वडिलांनी त्या मुलाला लगेच लग्न करण्याबद्दल सांगितले व तिची पूर्ण जबाबदारी तो घेऊ शकतो का म्हणून विचारणा केली. त्याला नोकरी किंवा उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्याने त्याने लगेच लग्न करण्याबद्दल असमर्थता व्यक्त केली व दोन वर्षांचा अवधी मागितला. वडिलांनी तोपर्यंत मुलीचे वय वाढेल व एवढे थांबू शकत नाही म्हणून त्याला नकार दिला व दोघांनाही नातं विसरून आपापल्या जीवनावर लक्ष केंद्रित करायला सांगितले. अतिशय अनिच्छेने दोघेही नातं विसरायला तयार झालेत. त्यानंतर योगायोगाने दोनच महिन्यात त्या मुलीला अतिशय उत्तम स्थळ चालून आले. तो वर सरकारी नोकरीत असून सुस्वभावी व दिसायलाही तिच्या जुन्या मित्रापेक्षा उजवा आहे. तिचे वडील आणि आई यांनी लगेच लग्न ठरवले व साखरपुडा उरकून घेतला. सर्व मनाविरुद्ध होत असूनही आईवडिलांच्या इच्छेखातर तिने साक्षगंधाचे सर्व विधी पार पाडले. तिच्या जुन्या मित्रापर्यंत ही बातमी पोहोचली. त्याला आपण लग्नासाठी सध्या असमर्थ आहोत, असे सांगून चूक केल्याची भावना झाली. त्याने तिच्या वडिलांना फोन केला व सांगितले की, मी चांगला प्रयत्न करीन. माझ्या घरचे लोक मला मदत करायला तयार आहेत. तुम्ही तिचे ठरलेले साक्षगंध मोडा व मुलीचे लग्न माझ्याशी लावून द्या. तिचे वडील साधे गरीब शेतकरी! त्यांना हा धक्का पचवता आला नाही. साक्षगंध झाल्यावर एक महिन्यानंतरचीच लग्नाची तारीख पक्की झालेली असल्यामुळे त्यानुसार कपडे व इतर तयारी जोरात सुरू होती. अशावेळी त्या मुलाचा फोन आल्यामुळे आता काय होईल, या भीतीने ते चक्कर येऊन खाली पडले व बेशुद्ध झाले. शेजाऱ्यांनी त्यांना दवाखान्यात नेले.

आईला पण खूप मनस्ताप झाला. खरे तर या सगळ्या घटना अशा घडण्याचे कारण असे होते की, नवीन मुलाशी साक्षगंध झाल्यावरसुद्धा मुलगी जुन्या मित्राशी फोनवर बोलत बसायची. दोघेही एकमेकांना तुझी खूप आठवण येतेय म्हणून रडायचे. तसेच हिचे आता लग्न होणार व ही कायमची दुरावणार या भावनेची तीव्रता वाढल्यामुळे तिच्या जुन्या मित्राने वडिलांना फोन केला होता. वडिलांना दवाखान्यातून घरी आणल्यावर मुलीने आणखी एक घोळ केला. मुलीने ज्याच्याशी साक्षगंध झाले त्या मुलाला तिच्या जुन्या मित्राबद्दल सांगितले. हे ऐकून त्या मुलाला व त्याच्या घरच्यांना धक्का बसला. तिचा उद्देश असा होता की, नवीन मुलाने स्वतःच लग्न मोडावे व तिच्या जुन्या मित्राला मग पुरेसा वेळ मिळून त्यांच्या मनासारखे घडावे. मात्र गरीब असूनही वडिलांनी अनेक लोकांकडून कर्ज काढून लग्नाच्या तयारीसाठी साक्षगंधाच्या खर्चाशिवाय आठ लाख खर्च केलेत, हे तिला माहीतच नव्हते. लग्न मोडले अशी नाचक्की समाजात होऊ नये म्हणून तिच्या होणाऱ्या नवऱ्याने 'अजूनही मी तिच्याशी लग्न करायला तयार आहे' असे सांगितले. पण एवढे सगळे घडल्यानंतर अजूनही 'दिल है के मानता नही' अशी तिची परिस्थिती झाल्यामुळे त्या मुलीने माझ्याकडे येऊन हे सगळे मला कथन केले. तिचे म्हणणे होते की, अजूनही मला लग्न करायची इच्छा नाही, पण पालकांसाठी मी ठरलेले लग्न करणार; पण माझ्या मनातील दु:ख कमी करून उदासीनता दूर करण्याचा मार्ग मला सांगा. मग भावनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी मी तिला भावना मेंदूत कशा जन्म घेतात व त्यासाठी काय करता येईल त्याची माहिती दिली. तत्पूर्वी तिच्या भावना औषधे न देता नियंत्रित करता येतील का, याची काही मानसशास्त्रीय साधने वापरून खात्री केली.

२. विक्री प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या एका व्यक्तीचे त्याच्या बायकोशी बिनसले. कारण त्याला व्यावसायिक तणावामुळे खूप राग यायचा व त्याच्या सारख्या चिडक्या स्वभावामुळे पत्नीने व त्याच्या तरुण मुलीने त्याच्यापासून विभक्त व्हायचा निर्णय घेतला. यामुळे तो हादरला व माझ्याकडे आला. तेव्हा त्याला अनेक प्रचलित उपाय व काही विशेष उपाय केल्यावर त्याला फायदा झाला. तो आता सुधारलाय यावर त्याच्या पत्नीचा व मुलीचा विश्वास बसत नव्हता. यामुळे आता पुढे काय करावे या चिंतेने त्याला ग्रासले व त्याच्या मनात असुरक्षितता वाढली तेव्हा त्यालासुद्धा काही वैज्ञानिक माहिती दिल्यावर तो शांत झाला.

३. **मेंदूतील अमिग्दल-युग्माचे चमत्कार :** वरील दोन्ही प्रकरणात मी त्यांना आपल्या मेंदूतील भावना व्यवस्थापन यंत्रणा पुढीलप्रमाणे समजावून सांगितली. आकृतीत पिवळ्या रंगात दाखवल्याप्रमाणे अमिग्दल ही एक घनमिलीमीटर म्हणजे शेंगदाण्याच्या आकाराची दोन मण्यांसारखी जोडी आहे. 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' ही म्हण मेंदूच्या लिम्बिक सिस्टिम या भागातील या 'अमिग्दल-युग्मा'ला तंतोतंत लागू पडते. आपल्या मनातील सर्व १६५ भावनांचे व्यवस्थापन अमिग्दलच करते. जशी आपल्या मोठ्या घराच्या तुलनेने, प्रमुख दाराची किल्ली अतिलहान असते; अगदी तशीच आपल्या व्यक्तिमत्त्वाचे भावनिक संतुलन, दीर्घस्मरणशक्ती यंत्रणा, सुरक्षा, अभ्यास किंवा शिक्षण




करण्याचे अती महत्त्वाचे कार्य हे अमिग्दल सांभाळते. त्यातल्या त्यात 'भीती' ही आपल्या सुरक्षाप्रणालीची सर्वात महत्त्वाची यंत्रणा आहे. त्यावरच आपले अस्तित्व अवलंबून आहे.

**अमिग्दल हायजॅक :** डोळे, कान, जीभ, कातडी, नाक या आपल्या पाच इंद्रियांची स्वतंत्र जाणीव केंद्रे म्हणजे माहिती संकलन व त्या माहितीचे विश्लेषण करणारी केंद्रे आपल्या मेंदूत आहेत. उदा. डोळ्यांनी काय पाहिले त्याचा बोध मेंदूमधील दृष्टीला जबाबदार असलेल्या केंद्रात होतो. डोळे फक्त माहिती किंवा इमेज मेंदूमधील दृष्टिकेंद्रात माहिती पोहोचवतात. मग पक्षी पाहिला की माणूस? कोणता पक्षी? कोणता माणूस? की जीवाला धोका होईल असा विषारी नाग पाहिला? याची माहिती व त्या माहितीचे विश्लेषण आपल्या डोक्याच्या मागच्या भागात असलेल्या मेंदूतील दृष्टिकेंद्रात होते. याच प्रकारे आपल्या पाचही सेन्सरी ऑर्गनने कुठली जाणीव झाली, त्याचे आकलन मेंदूतील त्या-त्या सेन्सरी केंद्रात होते. मात्र ही सर्व पाचही ज्ञानेंद्रियातील माहितीचे आकलन त्या-त्या केंद्रात होण्याच्याही आधी अमिग्दलात ती माहिती पोहोचते व त्यात जीवाला धोका होऊ शकणारे काही असल्यास आपल्या शरीराद्वारे रक्षण करण्याची प्रणाली लगेच कार्यान्वित होते. हे झाल्यानंतर त्या त्या अवयवांची माहिती त्या त्या ज्ञानेंद्रियांच्या जाणीव केंद्रात जाऊन त्या माहितीचे त्या केंद्रात विश्लेषण होते व आपल्याला ते काय जाणवले त्याचा बोध होतो. या प्रकारे पाच ज्ञानेंद्रियांच्याच माध्यमातून दृष्टी, स्पर्श, वास, चव आणि ऐकणे या पाचही जाणिवांपैकी ज्या गोष्टींपासून आपल्या जी-वाला धोका असतो त्या गोष्टींची नोंद अमिग्दल हा मेंदूचा भाग आपल्या या पाच जाणीव ज्ञानेंद्रिय केंद्रांच्याही आधी घेतो; यालाच अमिग्दल हायजॅक म्हणतात. अगदी त्याचप्रमाणे आपल्या नकळत आपल्या मनाने कुठली धोकादायक गोष्ट किंवा विचार, भावना टिपल्यास त्याची जाणीव अमिग्दलात होऊन आपण असुरक्षिततेच्या भावनेने किंवा काळजीने अस्वस्थ होतो. त्या भीतीचा किंवा काळजीचा परिणाम आपल्या शरीराच्या विविध अवयव प्रणालीवर होऊन आपले ब्लड प्रेशर वाढणे, श्वासाचा वेग वाढणे, छातीत धडधड वाढणे, अस्वस्थ वाटणे यालाच 'पॅनिक अटॅक' म्हणतात. कुठल्याही कारणाने अशी भीतीची किंवा काळजीची तीव्रता वाढून वरील लक्षणे वाढल्यास आपल्या भावना नियंत्रित करून पुन्हा सुखी होण्यासाठी किंवा मनावरील तणाव नियंत्रित करायला पुढील गोष्टी आचरणात आणाव्यात.

१) अखंड नामस्मरण करा २) शिस्तबद्ध, नियमित आयुष्य जगा. ३) स्वत:चा व्यक्तिमत्त्व विकास घडवा. ४) व्यापक व सकारात्मक विचार करा. ५) स्वत:चे व जगाचे निरीक्षण करून ध्येय ठरवा. ६) संगीत, वाचन, बागकाम असे चांगले छंद जोपासा. ७) नियमित दीर्घश्वसन, अनुलोम विलोम प्राणायाम करा. ८) सेल्फ-टॉक म्हणजे स्वत:च्या मनात स्वत:शी चांगले बोला. ९) वेळेचे व्यवस्थापन व समस्या सोडविण्याची कौशल्ये जाणून घ्या. १०)व्यायाम, संतुलित शाकाहारी आहार, सात-आठ तास झोप नियमित घ्या. ११)निसर्गाच्या जवळ जा. प्राणी, पशू, पक्षी, नदी, तळे यांच्यावर प्रेम करा. १२)योगाभ्यास यथाशक्ती निरंतर करीत राहा. १३)मोबाईल, टीव्ही, लॅपटॉपचा कमीत कमी वापर करा. व्यसनांपासून दूर राहा. १४)रोज मनात सकारात्मक विचार ठेवून आपले सद्गुण वाढवा व दुर्गुणांचा त्याग करा. १५) मी, माझे अशा स्वकेंद्रित विचारात गुरफटून न राहता इतरांना मदत करा. १६)ताणाची मूळ कारणे जाणून ती दूर करा, गरजा, हव्यास कमी करा. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यावर नियंत्रण ठेवा. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## तुम्हावीन सांगा । कोण वाली ।।

आरूषाची बोली । कौतुक मातेसी ।।
त्याचे आणिकासी । काय घेणे ।।१।।


तैसे माझे बोल । जाण तू विठ्ठला ।।
नको बोलबाला । क्लेशदायी ।।२।।

मानपान सारा । व्यवहार लटका ।।
भक्तीत नेटका । लीन भाव ।।३।।

देखता चरण । आता सुखावलो ।।
बालक मी झालो । अजाणता ।।४।।

माय बाप गोत । तुम्ही पांडुरंगा ।।
तुम्हावीन सांगा । कोण वाली ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८
(आरूष=बोबडे, अज्ञानी, वेडेवाकडे)



## श्रीरामाची आरती

श्रीरामचंद्रा तुला आरती ओवाळीतो,
मनोभावे ओवाळीतो ।।धृ।।
श्रीराममूर्ती पद्मासनी साजरी, प्रेमदृष्टी भक्तावरी
सीतामाई वामांगी शोभते, मातृवात्सल्ये पाहते
दक्षिणभागी हा सुमित्रानंदन,
रामचरणी ज्याचे मन हात जोडोनिया हनुमंत
नम्र उभा, लीनभक्तीचा गाभा पंचायतन
भक्तिभावे पाहतो, मनोभावे ओवाळीतो ।।१।।
कनकतबक त्याला मोतियाचे कोंदण,
त्यात रुप्याचे निरांजन गोनवनीतोद्भवात
भिजलेली, वात त्यात सरकविली भक्तिभावाने
ज्योत तेजाळली, धरा सारी झळाळली
पाहे कवतीके कौसल्यानंदन, रामकृपेची खूण
हृदयार्तीने आरती ओवाळीतो,
मनोभावे ओवाळीतो ।।२।।
कोदंडधारी राम आजानुबाहू, राम आदर्शाचा ठावू
दैत्य-दानवा रामाचा थरार, राम भक्ता दयासागर
हनुमंताचा राम सखा धीवर, राम सीतासर्वेश्वर
लक्ष्मणाचा भरताचा भ्राता, राम आनंदाचा कर्ता
श्रीरामाला आनंदे न्याहाळीतो,
मनोभावे ओवाळीतो ।।३।।
राम सगुणही राम निर्गुणही,
श्रुती कीर्ती सदा गाई अणुरेणूहुनी राम
किती थोकटा, राम आहे किती मोठा
ओवाळावी आरती ब्रह्मांडाने,
चंद्र-सूर्याची निरांजने सायुज्यदाता राम कृपासागर,
राम कैवल्याचे आगर श्रीरामकृपे सलोकता पावला,
राम रामनामी रंगला ।।४।।

राम तारे



# उत्पादनाला आधार; टेस्ला-टाटांचा सहकार

अर्थोद्योग
महेश देशपांडे

उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्राचे १४ हजार कोटी रुपयांचा बूस्टर डोस कामी येत असल्याचे अलिकडेच दिसून आले. याच सुमारास रेल्वे इंजिन उत्पादनात भारताने अमेरिका, युरोपच्या उत्पादनावरही मात केल्याचे पाहायला मिळाले. या दोन सुवार्तांखेरीज कांदा निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय का घेण्यात आला, यावर महत्त्वाची माहिती सरत्या आठवड्यामध्ये पुढे आली. याखेरीज चर्चेत राहिलेले आणखी एक वृत्त म्हणजे 'टेस्ला'सोबत टाटांची भागीदारी होत असल्याचे समोर आले. केंद्र सरकारने उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आखलेल्या योजनेंतर्गत (पीएलआय) २०२१ पासून १४ हजार कोटींहून अधिक निधी जारी केला आहे.

'पीएलआय' योजनेला सरकार भरपूर चालना देत आहे. देशातील १० मोठ्या क्षेत्रांसाठी आतापर्यंत १४ हजार २० कोटी रुपये देण्यात आले आहेत. सरकारने देशातील उत्पादन क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या 'पीएलआय'योजनेंतर्गत १४ हजार २० कोटी रुपयांची मदत केली आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, मॅन्युफॅक्चरिंग, आयटी हार्डवेअर, फार्मास्युटिकल्स, टेलिकॉम, फूड प्रोसेसिंग, ऑटोमोबाईल आदी १० मोठ्या क्षेत्रांचा समावेश आहे. ही रक्कम प्रोत्साहन अनुदान रूपात होती. ही योजना देशाच्या उत्पादन क्षमता आणि निर्यातीला चालना देण्यासाठी २०२१ मध्ये सुरू करण्यात आली. त्यात १४ क्षेत्रांचा समावेश करण्यात आला होता. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे, की, 'पीएलआय' योजनेचा देशातील विविध क्षेत्रांवर लक्षणीय परिणाम झाला आहे. या योजनेद्वारे स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे उत्पादन वाढेल, अधिक लोकांना रोजगार मिळेल आणि निर्यातीला चालना मिळेल. या योजनेमुळे देशांतर्गत तसेच परदेशातून गुंतवणूक आकर्षित झाली असून स्वदेशी वस्तूंच्या उत्पादनात आणि निर्यातीत चांगली कामगिरी दाखवणाऱ्या कंपन्यांना सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे. 'पीएलआय' योजनेंतर्गत १४ क्षेत्रांसाठी ७६४ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. त्यात बल्क औषधे, वैद्यकीय उपकरणे, फार्मा, दूरसंचार, व्हाईट गुड्स, अन्न प्रक्रिया, कापड आणि ड्रोन यांसारख्या क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश आहे. 'पीएलआय'लाभार्थ्यांपैकी १७६ लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील आहेत. नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुमारे

> उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्राचे १४ हजार कोटी रुपयांचा बूस्टर डोस कामी येत असल्याचे अलिकडेच दिसून आले. याच सुमारास रेल्वे इंजिन उत्पादनात भारताने अमेरिका, युरोपच्या एकूण उत्पादनावरही मात केल्याचे पाहायला मिळाले. या दोन सुवार्तांखेरीज कांदा निर्यात शुल्क रद्द करण्यामागील परिस्थिती सरत्या आठवड्यामध्ये समोर आली. याखेरीज 'टेस्ला'सोबत टाटांच्या भागीदारीचे वृत्तही चर्चेत राहिले.



१.६१ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. यामुळे सुमारे १४ लाख कोटी रुपयांची (सुमारे १६२.८ अब्ज डॉलर) विक्री झाली आहे. २०२४-२५ पर्यंत १५.५२ लाख कोटी रुपयांच्या विक्रीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. या योजनेमुळे ११.५ लाखांहून अधिक लोकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे रोजगार मिळाला आहे.

'पीएलआय' योजनेंतर्गत कंपन्यांनी विशेष स्टीलमध्ये सुमारे २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यास गुंतवणुकीचे लक्ष्य २७ हजार १०६ कोटी रुपये होते. यामुळे नऊ हजार लोकांना थेट रोजगारही उपलब्ध झाला. दरम्यान, भारतीय रेल्वेने या वर्षी लोकोमोटिव्ह उत्पादनात नवा विक्रम केला आहे. या वर्षी भारतात १४०० लोकोमोटिव्हचे उत्पादन झाले. ते अमेरिका आणि युरोपच्या एकत्रित उत्पादनापेक्षा जास्त आहे. देशाचे लोकोमोटिव्ह उत्पादन १४०० वर पोहोचले आहे. युरोप आणि अमेरिकेच्या एकूण उत्पादनाची सांगड घातली, तरी देशाचे लोकोमोटिव्ह उत्पादन त्यांच्यापेक्षा खूप पुढे आहे. रेल्वे यंत्रणेमध्ये या आर्थिक वर्षात दोन लाख नवीन वॅगन्सची भर पडली. ही नवी इंजिने सध्या चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स (सीएलडब्ल्यू), बनारस लोकोमोटिव्ह वर्क्स (बीएलडब्ल्यू), पटियाला लोकोमोटिव्ह वर्क्स (पीएलडब्ल्यू) सारख्या उत्पादन युनिटमध्ये तयार केली जात आहेत.

या वर्षी भारतीय रेल्वेमध्ये सुमारे दोन लाख नवीन वॅगन्स समाविष्ट करण्यात आल्या. गेल्या १० वर्षांमध्ये रेल्वेने सुमारे ४१ हजार 'लिंक-हॉफमन-बुश' (एलएचबी) डबे तयार केले आहेत. पूर्वी वर्षाला फक्त ४००-५०० एलएचबी डबे तयार केले जात होते आणि आता पाच-साडेपाच हजार डबे तयार केले जातात. सर्व 'आयसीएफ' कोचचे 'एलएचबी' कोचमध्ये रूपांतर केले जाणार आहे. रेल्वे सुरक्षेतील गुंतवणूक १.१६ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. ती पूर्वीपेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग, धुके सुरक्षा उपकरणे आणि 'कवच' प्रणाली वेगाने लागू केली जात आहे. ट्रॅकच्या देखभालीवर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी नवीन प्रकारचे वाहन विकसित केले गेले आहे. हे रेल-कम-रोड व्हेईकल देखभालीचे काम सोपे करते. ५० हजार किलोमीटरचे प्राथमिक रेल्वे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

२०१३-१४ मध्ये दरवर्षी सुमारे ३,७०० वेल्डिंग बिघाड होत असत, तर हे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक घटून २५० वर आले आहे. आता चर्चा कांद्याच्या निर्यातीची. दर घसरल्यानंतर शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आता लागू होत आहे. सध्या सरकार कांद्याच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात कर वसूल करते. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाने जारी केलेल्या अधिसूचनेमध्ये म्हटले आहे की, सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्क शून्य करण्याचा निर्णय घेतला आहे. १ एप्रिलपासून ही अधिसूचना लागू झाली



आहे. देशातील कांद्याच्या किमतीत प्रचंड वाढ झाल्यामुळे केंद्र सरकारने डिसेंबर २०२३ मध्ये निर्यातीवर बंदी घातली होती. यानंतर मे २०२४ मध्ये किमान निर्यात किंमत मर्यादा ५५० रुपये प्रति टन आणि ४० टक्के निर्यात शुल्कासह परदेशात कांदा विकण्याची परवानगी देण्यात आली. सप्टेंबर २०२४ मध्ये किमान निर्यात किंमत रद्द करण्यात आली आणि निर्यात शुल्कदेखील २० टक्के करण्यात आले. ते आता पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

निर्यातबंदी असूनही २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण १७.१७ लाख टन कांद्याची निर्यात झाली असून २०२४-२५ या आर्थिक वर्षात ११.६५ लाख टन कांद्याची निर्यात झाली आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, सप्टेंबर २०२४ मध्ये मासिक कांदा निर्यातीचे प्रमाण ७२ हजार टनांवरून जानेवारी २०२५ मध्ये १.८५ लाख टन झाले आहे.

ग्राहक व्यवहार मंत्रालयाने म्हटले आहे की, हा निर्णय शेतकऱ्यांना फायदेशीर दर सुनिश्चित करण्यासाठी आणि ग्राहकांसाठी कांद्याच्या किमती नियंत्रणात ठेवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. रबी पिकांची आवक चांगली होण्याच्या अपेक्षेने घाऊक आणि किरकोळ भावात घसरण झाली आहे. सध्याच्या किमती मागील वर्षांच्या संबंधित कालावधीच्या पातळीपेक्षा जास्त असल्या, तरी अखिल भारतीय भारीत सरासरी मॉडेलच्या किमती ३९ टक्क्यांनी घसरल्या आ-हेत. त्याचप्रमाणे गेल्या एका महिन्यात अखिल भारतीय सरासरी किरकोळ किमती १० टक्क्यांनी घसरल्या आहेत. कृषी मंत्रालयाचा अंदाज आहे की, या वर्षी रबी कांद्याचे उत्पादन २२७ लाख टन होईल; जे गेल्या वर्षीच्या १९२ लाख टनापेक्षा १८ टक्के अधिक आहे. भारताच्या एकूण उत्पादनात ७०- ७५ टक्के वाटा असलेला रबी कांदा ऑक्टोबरनोव्हेंबरमध्ये खरीप आवक सुरू होईपर्यंत बाजारातील स्थिरतेसाठी महत्त्वाचा आहे. आता नजर उद्योग क्षेत्रातील एका महत्त्वाच्या घडामोडीवर. टाटा ऑटोकॉम्प, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा टेक्नॉलॉजीज आणि टाटा इलेक्ट्रॉनिक्स गोपनीय पद्धतीने ॲलन मस्क यांच्या 'टेस्ला' कंपनीचे जागतिक पुरवठादार बनले आहेत. मीडिया रिपोर्टसनुसार, टाटा ग्रुपने अमेरिकन इलेक्ट्रिक व्हेईकल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी 'टेस्ला'सोबत सुट्या भागांचा जागतिक पुरवठादार म्हणून भागीदारी केली आहे. एकीकडे 'टेस्ला' भारतीय बाजारपेठेत प्रवेश करण्याच्या तयारीत आहे, तर दुसरीकड, टाटा स्वत:ला कंपनीसाठी स्थानिक पुरवठादार म्हणून तयार करीत आहे.

कास्टिंग, फोर्जिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि फॅब्रिकेशनच्या विकास आणि उत्पादनावर चर्चा करण्यासाठी टेस्लाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्थानिक पुरवठादारांची भेट घेतली. टेस्ला भारतात पुरवठादारांचे पाठबळ उभे करण्याच्या तयारीत आहे. टेस्लाचे उत्पादन युनिट भारतात सुरू झाले की, भारतीय पुरवठादारांना सोर्सिंगच्या संधीचा फायदा होईल. टाटा टेक्नॉलॉजी आऊटसोर्स उत्पादन अभियांत्रिकी सेवा तसेच डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन सेवा आणि विविध उत्पादनांसाठी 'अपस्किलिंग सोल्यूशन्स' प्रदान करते. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# बदललेल्या ऋतूचे संदर्भ: वसंत यायचा उधळत रंग!

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

वसंत,
नाव घेताच चैतन्याची लकेर पेरणारा हा ऋतू, कुणाच्या बर आवडीचा नसेल? माणसाच्या स्वभावगुणानुसार प्रत्येकाची ऋतू बाबतची आवड निरनिराळी असू शकते. मात्र, श्रावण आवडतो म्हणून किंवा शरद ऋतूतील चांदणं आवडतं म्हणून वसंत आवडत नाही. असे म्हणणारा कोणी भेटणार नाही. चैत्र आणि वैशाख अश्या मराठी महिन्यांमध्ये वसंत आपला अद्भुत आणि प्रसन्न असा चेहरा घेऊन येतो. पळस, शर्वरी जिला ग्रामीण भागात काटे सावरी या नावानेही ओळखले जाते. त्याचबरोबर पळसपांगरा या झाडांवर लाल केसरी रंगाची उधळण करत वसंत आपल्या आगमनाची नोंद घ्यायला लावत असतो. सूर्य उगवल्यावर प्रखर उन्हाने संपूर्ण पृथ्वीला भाजून काढणार हे सर्वश्रुत. मात्र त्याच वेळी सकाळच्या कोवळ्या उन्हात सोनेरी किरणांच्या झळाळीने स्वतःच्या श्रीमंतीचा रुबाब दाखवणारा वसंत खरोखरच ऋतूंचा राजा आहे असे म्हणायला हरकत नाही.



वसंताचा ऐश्वर्यवान खजिना निसर्गाच्या कणाकणामध्ये उधळून देतो तो फाल्गुन. गुलमोहर, बाभूळ किंवा अगदी सुबाभूळ अशा विविध झाडांच्या वाळलेल्या शेंगा बरोबर हलताना एखाद्या संगीत शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे कधी लयबद्ध तर कधी कर्ण कर्कश असा आवाज करत असतात. आमच्या लहानपणी उन्हामध्ये दूरवर दिसणारे मृगजळ आताशा लवकर दिसत नाही. दिसत असले तरी आमचे बालपण आम्ही मागे ठेवून आलो आहे आणि वर्तमान पिढीतील बालकांना बालपण म्हणजे काय? ते माहित आहे याची शंका यावी अशी परिस्थिती आहे.

घरावर चिमणीसाठी येळणी बांधावी यासाठी एखादा चाळीशी-पन्नाशीतला जीव व्याकुळ होतो. प्लास्टिकच्या एखाद्या भांड्याला येळणी म्हणून झाडाला टांगण्याचा प्रयत्न करतो तर अनेकदा अंगणात झाडच नसते. अर्थात मातीच्या खापराची येळणी पक्ष्यांच्यासाठी किती सुखकर होती, ते वर्तमान पिढीला सांगून समजणार नाही. मात्र आजही दुपारच्या उन्हात हरवून गेलेले पक्षी आणि त्यांचे आवाज सूर्यास्ताच्या वेळी कानावर पडायला सुरुवात होते. एखादेवेळी हिरव्यागार पोपटांचा थवा डोक्यावरून उडत जातो. मात्र अनेकदा लग्नाच्या धामधुमीत दूरवरून येणारे डीजेसारखे कर्ण कर्कश आवाज पाखरांचा हा मधुर कलरव कानात साठवण्यास व्यत्यय आणत असतो. शेगावच्या गजानन महाराज मंदिरात संध्याकाळी आरतीचा घंटानाद सुरू झाला की, मंदिरावर शेकडो पक्षी घिरट्या घालतात, घंटा वाजेपर्यंत गोल गोल फिरत राहतात हे दृश्य मी स्वतः पाहिले आहे. अर्थात ह्या घंटानादाचा आणि त्या पक्ष्यांच्या धार्मिक असण्याचा दावा मी करत नाही कारण आजच्या काळात राजकीय पक्षच फक्त धर्मवादी आहेत इतर माणस आणि पक्षी स्वतःच्या रोजीरोटीच्यासाठी व्यस्त आहेत. मात्र नादशास्त्रानुसार हा आवाज आला की एकत्र जमायचे आणि काम आणि भटकंती थांबवून घरट्यात पिल्याकडे जायचे असा त्यांचा काही संकेत असू शकतो, असे मला वाटते. शेगाव म्हणजे विदर्भाचे पंढरपूर, गजानन महाराज शेगावमध्ये प्रकट झाले म्हणा की दिसले म्हणा तेही वसंत ऋतूंतच, पक्ष्यांच्या बाबत विचार करत असताना २५-३० वर्षांपूर्वी अंगणामध्ये खेळणाऱ्या चिमण्या रुसून कोणत्या गावाला गेल्या? हे आज कोणालाही सांगता येत नाही. मोबाईल वापरामुळे चिमण्यांची संख्या कमी झाल्याचे संदेश मात्र आम्ही आवर्जून एकमेकांना मोबाईलव्दारे पाठवत असतो.

गाणं कोकीळा म्हणवणारी लतादीदी अनंतात विलीन झाली तरी आजही खराखुरा कोकीळ साद घालतो पण ती ऐकण्यासाठी वेळ कोणाकडे आहे? पळसाच्या झाडावर लाल केसरी फुलातील मध पिणारे भुंगे किंवा फुलचुख्या पक्षी अजूनही झाडाच्या शेंड्यावर आपली गरज भागवण्यासाठी जमा झालेले असतात. मात्र, त्यांच्याकडे पाहणे ही आपली गरज नाही या भ्रमात समकालीन पिढीतील लोक त्यांच्याकडे पाठ फिरवत आहेत. मी मात्र आजही मोबाईलचा का होईना कॅमेरा वापरून बहरलेला पळस टिपण्याचा प्रयत्न करतो. एखादा पळस पांगरा मला आकर्षित करत असतो.

माझ्या शाळेच्या रस्त्यावरील एका कोरड्या नाल्या जवळच्या शेतात असलेला पळस पांगरा त्या शेतमालकाने निर्दयपणे तोडला त्याची हळहळ अजूनही मला अस्वस्थ करते. काटे सावरीच्या झाडा जवळून आपण वर्षभर रोज जात होतो तरी तिचे अस्तित्व आपल्याला आजपर्यंत का जाणवले नाही? असा प्रश्न ती बहरून आल्यावर दरवर्षी आपल्याला पडल्याशिवाय राहत नाही. अर्थात काटे शेवरीचे झाडही उभे आहे तेही महामार्गावरच, पुढेमागे महामार्गाच्या रुंदीकरणात लिंबाच्या झाडाप्रमाणे कापले जातील आणि बोगनवेलसारखे झाडे त्या ठिकाणी रस्त्यावर हिरवळ हवी म्हणून लावली जातील अशी भीती वाटत राहते. विकासाचे रुंदीकरण सर्वांना हवे आहेच मात्र या रुंदीकरणात निसर्ग प्रेमाचे माप छोटे छोटे होत चालले आहे. वसंत ऋतू हा सृष्टीचा सृजनासाठी सर्वोत्तम कालखंड मानला जातो. फाल्गुन महिन्याच्या उन्मादक छटा एखाद्या उंच इमारतीच्या छतांखालून पारवे किंवा कबूतर दाखवण्यासाठी उत्सुक असतात. मात्र, त्यांना तेथे येण्यासाठी प्रतिबंधात्मक अशी जाळी लावून आम्ही गॅलरीत त्यांची घाण पडू नये म्हणून प्रयत्नशील असतो. ह्याच वसंतात यमुनेच्या काठावर कधी कृष्णाने बासरी फुंकली तर दौडत येणारी राधा आणि फाल्गुन पौर्णिमेला रंगांची धार गोपीकांवर उडवणारा असा कृष्ण कन्हैया हे चित्र आज फक्त कल्पना आणि चित्रपटांमध्ये उरला आहे. घार, पारवे गरुड असे पक्षी तर आता अभावाने ही दिसणे बंद झाले आहे.

आमच्या लहानपणी आमच्या वस्तीच्या बाहेर एखाद्या मरून पडलेल्या प्राण्याला खाण्यासाठी गिधाडांची गर्दी जमायची. आमच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या मर्दुमकीत हे पक्षी मेलेल्या प्राण्याच्या मासाचा फडशा पाडण्यात गुंगून गेलेले असायचे. आम्ही त्यांच्यापासून त्यांना मोजता येईल इतक्या अंतरावरून त्यांची शिरगणती करायचो. आणि ते ५५ होते की ६० होते, याबाबत आपसात भांडून कट्टी बट्टीसारखा रुसवा फुगवायचा चालायचा. एखादे वेळी वसंतातल्या उन्हात एखादा मदारी एक किंवा दोन अस्वलांना घेऊन अंगणात बस्तान मांडून बसायचा. त्याच्या काठीच्या इशाऱ्यावर नाचणारा भालू आज माणसाचा जीव घेण्या इतका हिंसक होऊन अभयारण्यात कसा बंदिस्त झाला? असा प्रश्न आजही मला स्वतःच्या बालपणात डोकावून पाहताना पडतो. तसे माकडाचे खेळ करणारे तसेच साप आणि मुंगूसचा खेळ दाखवणारे लोकही आता दिसत नाहीत. उन्हाळ्यात गावात येणारी सर्कसही आता इतिहासजमा झाली आहे. फाल्गुनात जमीन सुकून जाते तसे माणसाचे भावनाशील मन सुकून गेले आहे असे मला वाटते. सूर्य तापल्यावर फाल्गुनात धूळ उडायची, त्या धुळीसोबतच अनेकदा झाडाची वाळलेली पाने फेर धरून नाचायची. आमचे बालपण त्या छोट्याशा वावटळीत अंगावर धुळमाखेपर्यंत गोल गोल फिरायचे. वडीलधारी कोणीतरी सांगायचे ही माती उडवणारा चकवा असतो, त्यात मीठ टाकले की तो दिसतो. अर्थात हे सर्व आम्हाला त्यात खेळण्यापासून परावृत्त करण्यासाठी असायचे. मात्र आम्ही मीठ घेऊन चकवा पाहण्यासाठी त्या छोट्या गोल वादळाच्या मागे पळायचं अनेक दिवस सुरू ठेवल. तसे आमच्या लहानपणी आम्हाला घाबरणारे बागुलबुवा, वडाच्या झाडावरील मुंज्या, चिंचेच्या झाडावरील हडळ अशी बऱ्यापैकी मंडळी होती. त्यांना आपल्यात सामील करून त्यांच्या जादुई शक्तीचा वापर करत काहीतरी भव्य दिव्य करावे असे नेहमी वाटत असे. अर्थात आमच्याकडे मजुरी करण्यासाठी त्यापैकी कोणालाही रस नसल्यामुळे त्यांनी आम्हाला कधी दर्शन दिले नाही.

(पान ६ वर)

# धार्मिक वर्चस्वाचे सापळे...

इस्लामचा प्रसार हा गेल्या काही दशकांत जागतिक स्तरावर वेग घेत आहे. त्याचे जसे सामाजिक परिणाम आहेत, तसेच राजकीय परिणामही आहेत. सध्या अमेरिका आणि केनिया या देशांत इस्लाम स्वीकारणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचा 'प्यू रिसर्च सेंटर'चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. धर्मप्रसार केवळ श्रद्धेचा विषय नाही, तर त्याला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भही असतात. कोणत्याही देशाच्या मूळ संस्कृतीवर मोठ्या प्रमाणावर प्रभाव टाकणारा हा बदल, सहजतेने स्वीकारला जाऊ शकत नाही. इस्लाम चा हा वाढता प्रभाव केवळ वैयक्तिक श्रद्धेपुरता मर्यादित नाही, तर तो व्यापक स्वरूपात सम ाजव्यवस्थेचे स्वरूप बदलू पाहत आहे. आजमितीला युरोपात त्याचे चित्र अधिक स्पष्ट दिसते.

लक्ष्यवेध
कौस्तुभ वीरकर




रोपप्रमाणेच अमेरिकाही पारंपरिकपणे ख्रिश्चन बहुल देश असला, तरी गेल्या काही दशकांत तिथे इस्लामचा प्रसार लक्षणीयरित्या वाढला. यामागे काही महत्त्वाची कारणे आहेत. अमेरिकेतील आफ्रिकन- अमेरिकन समुदायात इस्लामचा प्रभाव अधिक दिसून येतो. अनेकजण इस्लाम स्वीकारताना त्यातील आध्यात्मिक शोध, सांस्कृतिक पुनरुत्थान आणि शिस्तबद्ध जीवनशैली यांसारख्या बाबींचा उल्लेख करतात. ही सगळी इस्लामची वैशिष्ट्ये आहेत, असा प्रसार वेगाने तिथे केला जात आहे. त्यामुळे अमेरिकेतील अनेक जनसामान्यही इस्लामकडे आकर्षित होत असल्याचे चित्र आहे. तथापि, वस्तुस्थिती अशी की, अमेरिकेतील तुरुंग व्यवस्थेतही मोठ्या प्रमाणावर इस्लामी धर्मांतरण होते.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले अनेकजण तुरुंगात असताना, कट्टरतावादी विचारसरणीच्या प्रभावाखाली येतात आणि इस्लाम स्वीकारतात. तुरुंगाबाहेर पडल्यावर त्यातील काही जण हिंसक आणि धर्मांध गटांसाठी कार्यरत होतात. अमेरिकेसारखी परिस्थिती केनियामध्येही आहे. मात्र, केनियामध्ये इस्लामच्या प्रसारामागे एक वेगळी रणनीती दिसून येते. मोठ्या प्रमाणावर मुस्लीम धर्मप्रसारकांकडून आर्थिक मदत केली जाते. गरजू लोकांना रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा आणि इतर सुविधा पुरवण्याच्या नावाखाली त्यांचे धर्मांतरण केले जाते. हे धर्मांतर स्वेच्छेने होत नसून, लोकांच्या गरिबीचा फायदा घेतला जातो.

केनियाच्या इतिहासात १९८०-९० सालच्या दशकातील राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेचा फायदा घेत, मुस्लीम गटांनी मोठ्या प्रमाणावर धर्मप्रसार केला. परिणामी, गेल्या दोन दशकांत केनियातील मुस्लीम लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. अशाप्रकारे, केनियामधील मुस्लीम गट केवळ धार्मिकच नव्हे, तर राजकीय प्रभाव वाढवण्याच्या हेतूनेही कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध धर्म त्यांच्या प्रसाराचे कार्य करतच असतात.

इस्लामच्या प्रसाराविषयी चर्चा करताना हा बदल केवळ धार्मिक नव्हे, तर एक हेतुपुरस्सर घडवलेला सामाजिक आणि राजकीय प्रयोग आहे का, याचा विचार करणे आवश्यक आहे. इस्लामचा प्रसार हा श्रद्धेच्या नावाखाली होत असला तरी, त्याचा एक व्यापक सामाजिक आणि राजकीय हेतू असल्याचे स्पष्ट आहे.

युरोपात इस्लाम प्रसारानंतर, मूळ समाजव्यवस्थेलाच आव्हान देण्याची मानसिकता अनेक ठिकाणी दिसून आली आहे. अनेक ठिकाणी पूर्वीच्या कायद्यांना आव्हान देत, 'शरिया कायदा' लागू करण्याच्या मागण्या केल्या जातात. कोणत्याही धर्माचा प्रसार नैसर्गिक स्वरूपाचा असेल, तर तो फारसा वादग्रस्त ठरत नाही. परंतु, इस्लामच्या बाबतीत कट्टरतावाद असल्याने हा प्रसार अधिकच चिंताजनक ठरतो. तसेच, इस्लाम स्वीकारल्यानंतर समाजातील लोकशाही तत्त्वांना आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यालाही आव्हान दिले जाते.

काही देशांत ईशनिंदा कायदा आणि महिलांच्या हक्कांवरील निर्बंध यांसारख्या गोष्टी लागू करण्याची मागणी सर्रास होते आहे. हा धोका ओळखूनच ट्रम्प यांनी, इस्लाममधील कट्टरतावादाविरोधात भूमिका घेतलेली दिसते. इस्लामचा प्रसार हा जगभरातील पारंपरिक समाजरचनेसाठी मोठे आव्हान ठरू शकतो. जगातील ही बदलती धार्मिक समीकरणे आणि त्यातून उद्भवणार्या परिणामांना वेळीच ओळखले नाही, तर काही दशकांनंतर अमेरिका, युरोप आणि आफ्रिकेत पारंपरिक संस्कृती अस्तित्वहीन होण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. म्हणूनच, हा विषय आज राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

पान१ वरून

# मर्यादा पुरूषोत्तम

अशोकवनात असलेल्या सीतेच्या जवळपासही रावण फिरकू शकला नाही, याला कारण सीतेचे प्रखर तेज. पती श्रीराम आणि राजा श्रीराम यात सीतेने कधीही गल्लत केलेली नाही.

पती आणि राजा यातील सीमारेषेची तिला अचूक जाण आहे. 'प्रजेसाठी निर्णय घेताना राजा श्रीरामांनी माझ्यावर अन्याय केलाही असेल कदाचित, पण पती श्रीरामांनी मला एक क्षणही अंतर दिले नाही' असे म्हणणारी सीता ही कायम वंदनीय आहे. रामनवमीच्या निमित्ताने श्रीरामांच्या जीवनात आलेल्या स्त्रियांचेही स्मरण करणे गरजेचे आहे, कारण 'रामलला' ते 'पुरुषोत्तम' या प्रवासात राजस्त्रियांच्या भूमिकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव हा पुरुषोत्तम ाच्या व्यक्तिमत्त्वासाठी नक्कीच साह्यभूत ठरला आहे. बालवयात रामाच्या जडणघडणीला तीन मातांनी आकार दिला तर पुढे श्रीरामांनी आपल्या आचरणातून या स्त्रियांना समृद्ध केले. परस्परपूरक अशी ही नाती आहेत. या स्त्रियांच्या आयुष्यात अनेक संकटे, वादळे आली. पण त्यावर धैर्याने, निष्ठेने, श्रद्धेने मात करण्याची शक्ती त्यांना पुरुषोत्तमाच्या प्रभावाने प्राप्त झाली आहे. त्यांच्या अलौकिक चरित्राचा कालप्रवाहावर पडलेला अमीट ठसा आजही वंदनीय, चिंतनीय आणि मार्गदर्शक आहे.

ललित
ज्योती पुजारी

मोबाईल नावाचं संदेशवाहक भ्रमणध्वनी यंत्र आपल्या हातात आले आणि आपला संवाद संपल्यात जमा झाला. माणसं आपल्या मनाच्या सर्व अवस्थांच्या घड्या मोबाईलमधल्या व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि अनेक ॲपवर उलगडायला लागली संदेशांची देवाणघेवाण द्रुतगतीने व्हायला लागली. मोबाईलवर संदेश पडला रे पडला की, निमिषार्धात तो ज्याला पाठवला त्याच्या मोबाईलवर जाऊन पडतो अन् थोड्याच वेळात पटापटा लाईक्स, कमेन्टस, स्माईली, ईमोजींचा पाऊस सुरू होतो. अंगठे उंचावले जातात. लहान मुलं एकमेकांना चिडवण्यासाठी 'अड्डू-अड्डू' म्हणत अंगठा दाखवतात.

अंगठ्याचा ईमोजी पाहिला की, मला वाटतं ही व्यक्ती आपल्याला अंगठा दाखवून खिजवते आहे. आता मीही जरा निर्ढावले आहे. मीही चटकन अंगठा दाखवून मोकळी होते. 'तुझा अंगठा- माझा अंगठा' असा हा खेळ काही वेळ चालतो. मग अंगठे मुडपून हृदयाची देवाण-घेवाण होते. माणसं प्रेमात पडली की, 'दिल के बदले दिल' दिले-घेतले जाते, असं ऐकून होते. मोबाईलच्या पडद्यावर पहावे ते नवलच घडते. कोणीही कोणालाही आपलं हृदय देतं. शिवाय त्या हृदयात चंद्र-चांदण्याही लुकलुकत असतात.

काहींना हृदय देण्यापेक्षा नाईस क्युट वगैरे मोबाईलच्या पडद्यावर दाखवण्यात मजा येते. विनोदी संदेश असले तर एक स्माईली मोबाईलच्या पडद्यावर अवतरते. विनोद जरा जास्त आवडला तर दोन स्माईली अवतरतात. माणसं प्रतिमांमधून हसायला-रडायला लागली आणि प्रत्यक्षात खळखळून हसणे विसरली. एखादी स्मितरेषा; गालातल्या गालात हसणे, हसण्याची अनेकविध रूपं आता फक्त आठवणीतच राहणार की काय, असं वाटायला लागलं आहे. व्हॉट्सॲप नावाच्या उचापतखोराच्या घरात अनेक समूह-समूहांनी नांदत असतात. ढकल संदेश म्हणजे फॉरवर्डेड मॅसेजेबद्दल तर विचारायलाच नको. ते व्हॉट्स्ॲपच्या दारोदारी फिरत असतात. कथा, कविता, गाणी, लेख इकडून तिकडे फिरत असतात. काही कथा, कविता आणि तत्सम मसाला अनेक समूहांतून गोल गोल राणी करत फिरलेला असतो की, त्याचा मूळ निर्माता कोण हेच कळत नाही. दरवेळी त्या साहित्याचा जननी-जनिता कोणी वेगळाच असतो.

## संदेसे आते हैं...!



कुणाची तरी गाजलेली कविता मूळ मालकाला डावलून दुसऱ्याच कोणाचं कुंकू कपाळी लावून फिरत असते तर एखादी कथा, लेख मूळ मालकाकडे पाठ फिरवून दुसऱ्याच कोणाच्या अंगाखांद्यावर खेळत असते. काय करणार 'चोर चोरीसे जाये हेराफेरीसे न जाये' असं म्हणतात. मोबाईलवर संदेशांचा अखंड रतिब घालणारे रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग अशा हिरीरीने 'जीएम-जीएन'चे संदेश पहाटेपासून तर मध्यरात्रीपर्यंत आपल्या आप्तस्वकीयांना पाठवत असतात. जसे काही यांनी जीएम म्हणजे गुड मॉर्निंगचा संदेश पाठवला नाही तर सूर्य उगवणार नाही किंवा आपल्या लाडक्यांची सकाळ होणारच नाही. आपण गुडनाईटचा संदेश पाठवला नाही तर ज्यांना संदेश पाठविला त्यांची रात्र गुड असणारच नाही, असा यांचा गोड गैरसमज असते. आप्तस्वकीय रात्री गाढ झोपेत असले, तरी मोबाईल सतत संदेश प्रसवत असतो.

आमच्या ओळखीचा एक मुलगा आहे. त्याच्या मोबाईलवर संदेश टपकला की 'हर हर महादेव' असा जोरात आवाज यायचा. म्हटलं हा काय प्रकार आहे तर तो मुलगा म्हणाला, मॅसेज आल्याचं कळत नाही म्हणून ही युक्ती केली. एका अर्था 'हर हर महादेव' हे बरोबर आहे. पाठवलेला संदेश मोबाईलचा गड सर करून मोबाईलच्या डबीत येऊन पडतो. फुले, पाने, झाडझुडपे व्हॉटसॲपवर टाकणारा एक वर्ग व्हॉटसॲपवर सतत कार्यरत असतो.

अतिशय सुंदर रंग देखणं रूप असलेली ती फुले, पाने, झाडे मन मोहून टाकतात; पण त्या फुलापानांनी मोबाईल नावाचा डबा भरून वाहायला लागतो. मग मोबाईलची मेमरी फुल झाल्याची सूचना झळकायला लागते तेव्हा नाईलाजाने का होईना मेमरीमधला पानाफुलांचा तो ढीग बाहेर काढावा लागतो. काही जण पक्ष्यांचे, वेगवेगळ्या प्राण्यांचे व्हिडीओ पाठवतात. पक्ष्यांमधील वैविध्य, प्राण्यांचा डौल पाहताना आनंद होतो.

जंगलातील वाटा, उगवता-मावळता सूर्य, किनाऱ्याकडे झेपावणाऱ्या सागर लाटा, स्वतःला उंचावरून दरीत झोकून देणारे धबधबे, निरभ्र आकाश, मस्तीत कोसळणारा पाऊस, निसर्ग दृश्याचे असे अनेक व्हिडीओ पाहताना त्यात आपण हरवून जातो. छोट्या बाळांच्या बाललीलांचे व्हिडीओ पाहताना रमतो. देश-परदेशातला निसर्ग, तिथले सौंदर्य आपल्या मोबाईलच्या आत बंद झाले आहे.

जेव्हा हे सगळं बघायचं असेल तेव्हा एका क्लिकवर ही अलिबाबाची गुहा उघडते अन् विलोभनीय दृश्य मोबाईलच्या पडद्यावर साकार होतात. व्हिडीओ बनवण्याची तर आजकाल लाटच आली आहे. कोणीही कशाचेही व्हिडीओ बनवतो. आपल्या कुटुंबातील बऱ्या-वाईट क्षणांचे पटकन व्हिडीओ करून मोबाईलवर टाकणे हा छंदच झाला आहे. एका व्हिडीओमध्ये तर एक आई तिच्या बाळाची शी काढताना दाखवली आहे. देवाशप्पथ असा व्हिडीओ मी पाहिला आहे.

नशीब वडीधाऱ्यांच्या प्रातःविधीचा व्हिडीओ अजून कोणी केला नाही. केला असेल तर मला म ाहीत नाही. आई आपल्या बाळाला दूध पाजते तेव्हा ती त्याला आपल्या पदराखाली झाकून घेते. काही महाभाग याचेही व्हिडीओ करून सोशल मीडिया नावाच्या चव्हाट्यावर टांगतात तेव्हा असे व्हिडीओ करणाऱ्यांच्या बुद्धीची कीव येते. एक व्हिडीओ आठवतो, एक स्त्री रेल्वे स्टेशनवर आपल्या तान्ह्या बाळाला घेऊन बेंचवर बसलेली आहे. तिच्या बाळाला भूक लागली आहे. तिला त्याला दूध पाजायचं आहे, पण आजूबाजूच्या गर्दीने ती संकोचली आहे.

शेवटी ती नाईलाजानं बाळाला पदराखाली घेते. येणारे-जाणारे तिच्याकडे विचित्र नजरेने पाहात असतात. त्या नजरांमध्ये काही अश्लील नजराही असतात. तेवढ्यात एक तरुण येतो. तो तिच्यासमोर वर्तमानपत्र पूर्ण उघडून वाचत उभा राहतो. तिला पाहिल्यांदा कळत नाही हा आपल्यासमोर असा का उभा आहे? क्षणात तिच्या लक्षात येतं.

आजूबाजूच्या तिच्याकडे वळणाऱ्या नजरांपासून तो तिचं रक्षण करतो आहे. आता ती निश्चिंत होऊन बाळाला दूध पाजते. एक छोटीशी त्याची कृती स्त्रीच्या मातृत्वाचा सन्मान करण्याचा संदेश देऊन जाते. अपघातात जखमी झालेल्यांना मदत करण्यापेक्षा त्या घटनेचा व्हिडीओ काढण्यात लोक मश्गूल होतात, तेव्हा त्यांच्यातली माणुसकी संपल्याची जाणीव होते.

एकूणच मोबाईल नावाचा हा जादुगार आपल्याला वेगवेगळ्या जगाची सफर घडवून आणते. मात्र, रील्स करताना रील्स आणि रीयल याच्यातला फरक तेवढा लक्षात घ्यावा. आपल्या आयुष्यातले नाजूक कोवळे क्षण सोशल मीडियाच्या चव्हाट्यावर उधळू नये.

५०० वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर अयोध्येत रामजन्मभूमीवर साकार झालेल्या भव्य दिव्य राममंदिराच्या आनंदोत्सवाप्रित्यर्थ, जानेवारी २०२४ मध्ये प्रारंभ झालेल्या 'नित्य विजयी रघुनंदन' या लेखमालेची प्रस्तुत लेखाने यशस्वी सांगता होत आहे. गेल्या १५ महिन्यातील ६५ लेखांतून 'संत साहित्यातील रामदर्शन' घडविण्यात आले आहे. ही लेखमाला रामकृपेचाच शब्दाविषकर आहे. श्रीराम परब्रह्म आहे रामदर्शन' घडविण्यात आले आहे. ही लेखमाला रामकृपेचाच शब्दाविषकर आहे. श्रीराम परब्रह्म आहे रामदर्शन' घडविण्यात आले आहे. ही लेखमाला रामकृपेचाच शब्दाविषकर आहे. श्रीराम परब्रह्म आहे तसेच तो आपला राष्ट्रपुरुष आहे. रामायण हे ना केवळ महाकाव्य आहे, ना धार्मिक ग्रंथ आहे तर आपल्या देशाचा गौरवशाली, अभिमानास्पद सांस्कृतिक इतिहास आहे. याचे सतत स्मरण ठेवून श्रीरामाची 'रामो भूत्वा रामम् यजेत' अशी उपासना करावी. एवढीच सलगीची विनवणी. 'आमुचा राम राम घ्यावा' या संतवचनाने मी या लेखमालेची कृतार्थ मनाने सांगता करतो. जय श्रीराम!

लेखांक ६४

# रामो भूत्वा रामम् यजेत। आमुचा राम राम घ्यावा।

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**आदौ रामतपोवनादि गमनं, हत्वा मृगं कांचनम्।**
**वैदेही हरणं, जटायु मरणं सुग्रीवसम्भाषणम्।**
**वाली निर्दालनं समुद्रतरणं लंकापुरी दाहनम्।**
**पश्चाद्रावण कुम्भकर्ण हननं एतद्धि**
**श्री रामायणम्।।**

आज श्री रामनवमीचा परमपावन दिवस. सारे जग राम नामाने दुमदुमून गेले आहे. अशा पावन दिनी, गेली १५ महिने सुरू असलेल्या माझ्या प्रस्तुत लेखमालेची यथासांग समाप्ती होत आहे. संकल्पपूर्तीचा, साधना सफलतेच्या सिद्धीचा आनंद काही विलक्षण असतो. तो शब्द गोचर नसतो. असाच अनामय आनंद मी आज या 'नित्य विजयी रघुनंदन' लेखमालेचा समारोप करताना अनुभवित आहे. ६५ लेखांची ही लेखमाला मी श्रीराम चरणी अर्पित करतो. 'राम कर्ता, राम करविता' या आत्मभावातून या लेखमालेचा ७ जानेवारी २०२४ रोजी श्रीगणेशा केला होता. अयोध्येमध्ये प्रदीर्घ संघर्षानंतर निर्माण झालेल्या भव्य दिव्य श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याच्या ऐतिहासिक घटनेच्या निमित्ताने ही लेखमाला 'दै.तरुण भारत'ने माझ्याकडून लिहून घेतली. श्रीरामकृपेने ती यशस्वीरित्या पूर्णत्वास गेली.

पंधरा महिन्याच्या या साप्ताहिक लेखमालेत एकूण ६५ लेख प्रकाशित झाले आहेत. त्यामध्ये १३ व्या शतकातील संत निवृत्ती- ज्ञानेश्वर नामदेवांपासून थेट १९ व्या शतकातील नामयोगी गोंदवलेकर महाराज यांच्या 'रामपाठ' पर्यंतच्या संतसाहित्यातील रामदर्शनाचे, लेखांच्या मर्यादित शब्दात अवलोकन केले. तसेच विविध रामायणे, रामकथाकार, वेगवेगळ्या प्रदेशातील रामकथेचे प्रादेशिक शब्दाविष्कार यांचेही आपण शब्ददर्शन केले. गुरू गोविंदासिंहाचे 'रामावतार', आसाममधील माधव कंदलीचे 'रामायण', रामकथेचा विश्वविख्यात मर्मज्ञ डॉ. कामिल बुल्के, मुल्हेर (नाशिक)चा गोस्वामी तुलसीदास शिष्य 'दास जनजसवंत' या व अशा लेखातून बरीच नवी, अपरिचित, दुर्लक्षित माहिती मिळाल्याचे वाचकांचे फोन आले आणि लेखमाला वाचक बारकाईने वाचतात याचा मनस्वी आनंद झाला. सर्व वाचकांना व आवर्जून फोन, ई मेल, व्हाटस्अॅप करणार्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

विश्वसाहित्यात अनेक कथा व महाकाव्ये अजरामर झालेली आहेत. त्यात मिल्टन चे 'पराडाईज लॉस्ट',



कवी होमरचे 'ईलियड'हे प्राचीन ग्रीक काव्य, अशा काही अभिजात रचना प्रसिद्ध आहेत. पण आदि महाकवी वाल्मिकीद्वारा लिखित 'रामायण' ही जगातील सर्वश्रेष्ठ व कालातीत महाकाव्य कथा आहे. तिचा विश्वसंचार व देशोदेशीच्या सांस्कृतिक जीवनावरील अमीट प्रभाव, रामकथेच्या सर्वश्रेष्ठतेचे द्योतक आहे. इंडोनेशिया या मुस्लिम धर्मी देशातील रामकथेचे स्थान, रामकथेच्या लोकविलक्षण प्रभावाचे उत्कट व थक्क करणारे दर्शन आहे.

'रामकथा' ही केवळ भारतीयांचीच नव्हे तर विश्वाची लोकप्रिय कथा झालेली आहे. कारण रामकथा ही प्रेमगाथा आहे. कर्तव्यबोध आणि मानवी मूल्यांचा सुंदर वस्तुपाठ आहे. सामाजिक एकता-समरसतेचे कृतीरूप दर्शन आहे. सद्गुणसमुच्चयाचे विराट देखणे शिल्प आहे. भारतीयांना लाभलेला अनमोल वसा आणि वारसा आहे. ही केवळ काव्यकथा नसून भारताचा सांस्कृतिक इतिहास आहे. एका लोकोत्तर भारतीय महापुरुषाची शौर्य गाथा आहे. स्व. बाळशास्त्री हरिदास म्हणतात, 'रामायण' ही भारतीयांनी जगाला दिलेली अनमोल अक्षर देणगी आहे, हरिदासाची ही उक्ती सार्थ आहे.

अलौकिक गुणसंपदा म्हणजे राम. स्वार्थत्यागाची पराकाष्ठा म्हणजे राम. नीतीधर्मावर अविचल निष्ठा व कठोर पालन म्हणजे राम. अशा सद्गुणस्वरूप रामाला आदर्श- दीपस्तंभ मानून जीवन आचरणारा कोणीही माणूस राम होऊ शकतो.

रामाचे, रामनामाचे गुणगान करायचे ते याचसाठी. 'रामो भूत्वा रामम् यजेत' हेच सकल संतांनी आपणास टाहो फोडून सांगितलेले आहे. तसेच सकल संतांनी श्रीराम तोच श्रीकृष्ण, श्री विठ्ठल आणि शिवशंकर असल्याचे अद्वैत भक्तीतत्त्वाचे, 'एकं सद विप्रा बहुधा वदान्ते' महाबोधाचेही प्रतिपादन करीत सामाजिक, सांस्कृतिक ऐक्याचा संदेश दिलेला आहे. तो या लेखमालेत मी विशेषत्वाने अधोरेखित केलेला आहे. या रामनामाच्या प्रभावामुळेच आपला देश अनेक शतके धर्मांध आक्रमकांच्या पारतंत्र्यात राहूनही कधी हरला नाही. जगाच्या इतिहासातील हे एक आश्चर्य आहे. 'कुछ तो बात है, हस्ती नही मिटी हिदुस्थानकी'. ज्या ज्या वेळी आपल्या देशावर संकटे आली तेव्हा तेव्हा साधुसंतांनी श्रीरामाच्या पुरुषार्थी कथांचे जनजागरण करीत देशात स्वत्व, स्वाभिमानाचे स्फुल्लिंग चेतवले. गोस्वामी तुलसीदासांचे 'रामचरितमानस', संत एकनाथांचे 'भावार्थ रामायण', संत रामदासांचे 'दास रामायण' यांनी केलेल्या लोकजागृतीद्वारे धर्मरक्षणाचे महान कार्य केले हे आता सर्वश्रुत, सर्वमान्य झालेले आहे. 'यतो धर्मः ततो जयः', 'सत्यमेव जयते', 'सह नाववतु। सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै।', 'तेन त्यक्तेने भुंजिताम् 'यतो धर्मः ततो जयः', 'सत्यमेव जयते', **'सह नाववतु। सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै।', 'तेन त्यक्तेने भुंजिताम् 'यतो धर्मः ततो जयः', 'सत्यमेव जयते', 'सह नाववतु। सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै।', 'तेन त्यक्तेने भुंजिताम्।'** या व अशा भारतीय प्राचीन महावाक्याचे जीवंत मूर्तीमंत दर्शन म्हणजे रामायण, श्रीरामाची विजिगीषु परमपुरुषार्थी गाथा. रामकथा ही 'अभ्युदय आणि निःश्रेयस' यांचा वस्तुपाठ-बोध आहे. म्हणूनच चिंतकांनी श्रीरामाचे वर्णन 'मूर्तीमंत धर्म', 'रामचंद्रः विग्रहवान धर्मः।' असे केलेले आहे.

अशा परब्रह्म, परमपुरुषार्थी श्रीरामाची मला या लेखमालेच्या योगाने अक्षर सेवा करण्याचे भाग्य लाभले. आता कृतार्थ मनाने मी वाचकांना 'आमचा राम राम घ्यावा।' म्हणतो आणि 'नित्य विजयी रघुनंदन' या लेखमालारूपी अक्षरपूजेची समाप्ती करतो. 'किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी गेले। येथ जी माझे उरले। पाईकपण।।'

**राम जीवन है और मुक्ती भी है।**
**राम आज भी है राम कल भी। (समाप्त)**

!! जय श्रीराम !!

विज्ञान संस्कृती

प्रा. आरती तिवारी

आत्ता, हा लेख वाचत असताना, तुम्ही ५ प्रकारे गतिमान आहात. चमकलात ना! पहा- आपली प्रवृत्ती सूर्याभोवती फिरता फिरता स्वतःभोवती फिरत आहे. या दोन गती झाल्या. सूर्य पूर्ण सौरमंडलासकट आकाशगंगेच्या केंद्राभोवती फिरत आहे, ही झाली तिसरी गती. आपले सर्पिलाकार ब्रह्माण्ड वेगाने उकलत आहे, अशी अनंत कोटी ब्रह्माण्डे अत्यन्त वेगाने एकमेकांपासून दूर जात आहेत, हे विश्व प्रसरण पावत आहे. अशाप्रकारे आपल्या गतीचे ५ आयाम पूर्ण होतात. एक ध्रुवतारा सोडला तर पृत्त्वीवरून संपूर्ण दीप्तमान ब्रह्माण्ड आपल्याभोवती फिरत असल्याचे भासते. खरं तर आपण पण त्यातीलच एक भाग आहोत. ज्याप्रमाणे केवळ आसन, प्राणायाम म्हणजे योगशास्त्र असे अर्धवट ज्ञान बाळगतो अगदी त्याचप्रमाणे केवळ भाकीत वर्तवणे, एवढ्याच संकुचित दृष्टिकोनातून आपण ज्योतिषशास्त्राकडे पाहतो.



गणित, भूगोल, पर्यावरणाशी प्रत्यक्ष संबंध असलेले ज्योतिष हे एक स्वतंत्र कालगणना शास्त्र आहे. सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रांच्या गतींशी निगडित ऋतुचक्र मानवी जीवनाशी संबंधित आहेत. **ज्योतिः सूर्य्यादीनां ग्रहाणां गत्यादिकं प्रतिपाद्यतया अस्त्यस्येति । तत् ग्रहणादिगणनशास्त्रम् इति वेदाङ्गज्योतिषम् ।।** वेदांग ज्योतिष हा महत्त्वाचा ग्रंथ आहे. वैदिक काळात यज्ञाचा मुहूर्त पाहण्यासाठी, वेळ निर्धारणासाठी हे ज्योतिषशास्त्र रचले गेले. पूर्वी जे लोक या क्लिष्ट गणिती क्रिया करून ग्रहण, मुहूर्त इत्यादी वेळा सांगत त्यांना ज्योतिषी म्हणत असत. त्याचाच पुढे अपभ्रंश होऊन जोशी हे आडनाव रूढ झाले. 'सूर्यसिद्धांत' हा खगोलशास्त्रावरील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे, ज्यावर पुढे अनेकांनी टीका लिहिल्या.

१५०० वर्षांपूर्वी वराहमिहीरांनी पंचसिद्धांतिका, ६०० वर्षांपूर्वी गंगाधरने चांद्रमाभिधान हा २०० श्लोकांचा तंत्र ग्रंथ लिहिला, तर ५४७ वर्षांपूर्वी मकरंदने तिथी, नक्षत्र, योग, ग्रहगती अशा महत्त्वपूर्ण बाबींची सारणी बनवली; ज्यावरून तिथी, वार, नक्षत्र, योग, करण या पाच अंगांनी शास्त्रशुद्ध कालगणना करणारे पंचांग विकसित झाले, जे थोड्याफार फरकाने अखिल भारतात प्रचलित आहे. याखेरीज विविध पुराणग्रंथात प्रत्येक तिथी, वार, महिना, राशी संबंधित रंजक कथा आहेत. धार्मिक अधिष्ठानातून सर्वसामान्य माणसाची दिनचर्या, ऋतुचर्या निसर्गचक्राशी जोडून शारीरिक स्वास्थ, सामाजिक समरसता आणि आध्यात्मिक उन्नती साधल्या गेली. अथर्ववेदात सृष्टियुगाचा काळ ४ अब्ज ३२ कोटी वर्षे सांगितला आहे.

१००, अयुत म्हणजे १०,००० त्यांचा गुणाकार १०,००,००० येतो. आता त्याला २३४ अंक उलट्या क्रमाने ४३२ जोडा झाले ४३२,०००,०००. आजचे आधुनिक विज्ञान सांगते की, बिगबँग होऊन ४ अब्जपेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. चित्रादि नक्षत्र अतिशय वेगाने आकाशात फिरत आहेत. चित्राणि साकं दिवि रोचनानि सरीसृपाणि भुवने जवनी नक्षत्रे संवत्सराचा आधार आहेत, संवत्सरो सि नक्षत्रेषु श्रितः नक्षत्राणि संवत्सरस्य प्रतिष्ठा संवसति ऋतवः यास्मिन् तद् संवत्सरः सूर्याच्या संक्रमणाने ऋतुचक्र पूर्ण होणे म्हणजे एक वर्ष पूर्ण झाले. तैत्तरीय संहितेत २७ नक्षत्र आणि त्यांच्या देवतांची नावे दिली आहेत. २७ नक्षत्रांचे हे नभमंडल १२ राशींमध्ये विभागले आहे. जगभरात कोनम ापनाची ाशिरसशीळारश्र ीांशा ही एकच सर्वमान्य पद्धत आहे. आपल्या पूर्वजांनी सूर्यसिद्धांत (१.२८) ग्रंथात पूर्वीच विकसीत केली आहे. **विकलानां कलाषष्ट्याः तत् षष्ट्या भाग उच्यते। तत्रिशतां भवेद्राशिः भगणो द्वादशैव ते ।।** ६० विकला =१ कला; ६० कला =१ भग; ३० भग= १ राशी, १२ राशी = १ भगन (खगोल). आजच्या परिमाणात, १ विकला = १ सेकंद; १ कला = १ मिनिट; १ भग = १ डिग्री, भग व राशीचा गुणाकार ३० १२=३६० अंश नभमंडल म्हणजे ३६० अंशाचे वर्तुळ आणि केंद्रस्थानी पृथ्वी असे मानल्यास, आपल्याला नक्षत्रांच्या दृश्यपटलावर चंद्र व सूर्य एकेका नक्षत्रातून भ्रमण करत आहेत असे दिसेल. पृथ्वीसापेक्ष चंद्रसूर्याच्या गती व स्थिती वरून महिन्यांची गणना केली आहे.

पौर्णिमेला सूर्य ज्या राशीत आहे तो सौरमास आणि चंद्र ज्या नक्षत्रात आहे तो चांद्रमास म्हणून गणला जातो. पौर्णिमेला जर सूर्य मीन राशीत तर चंद्र चित्रा नक्षत्रात असतो. म्हणून सौरमानाचा मीन मास आणि चांद्रमानाचा चैत्र मास असतो. १२ नक्षत्रांचे चैत्र ते फाल्गुन असे १२ चांद्र महिने होतात. सूर्यापेक्षा चंद्र पृथ्वीच्या फार जवळ असल्याने त्याची गती जास्त भासते. परिणामतः अधिकमास तर क्वचित क्षयमास अशी गंमत होते. सूर्याच्या राशी संक्रमणाला ३०.४ दिवस तर चंद्राच्या नक्षत्र संक्रमणाला २९.५ दिवस लागतात. याचा अर्थ चंद्राचे नक्षत्र संक्रमण सूर्याच्या राशी संक्रमणाच्या सुमारे १ दिवस अगोदर पूर्ण होते. ३० महिन्यांनी हा कालावधी ३० दिवसांचा होतो तेव्हा या चांद्रमासाला अधिकमास म्हणतात. अधिकमास ही ग्रेगेरीयन कॅलेडरच्या लीप इयरप्रमाणे केलेली तरतूद नसून अवकाशातील वास्तवाची दिनदर्शिकेत केलेली गणना आहे. फाल्गुन ते आश्विन हेच ८ महिने अधिक येऊ शकतात आणि कार्तिक ते पौष यांच्यातीलच एखाद्या महिन्याचा क्षय होऊ शकतो.

माघ कधीच अधिक किंवा क्षय होत नाही. सूर्य प्रतिदिन ६० वा भाग म्हणजे एक घटिका छेद करतो याप्रमाणे एका वर्षात ६ दिवस आणि अडीच वर्षात १५ दिवस वाढवतो. त्याचप्रमाणे चंद्र अडीच वर्षात १५ दिवस कमी करतो. म्हणजेच अडीच वर्षानंतर दोघांमध्ये ३० दिवसांचे अंतर पडते. (पान ६ वर)

थोडं मनातलं


विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

गीतांजलीचे इंग्रजीत भाषांतर झाले आणि इंग्रजी आवृत्ती प्रसिद्ध झाली. इंग्लंडमधील ख्यातनाम साहित्यिकांच्या वर्तुळात त्यांच्या कवितांचे वाचन होऊ लागले आणि रवींद्रनाथांना थोर साहित्यिक म्हणून जागतिक मान्यता प्राप्त होऊ लागली. त्यानंतर लगेचच त्यांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाला नोबेल पुरस्कार मिळाला आणि जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून त्यांच्यावर जणू शिक्कामोर्तब झाले. ब्रिटिश सरकारने देखील त्यांचा गौरव करून त्यांना 'सर' ही पदवी दिली. तर कलकत्ता विद्यापीठाने त्यांना सन्माननीय डॉक्टरेट पदवी बहाल केली.

रवींद्रनाथ भारतीय संस्कृतीचे आणि परंपरांचे अभिमानी होते. कोणीतरी देशाच्या भौगोलिक सीमा ओलांडून भारतीयांची ही दिव्य संस्कृती आणि परंपरेची ओळख जगाला करून द्यावी, असे त्यांना वाटत होते. पण रवींद्रनाथ स्वतःच स्वक्षमतेचा विकास आणि आपले साहित्य समृद्ध करून स्वतःला यासाठीच जणू सिद्ध करत होते. त्या काळातील थोर राजकीय नेते लोकमान्य टिळक यांचा रवींद्रनाथ यांच्या भारतीय संस्कृतीची ओळख जगाला व्हावी, या भूमिकेला पाठिंबा होता. रवींद्रनाथच भारताचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक अग्रदूत बनून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला अप्रत्यक्षपणे मदत करू शकतील याची त्यांना खात्री होती. त्यामुळे रवींद्रनाथांना केवळ पाठिंबा देऊनच लोकमान्य थांबले नाहीत तर त्यांनी एका व्यक्तीमार्फत पन्नास हजारांची रक्कम त्यांना पाठवली आणि राजकीय घडामोडीत न पडता भारताच्या वतीने परदेशात भारतीय संस्कृतीचे अग्रदूत म्हणून कार्य करावे असा संदेश पाठवला. यामध्ये आपल्याला लोकमान्य टिळकांची दूरदृष्टी आणि रवींद्रनाथांवरील असलेला विश्वास दिसून येतो.

रवींद्रनाथांचे संवेदनशील मन, तीव्र बुद्धी, भारतीय संस्कृतीचे ज्ञान आणि विचारांचे उपजत सामर्थ्य यावर लोकमान्य टिळकांचा विश्वास होता. रवींद्रनाथ यांना युरोपात एक महान कवी म्हणून गौरव प्राप्त झाला होताच. त्यामुळे तेच आता




## भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ

भारताचे प्रतिनिधी म्हणून उत्तम कार्य करू शकतील याची त्यांना खात्री होती. सुदैवाने रवींद्रनाथांना प्रवासाची आवड होतीच. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी व्यक्त केलेल्या बऱ्याच अपेक्षांची पूर्ती रवींद्रनाथांकडून झाली. त्यांनी व्यक्त केलेला विश्वास रवींद्रनाथांनी सार्थ ठरवला.

रवींद्रनाथांना व्याख्यानासाठी जगभरातील ठिकठिकाणची निमंत्रणे येत. बऱ्याच प्रसंगी ते आपल्या सोबत आपले मित्र आणि चाहते यांनाही सोबत घेऊन जात असत. आपल्याला आलेल्या अनुभवाच्या नोंदी रवींद्रनाथ करून ठेवत असत किंवा पत्रातून त्या इतरांपर्यंत पोहोचवत. १९१४ ते १९३२ या कालावधीत रवींद्रनाथांनी अनेक पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देशांना भेटी दिल्या. या भेटीदरम्यान त्यांना अनेक वेगवेगळ्या अनुभव आले. अनेक महनीय व्यक्तींच्या गाठीभेटी झाल्या. त्यापैकी बऱ्याच व्यक्तींनी त्यांना त्यांच्या पुढील कार्यात मदतही केली. अनेक ठिकाणी त्यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. अनेक ठिकाणी त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भरली. प्रत्येक ठिकाणी पाहिलेल्या आणि त्यांना भारतासाठी चांगल्या वाटलेल्या गोष्टींची दखल त्यांनी घेतली. त्यातील बर्याच गोष्टी शांतिनकेतन आणि श्रीनिकेतनच्या माध्यमातून भारतीयांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

जपानमध्ये तीन महिने त्यांचे वास्तव्य होते तेथील त्यांच्या वास्तव्यात जपान मधील ग्रामीण भागातील लोकजीवन त्यांनी जवळून पाहिले. जपानमधील निसर्ग सौंदर्य त्यांना खूप आवडले. जपान म्हणजे पर्वतांच्या रांगा, झुळझुळणारे झरे, विस्तीर्ण किनाऱ्यावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटा आणि संरक्षण करण्यासाठी उभा ठाकलेला आणि बर्फाची टोपी परिधान केलेला फुजियामा पर्वत! त्यांना असे आढळले की जपानी लोकांजवळ मोठ्या प्रमाणावर सौंदर्यदृष्टी आहे आणि तेथील अगदी गरीबातील गरीब माणूस ज्याला दोन वेळेचे पुरेसे अन्न सुद्धा मिळत नाही असा माणूस सुद्धा एका पेनीची फुले विकत घेतो. त्याच्या दृष्टीची आणि सौंदर्याची भूक त्याच्या पोटाच्या भुकेपेक्षा काकणभर देखील कमी नाही. जपानमध्ये अनेक ठिकाणी सादर करण्यात आलेले नृत्य पाहून रवींद्रनाथ भारावून गेले. त्यांच्या नृत्यात त्यांना विनय आढळला. कारण ते (जपानी लोक) फक्त सौंदर्यदृष्टीने त्याकडे बघत होते. रवींद्रनाथ त्यांच्या नृत्याबद्दल म्हणतात, एक दिवस मी जपानी नृत्याचा कार्यक्रम पाहायला गेलो, तेव्हा मला असं दिसलं की हे नृत्य म्हणजे अंगप्रत्यंगाच्या हालचालीचे संगीत आहे.

आपल्या देशातील वीणेवर छेडल्या जाणाऱ्या संगीताशी याची तुलना होऊ शकते. दोन भागात हे सादर करीत असतानाही मध्ये थांबत नाही. वेगवेगळ्या टप्प्यात अंतर भासत नाही. अगर दोन भाग सांधत असताना जाणवत देखील नाही. पूर्ण अंग चढत जाणार्या वेलीसारखं उंचावतं आणि जणू सौंदर्य फुलांची उधळण करतं. जपानी नृत्य हे शुद्ध नृत्य आहे. या नृत्याच्या पोशाखात थोडेही अंग उघडे पडण्यास वाव नाही. इतर देशातील नृत्यात अंगप्रत्यंगाच्या हालचाली बरोबर कामुक हावभावांचे देखील मिश्रण असते. ह्या नृत्यात मात्र अशा भावना सुचित सुद्धा होत नाहीत. त्यानंतर मेजर पाँड यांच्या आमंत्रणावरून ते अमेरिकेला गेले. तेथे अनेक ठिकाणी त्यांची व्याख्याने झाली. तिथे त्यांच्या शांतीनिकेतनच्या शाळेविषयी ते बोलले. सृष्टीद्वारे मानव स्वतःचे क्षितिज उंचावू शकतो आणि पुनर्जन्म घेऊ शकतो ही कल्पना त्यांनी तिथे मांडली. तेथील त्यांची व्याख्याने 'पर्सनॅलिटी' या पुस्तकात संकलित करून प्रसिद्ध करण्यात आली. त्यांनी हे पुस्तक आपले त्यावेळचे जवळचे मित्र सी एफ अँड्र्युज यांना अर्पण केले.

त्यांच्या इंग्लंड आणि अमेरिकेच्या केलेल्या पुढील दौऱ्यात मात्र त्यांचे व्हावे तसे स्वागत झाले नाही. त्याचे एक कारण म्हणजे इंग्रजांनी जालियनवाला बाग येथे केलेल्या निष्पाप लोकांच्या हत्याकांडाच्या निषेधार्थ रवींद्रनाथांनी आपली 'सर' ही पदवी परत केली होती. ब्रिटिश लोक साधारणपणे स्वभावाने अतिथ्यशील असतात. परंतु जिथे त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेशी विपरीत असलेली कोणतीही गोष्ट घडते, तेव्हा मात्र ते तितक्याच अलिप्ततेच्या भावनेने वागतात हा अनुभव त्यांना इंग्लंडमध्ये आला. त्यांच्या या प्रवासादरम्यान इंग्लंड आणि अमेरिकेत झालेली औद्योगिक क्रांती त्यांनी पाहिली. प्रचंड यंत्रे आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या वस्तूंनी मानवी जीवनावर आक्रमण केले आहे हे त्यांच्या लक्षात आले. काही गोष्टींची माणसाला गरज नसतानाही केवळ मुबलक निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या उपभोगासाठी कृत्रिम गरजा निर्माण केल्या जात आहेत असे त्यांना जाणवले. अतिरिक्त तांत्रिक आणि यांत्रिक विकासामुळे मानवाभोवती एक कवच निर्माण होऊन तो नैसर्गिक गोष्टींपासून दूर जाईल अशी भीती त्यांना वाटू लागली. मानव यंत्राद्वारे संपत्ती निर्माण करतो आहे पण आध्यात्मिक मूल्यांचा त्याग करून त्यासाठी मोठी किंमत तो मोजतो आहे. मानवाने स्वतःभोवती निर्माण केलेला पिंजरा जरी सुवर्णाचा असला तरी तो बाहेरच्या जगाचा संबंध तोडून टाकतो. आपले हे विचार स्पष्ट करण्यासाठी त्यांनी घरटे आणि पिंजरा यांचे रूपक वापरतात. ते म्हणतात, पाखराला घरट्याची गरज असते ती निवाऱ्याचे स्थान म्हणून. त्यामुळे त्याला भराऱ्या मारण्यासाठी अटकाव होत नाही. परंतु जेव्हा तो पिंजऱ्यात असतो तेव्हा त्याला राहण्यासाठी उत्तम निवारा मिळतो. पण तो आकाशात भरारी मारण्याचे त्याचे स्वातंत्र्य गमावून बसतो. तांत्रिक ज्ञान हे काही मर्यादेपर्यंतच आर्थिक सुरक्षितता आणि आराम देऊ शकते. परंतु दुसऱ्या बाजूने जर तंत्रज्ञानाचा विकास असाच सुरू राहिला तर वस्तुस्थिती अशी होते की मानव स्वतःच्या गरजा गुणकाने वाढवून घेऊन स्वतःलाच त्या पिंजऱ्यात बंद करून घेतो. रवींद्रनाथांचे हे विचार आजही कालबाह्य झालेले नाहीत किंबहुना आज त्यावर विचार करण्याची आवश्यकता आहे. (क्रमशः)

# ग्रहसंकेत

## (रविवार, ६ एप्रिल ते शनिवार, १२ एप्रिल २०२५)

**नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर**

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ६ -एप्रिल-** श्रीराम नवमी, देवीला दवणा वाहणे, देवी नवरात्र समाप्ती, सिध्दारूढ स्वामी जयंती, श्री स्वामी नारायण जयंती, श्री रामदास स्वामी जयंती, श्रीसाईबाबा उत्स्व शिर्डी, भाजपा स्थापना दिन ✻ **सोमवार, ७ एप्रिल-** जागतिक आरोग्य दिन, खंडोबा लंगर यात्रा मंगसुळी, भैरवनाथ यात्रा गिरीम (ता. दौंड), विष्णुबाबा महाराज पुण्यतिथी बिसूर (मिरज) ✻ **मंगळवार, ८ एप्रिल-** कामदा एकादशी, श्रीकृष्ण दोलोत्सव, शंभू महादेव यात्रा शिखर-शिंगणापूर, श्री लक्ष्मीपल्लीनाथ वार्षिकोत्सव पाली (रत्नागिरी), चैत्री यात्रा पंढरपूर, ललितोत्सव, रामेश्वर मंदिर आकेरी, श्रीराम रथोत्सव चाफळ, केतकेश्वर महाराज यात्रा निमगाव केतकी, श्री महादेव यात्रा उपळे (दु.) ता. बार्शी ✻ **बुधवार, ९ एप्रिल-** विष्णूला दवणा वाहणे, भैरवनाथ यात्रा बहिरेवाडी, श्री चिंचेश्वर यात्रा मांगरूळ (ता. शिराळा), भैरवनाथ यात्रा तुजारपूर व थानापुडे (ता. वाळवा), काळेश्वरीदेवी यात्रा नांदगिरी, स्वयंभू महादेव यात्रा बिरनवाडी (ता. तासगाव) ✻ **गुरुवार, १० एप्रिल-** भगवान महावीर जयंती, प्रदोष, चरपटीनाथ यात्रा वनकुटे (ता. पारनेर), नृसिंह यात्रा जुळेवाडी (ता. तासगाव), डोंगर यात्रा कर्जत (रायगड) ✻ **शुक्रवार, ११ एप्रिल-** महात्मा ज्योतिबा फुले जयंती, महादेवाला दवणा वाहणे, दमनक चतुर्दशी, हनुमान जयंतीचा उपवास, दमनक चतुर्दशी, नृसिंह दोलोत्सव, पौर्णिमा उ. रात्री ३.२१ नंतर महादेवाला दवणा वाहणे ✻ **शनिवार, १२ एप्रिल-** हनुमान जयंती, वैशाख मासारंभ, अन्वाधान, कुलधर्म, छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी, मन्वादि, सर्व देवांना दवणा वाहणे, श्री ज्योतिर्लिंग यात्रा कोल्हापूर, श्री तुळजाभवानी यात्रा तुळजापूर, सप्तश्रृंगीदेवी यात्रा नांदुरी, अक्कमहादेवी जयंती, चैत्री पौर्णिमा, आयंबील ओळी समाप्ती (जैन)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ६, १० एप्रिल (१२ नंतर), ११ एप्रिल ✻ डोहाळ जेवण- ६, ११ (१५ नंतर), १६ एप्रिल ✻ बारसे- ६, १० एप्रिल (१२ नंतर) ✻ जावळ- ६ एप्रिल ✻ गृहप्रवेश- १० एप्रिल (१२ पर्यंत)

### मेष :- वाद घरातच राहू द्या

ध्येय कितीही उंच असू द्या. रस्ता नेहमी आपल्या पायाखालीच असतो. चौथा मंगळ, बारावा शनि त्यामुळे धनस्थ गुरूवरच आपली पुढील वाटचाल अवलंबून आहे. नोकरी, व्यवसायात जागरूक रहावे. घरातील वाद घरातच राहू द्या, वाढवू नका. आर्थिक व्यवहार विचाराने करावेत. फार दगदग करू नका. विश्रांतीची गरज भासेल. डोळ्यांची काळजी घ्यावी. शुभ ता. ६, १०, ११

### वृषभ:-गृहसौख्य लाभेल

जगात अशी कोणतीही व्यक्ती नाही, जिला समस्या नाही. राशीतील गुरूमुळे आत्मविश्वासाने सामोरे जावे, यश मिळेल. प्रगतीचे विविध मार्ग लाभतील. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. उत्साहवर्धक घटना घडतील. अपेक्षित प्रगती होत जाईल. अडचणींची चिंता नको. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. गृहसौख्य लाभेल. शुभ ता. ७, १०, ११

### मिथुन:-कार्यक्षेत्रात संघर्ष

जगात अशी कोणतीही समस्या नाही, जी सोडविण्यासाठी उपाय नाही. धनात मंगळ तर व्ययात गुरू त्यामुळे जमा खर्चाची योग्य तोंड मिळवणी करू शकाल. कार्यक्षेत्रात संघर्ष करावा लागेल. वादाचे प्रसंग टाळावेत. नोकरी, व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. नोकरीत अधिकार वाढतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघेल. शुभ ता. ६, १०, १२

### कर्क:- दगदग नको

यश मोफत मिळत नसते. आळस, भिती, बहाणा सोडावा लागतो. पंचमेश, दशमेश मंगळ राशीत आहे. त्यामुळे कामाची व्याप्ती वाढणार आहे. आर्थिक स्थिती समाधानकारक राहिल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. कला-गुणांचा विकास होईल. उष्णतेपासून जपून असावे. फार दगदग करू नये. शुभ ता. ६, ९

### सिंह:- नव्या संधी लाभतील

विश्वासाचा धागा प्रेमाच्या विशुध्द स्वरूपात अवलंबून असतो. अष्टमात ५/६ ग्रह एकत्रित आले आहेत. त्यामुळे प्रकृतीच्या तक्रारींकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. नव्या आव्हानांना तोंड द्यावे लागेल. खर्चाचे प्रसंग राहतील. सर्व बाबतीत जपून असावे. नव्या संधी लाभतील. विचारांना स्विकारावे. शुभ ता. ६, १०

### कन्या:- भाग्योदयकारक घटना

आयुष्यात जे मिळेल ते पचवायला शिका. पचले नाही तर आजार वाढतात. राशी समोर शुभाशुभ ग्रह आहेत. मनाचे संतूलन बिघडू देवू नका. घाईने निर्णय घेऊ नका. भाग्योद्यकारक घटना घडतील. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान वाटेल. कामात धरसोडपणा टाळावा. नव्या विचारांना चालना मिळेल. वैद्यकिय, कृषि क्षेत्रात अपेक्षित प्रगती घडेल. शुभ ता. ६, ९

### तुला:- संघर्षातून प्रगती

कोणांकडून अपेक्षा ठेवून नाराज राहू नका. निरपेक्ष कार्य खरे समाधान देते. षष्ठांतील ग्रहांमुळे कार्यक्षेत्रात प्रयत्नाने चांगले यश मिळवू शकाल. नव्या संधी लाभतील. संघर्षातून अपेक्षित प्रगती साधता येईल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान वाढेल. सरकारी कामे करून घ्यावीत. प्रगतीच्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ६, ९

### वृश्चिक:- नव्या कामांना गती

प्रेम म्हणजे फक्त आनंद लुटणे असे नाही. दुःख घेणे देखीलही असते. अनुकूल ग्रह स्थिती लाभल्याने समाधान वाटेल. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. नव्या कामांना गती मिळेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. प्रगतीच्या घटना घडतील. अडचणी कमी होतील. संततीच्या हित संबंधाकडे अधिक लक्ष द्यावे. शुभ ता. ९, १०, ११

### धनु:-जपून असावे

जुन्या दुःखाना मागे सोडून नव्या संधीचे स्वागत करावे. सुखस्थानी शुभा शुभ ग्रहांचा मेळावा भरला आहे. नोकरी, व्यवसायात जागरूक रहावे. विनाकारण केलेली धावपळ त्रासदायक ठरेल. प्रकृती सांभाळून कामाचा व्याप वाढवावा. अडचणी आल्या तरी त्यातून मार्गही निघत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. जपून असावे. शुभ ता. ६, १०

### मकर:- सामंजस्याने रहावे

आपल्याला चटे देणारे काही दिवे तेच असतात, ज्यांना आपण वाऱ्यामुळे विझताना वाचवलेले असते. अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. नव्या योजना आता मार्गी लावता येतील. घाईने निर्णय घेऊ नका. अपेक्षित संधी लाभणार आहे. कला गुणांचा विकास होईल. शुभ ता. ६, ११

### कुंभ:- अपेक्षित संधी लाभतील

चांगल्या सोबत चांगले व्हा, पण वाईटाशी वाईट नाही. स्पर्धांमध्ये यश मिळेल. आर्थिक प्रगतीसाठी अधिक प्रयत्नांची गरज भासेल. सरकारी नोकरीत अनुकूलता वाढेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. ९, १०

### मीन:-प्रगतीच्या घटना

चांगल्या वेळेपेक्षा चांगल्या माणसांशी हितसंबंध ठेवावा. चांगला माणूस चांगली वेळ आणू शकतो. राशीत षष्ठग्रही झालेली आहे. त्यामुळे विचारात धरसोडपणा टाळावा. स्पर्धांमध्ये यश मिळेल. उपजत कला-गुणांचा विकास होत जाईल. नव्या कामांना गती मिळेल. प्रगतीच्या घटना घडतील. अडचणी कमी होतील. उत्साहवर्धक घटना घडतील. विचाराने रहावे. शुभ ता. ९, १०

!! शुभ भवतु !!

पान ५ वरून

## १०८

जर ग्रीष्म ऋतुत अधिकमास आला तर पाच वर्षानंतरचा अधिकमास हेमंत ऋतूत येईल. सूर्यचंद्रामधील भोगांश पौर्णिमेला १८० अंश तर अमावास्येला ० अंश असतो. चंद्राच्या लंबवर्तुळाकार परिभ्रमणामुळे प्रतिपदा, द्वितीया याप्रमाणे तिथी होतात. एका तिथीचा अवधी २० ते २७ तासांचा असू शकतो. म्हणून बऱ्याचदा एकाच दिवशी दुपारपर्यंत एक तिथी आणि नंतर पुढील तिथी सुरू होते. कृष्णपक्ष- शुक्लपक्ष असे एका महिन्याचे दोन भाग होतात.



डोळ्यांची १ उघडझाप= १ निमिष, १५ निमिष= काष्ठ , ३० काष्ठ= १ कला, ३० कला = १ मुहूर्त, ३० मुहूर्त= १ दिवस रात्र, ३० अहोरात्र= १ महिना, ६ महिने= १ अयन, २ अयन= १ वर्ष, १२,००० दिव्य वर्षे= ४ युगे= १ ब्रह्म दिवस. पृथ्वीवर सूर्यचंद्राचा गुरुत्वप्रभाव सर्वात जास्त, सूर्य बुद्धीचा तर चंद्र मनाचा कारक, म्हणून सप्ताहाचे सुरुवातीचे दोन दिवस रविवार, सोमवार आहेत.

पृथ्वीसदृश आहे म्हणून भूमिज, लाल दिसतो म्हणून अंगारक अशी मंगळ ग्रहाची नावे आहेत. सर्वात लहान, लक्षपूर्वक पाहिले तर जो ग्रह दिसतो तो बुध. जो सर्वात मोठा ग्रह तो गुरू. 'शनैः चरती इति शनिचरः' मंदगतीने चालतो म्हणून शनी. असुरांचे गुरू शुक्राचार्यांवरून राहिलेल्या ग्रहाचे नाव शुक्र. प्रत्येक युगात असुरी प्रवृत्ती असणारच याचे द्योतक.

गुणवैशिष्ट्यांवरून ग्रहांना असलेली नावे आपल्या पूर्वजांचे सखोल ग्रहज्ञान दर्शवतात तसेच वारांना त्यांची नावे देऊन त्यांचा गुरुत्वप्रभाव पृथ्वीवर पर्यायाने आपल्यावर पण होतो हे सांगतात. फक्त मनाचे नियमन करून, शांत ठेवूनच आपण होणारा त्रास कमी करू शकतो. साधारणपणे मानव मिनिटाला १५ या प्रमाणात दिवसाला १०८०० आणि रात्री १०८०० श्वास घेतो. त्यापैकी किमान १०८ श्वास तरी आध्यात्मिक साधनेत घालावेत म्हणून जपमाळेचे मणी, प्रदक्षिणा, मंत्रपठण, अष्टोत्तर स्तोत्र अशा सर्व धार्मिक प्रथांमध्ये १०८ संख्येला महत्त्व देत खगोलाशी संधान साधले आहे. पाच इंद्रिये व मन, बुद्धी, अहंकार या अष्टधा (८) प्रकृतीच्या नियमनाने मायेचा भ्रमगोल (०) भेदून एकच एक (१) परमतत्त्वाशी एकरूप व्हा, हाच संदेश १०८ संख्या दर्शवते.

**केंद्र सरकारने 'राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन' अंतर्गत परिवहन क्षेत्रासाठी घेतलेल्या निर्णयानुसार, देशातील प्रमुख महामार्गांवर हायड्रोजनवर चालणाऱ्या बस आणि ट्रक्सची चाचणी घेतली जाईल. हे मिशन अर्थव्यवस्थेचे डीकार्बोनायझेशन, जीवाश्म इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि ग्रीन हायड्रोजनच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाचा अवलंब आणि बाजारपेठेतील नेतृत्व प्राप्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल. त्याचा हा परिचय.**

# जीवाश्म इंधनाला पर्यावरणपूरक पर्याय

वेध
शंतनू चिंचाळकर




ग्रीन हायड्रोजन आणि त्याच्या डेरिव्हेटिव्हजचे उत्पादन, वापर आणि निर्यात यासाठी भारताला जागतिक केंद्र बनवणे हे केंद्र सरकारचे स्वप्न आहे. स्वच्छ ऊर्जेद्वारे स्वावलंबी होण्याच्या भारताच्या उद्दिष्टात ते योगदान देईल आणि जागतिक स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी एक प्रेरणा म्हणून काम करेल. हे मिशन अर्थव्यवस्थेचे डीकार्बोनायझेशन, जीवाश्म इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि ग्रीन हायड्रोजनच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाचा अवलंब आणि बाजारपेठेतील नेतृत्व प्राप्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल.

केंद्र सरकारने 'राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन'अंतर्गत परिवहन क्षेत्रासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार देशातील प्रमुख महामार्गांवर हायड्रोजनवर चालणाऱ्या बस आणि ट्रक्सची चाचणी सुरू केली जाईल. यामध्ये पुणे-मुंबई महामार्गाचा समावेश आहे. हायड्रोजनच्या वापरामुळे देशातील पर्यावरणीय धोक्यांची पातळी कमी होईल आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला जाईल. नवीनीकरणीय आणि अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाने या मिशनला चालना देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. वाहनांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हायड्रोजनचा वापर सुरू करण्यात येणार असून यासाठी पाच पथदर्शी प्रकल्पांची मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांतर्गत ३७ वाहने (बस आणि ट्रक) आणि ९ हायड्रोजन रिफ्युएलिंग स्टेशन्स स्थापित केले जातील.

टाटा मोटर्स, रिलायन्स इंडस्ट्रिज, एनटीपीसी, अशोक लेलँड, बीपीसीएल, आयओसीएल अशा प्रमुख कंपन्यांनी या प्रकल्पांसाठी मंजुरी मिळविली आहे. ग्रेटर नोएडादिल्ली-आग्रा, भुवनेश्वर-कोणार्क-पुरी, अहमदाबाद-बडोदा-सुरत, साहिबाबादफरिदाबाद-दिल्ली, पुणे-मुंबई, जमशेदपूरकलिंगनगर, तिरुअनंतपुरम-कोची, कोचीएडापल्ली, जामनगर-अहमदाबाद आणि विशाखापट्टणम-बय्यावरम या १० मार्गांवर हायड्रोजन वाहने धावतील. यामुळे हायड्रोजनच्या वापरावर आधारित वाहतूक तंत्रज्ञानाच्या विकासाला मोठा धोरणात्मक लाभ होईल. ऑईल इंडिया लिमिटेडने २० एप्रिल २०२२ रोजी आसाममधील जोरहाट पंप स्टेशनवर भारतातील पहिला ९९.९९९ टक्के शुद्ध ग्रीन हायड्रोजन पायलट प्लांट सुरू केला. त्याची स्थापित क्षमता प्रती दिन १० इतकी असून तीन महिन्यांच्या विक्रमी वेळेत कार्यान्वित झाली आहे. राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन हे जागतिक स्तरावर ग्रीन हायड्रोजनचे उत्पादन आणि निर्यात करण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने ४ जानेवारी २०२२ रोजी हे अभियान सुरू केले.

या अभियानाद्वारे २०३० पर्यंत दरवर्षी ५० लाख टन ग्रीन हायड्रोजनचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानाद्वारे ग्रीन हायड्रोजन आणि त्याच्या डेरिव्हेटिव्हजचे उत्पादन, वापर आणि निर्यात यासाठी भारताला जागतिक केंद्र बनवणे, स्वच्छ ऊर्जेद्वारे स्वावलंबी होण्याच्या भारताच्या उद्दिष्टामध्ये योगदान देणे आणि जागतिक स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी एक प्रेरणा म्हणून काम करणे ही उद्दिष्ट्ये ठेवली गेली आहेत. २०३० पर्यंत आठ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि सहा लाखांपेक्षा अधिक नोकऱ्या निर्माण करणे हे मिशनचे उद्दिष्ट आहे. २०३० पर्यंत अंदाजे ५० दशलक्ष मेट्रिक टन कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन रोखणे अपेक्षित आहे. हे मिशन ग्रीन हायड्रोजनची मागणी, उत्पादन, वापर आणि निर्यातीला प्रोत्साहन देईल. मिशनसाठी प्रारंभिक परिव्यय १९,७४४ कोटी रुपये असेल, ज्यामध्ये साइट प्रोग्रामसाठी १७,४९० कोटी रुपये, पथदर्शी प्रकल्पांसाठी १४६६ कोटी रुपये, मिशनच्या इतर घटकांसाठी रु. ३८८ कोटी यांचा समावेश आहे. संबंधित घटकांच्या अंमलबजावणीसाठी द्वारे योजना मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जातील. कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारचे सचिव आणि उद्योग तज्ज्ञ यांचा समावेश असलेला गट या मिशनला मार्गदर्शन करेल, तज्ज्ञांचा समावेश असलेला सल्लागार गट वैज्ञानिक आणि तांत्रिक बाबींवर सल्ला देईल.

परिवहन क्षेत्रात हायड्रोजनच्या वापरासाठी व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य तंत्रज्ञान विकसित करणे आणि हायड्रोजन रिफ्युएलिंग स्टेशनसारख्या आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करणे हा या प्रकल्पांचा उद्देश आहे. सरकारने या प्रकल्पासाठी २०८ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर केले आहे. अंदाजे १८ ते २४ महिन्यांमध्ये हे प्रकल्प पूर्ण होतील. ४ जानेवारी २०२३ रोजी 'हरित हायड्रोजन मिशन' सुरू करण्यात आले. भारताला ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी बनवणे हा या मिशनचा उद्देश आहे. या मिशनसाठी २०२९-३० पर्यंत १९,७४४ कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. ग्रीन हायड्रोजनच्या वापराने देशात अक्षय ऊर्जा निर्मितीचा वेग वाढवून पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना दिली जाईल. देशभरातील १२५ गिगावॉट अक्षय ऊर्जेच्या क्षमता आणि पाच मिलियन मेट्रिक टन ग्रीन हायड्रोजन उत्पादन क्षमता हे या मिशनचे मुख्य उद्दिष्ट आहे. मिशनच्या सुरुवातीच्या टप्प्यात २०२९ पर्यंत १७,४९० कोटी रुपयांच्या खर्चासह दोन स्वतंत्र वित्तीय प्रोत्साहन व्यवस्था प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. मिशन पुढे जाईल तसतसे बाजार आणि तंत्रज्ञानाच्या विकासानुसार विशिष्ट प्रोत्साहन योजना आणि कार्यक्रम तयार केले जातील. उपकरणांची गुणवत्ता आणि कार्यप्रदर्शन सुनिश्चित करण्यासाठी, ग्रीन हायड्रोजन आणि त्याच्या डेरिव्हेटिव्हजच्या खरेदीसाठी स्पर्धात्मक बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी पात्रता निकष हे निर्दिष्ट करतील की उपकरणे भारत सरकारने मंजूर केलेल्या विशिष्ट गुणवत्ता आणि कार्यक्षमतेच्या निकषांनुसार प्रकल्पात वापरली जाणे आवश्यक आहे.

हरित हायड्रोजन मिशनच्या सहायक धोरणांमुळे आणि धोरणात्मक भागीदारीद्वारे ग्रीन हायड्रोजन निर्यात संधी निर्माण होतील. हरित हायड्रोजन किंवा ग्रीन अमोनिया, ग्रीन मिथेनॉल इत्यादी डेरिव्हेटिव्ह उत्पादनांच्या वापरातील किमान हिस्सा भारत सरकार नियुक्त ग्राहकांद्वारे ऊर्जा किंवा फीडस्टॉक म्हणून निर्दिष्ट करेल. अशा किमान वापराचा वर्षनिहाय मार्गक्रमण अधिकार प्राप्त गटाद्वारे ठरवला जाईल. ग्रीन हायड्रोजन आणि ग्रीन अमोनियाची खरेदी स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे केली जाईल. ग्रीन हायड्रोजन आणि अक्षय ऊर्जा स्त्रोतांपासून उत्पादित केलेल्या डेरिव्हेटिव्हजच्या प्रमाणीकरणासाठी योग्य नियामक व्यवस्थादेखील लागू केली जाईल. ग्रीन हायड्रोजन उत्पादनासाठी नवीकरणीय ऊर्जेचे वितरण सुलभ करण्यासाठी विविध हरित हायड्रोजन प्रकल्पांसाठी धोरणात्मक तरतुदींमध्ये ग्रीन हायड्रोजन उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या अक्षय ऊर्जेसाठी आंतर-राज्य पारेषण शुल्क माफ करणे, अक्षय ऊर्जा साठवण सुलभ करणे, कालबद्ध मुक्त प्रवेश आणि कनेक्टिव्हिटी प्रदान करणे समाविष्ट आहे. स्वच्छ उर्जा स्त्रोत म्हणून ग्रीन हायड्रोजनच्या वापराला गती देणे हे नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशनचे उद्दिष्ट आहे. ते पुरवठा साखळींच्या विकासास समर्थन देईल जे हायड्रोजनची कार्यक्षमतेने वाहतूक आणि वितरण करू शकतात. यामध्ये निर्यातीसाठी तसेच स्वदेशी वापरासाठी पाईपलाईन, टँकर, मध्यम प्रवाहातील साठवण सुविधा आणि लास्ट माईल वितरण नेटवर्कचा समावेश आहे. मिशनअंतर्गत सार्वजनिकखाजगी भागीदारी व्यवस्था याची सोय केली जाईल. या व्यवस्थेसाठी उद्योग आणि संबंधित सरकारी संस्थांच्या योगदानासह समर्पित निधी तयार करणे आवश्यक आहे. या संस्था खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने सर्वसमावेशक ध्येयकेंद्रित संशोधन आणि नावीन्यपूर्ण कार्यक्रम तयार करण्यासाठी संसाधने एकत्रित करतील.

देशातील काही शहरे पर्यावरणाच्या दृष्टीने आदर्श मानली जातात. राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनद्वारे देशातील महत्त्वाची शहरे हरित आणि पर्यावरणपूर्वक बनावित, यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. चंदीगडनंतर गांधीनगर हे भारतातील दुसरे पूर्णपणे नियोजित शहर मानले जाते. त्याला हरित नगर म्हणतात. येथे सचिवालय आणि मंत्र्यांची निवासस्थानेही आहेत. म्हैसूर शहर कार्यक्षम ड्रेनेज आणि सांडपाणी प्रणालीसाठी ओळखले जाते. हे शहर केवळ ग्रीन सिटी म्हणून ओळखले जात नाही, तर हिरवे आणि स्वच्छ असल्याचेही म्हटले जाते. यामुळे ते भारतातील सर्वात राहण्यायोग्य शहरांपैकी एक मानले जाते. शाश्वत विकासाच्या यशस्वी मॉडेलद्वारे २००१ मध्ये १०.२ टक्क्यांवरून २०२१ मध्ये २३.०६ टक्क्यांपर्यंत हरित कव्हरसह दिल्ली हे देशातील सर्वात हरित महानगर आहे. बंगळुरूला 'गार्डन सिटी ऑफ इंडिया'सह अनेक टोपणनावे आहेत. एकंदरीत जीवाश्म इंधनाला पूरक पर्याय म्हणून नवे तंत्र वेगाने पुढे येत आहे. त्याचे स्वागत करायला हवे.

पान ४ वरून

## बदललेल्या ऋतूचे संदर्भ...

आजच्या काळातही त्यांच्या नावाने एखादे आजोबा नातवाला घाबरवायला तयार असतात पण त्यांची धाडसी सूनबाईला माझ्या मुलाला भित्र करायचं नाही असे त्यांना निक्षून सांगते आणि मग बिचारा बागुलबुवा घरातून घाबरून धूम ठोकून निघून जातो. सूनबाईच्या रुपात आपल्या लहानपणीचा बागुलबुवा आपल्याला भेटायला आल्याचे पाहून आजोबा गांगरून जातात. उन्हामुळे बहुतांश झाडाचे पाने पिवळी होऊन खाली पडायची ती आजही पडतात. मात्र, पाने पडून चैत्रागमाच्या सुरुवातीला येणारी कोवळी पाने त्यातही ती पिंपळाची असतील तर जास्त चांगले असा विचार करून, त्या मऊ आणि सुंदर पानांना पुस्तकात स्थान देणारी पिढी आमच्या नंतर बहुदा दुसरी नव्हतीच असे वाटते. झाडाची कोवळी पाने ओरबडून खाणारे हे माकड मध आणि झाडाची हिरवी पाने एकत्र वळून तहान लाडू आणि भूक लाडू या संकल्पनेप्रमाणे पावसाळ्यात आपल्यासाठी अन्न जतन करून ठेवतात असे वन महर्षी मारुती चितमपल्ली यांच्या एका पुस्तकात वाचायला मिळाले होते. तेंव्हापासून आपण माकडाचे वंशज आहोत म्हणजे फार काही वाईट नाही असे वाटायचे. वसंतातील फाल्गुन महिना खरे म्हणजे रंगांचा रूपवान असा महिना. काही झाडांवर लाल केसरी तर काही झाडांवर पिवळे धमक फुले, काही झाड जसे आंब्याच्या मोहराप्रमाणे चांदीच्या लकेरी अंगावर लेवून उभे असते. कधी माकडांच्या धिंगाण्यात आंब्याचा मोहर झडतो. तर कधी हाच फाल्गुन आकाशात ढगांची गर्दी घेऊन अवकाळी पाऊस पडतो. हा वळीवाचा पाऊस आंब्यासाठी, किंवा संत्र्याच्या बागांसाठी घातकच असतो. मेहकरमध्ये होळीच्या दिवशी रंगपंचमीच्या एक दिवस अगोदर संपूर्ण गावाची चाळणी करणारी गारपीट आम्ही अनुभवली. त्यावेळी साडेनऊ किलोची एक गार मोजण्यात आली होती. तसेच एका इसमाचा गार पडून जीव गेला होता. तेव्हापासून फाल्गुन महिन्यात पाऊस पडायचा रंग दिसू लागला की, त्या राक्षसी गारपीटीची आठवण सर्वांनाच होते. वसंत ऋतुच्या छायेमध्ये कधी छत्रपती शिवरायांची जयंती उत्साह फिरणारी स्फूर्ती देते. तर कधी वसंत ऋतू इतकेच आकर्षक असे मराठी राजभाषा दिनाचे मराठमोळे रंग सर्वांना आकर्षित करत असतात. जसे मराठीचे अस्तित्व धोक्यात आल्याच्या जाणिवेतून मराठी भाषा दिवस साजरा केला जातो तसे निसर्गाचे संपूर्ण अस्तित्व धोक्यात आल्यामुळे प्रत्येक दिवस निसर्गाचा दिवस म्हणून साजरा केला गेला पाहिजे.

वसंताला आणखी आकर्षक करणाऱ्या गोष्टींपैकी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाशिवरात्रीच्या निमित्ताने शंकराच्या पिंडीवर शुभ्र वस्त्रांकित पावित्र्याने जल अर्पण करणाऱ्या माता भगिनी, याच माता भगिनींच्या गौरवार्थ जगभर साजरा करायला महिला दिवस येतो. तोही वसंत ऋतू मध्येच नाही का? पण या महिलांना जेव्हा जागतिक महिला दिनाची माहिती नव्हती तेव्हा त्या वसंताच्या प्रत्येक रंगाच्या छटेची परिचित होत्या. कुरडया, पापड्या असे वाळवंण चिळवन करताना एकमेकींसोबत स्वतःच्या मनातील सुखदुःखाचे पदर अलगत उलगडायच्या, गल्लीतल्या एखाद्या सौभाग्यकांक्षणी झालेल्या तरुणीच्या लग्नासाठी हळद बारीक करत असताना तिच्या जन्मापासूनचा जीवनपट कौतुकाने एकमेकांनी सांगायच्या, बापे लोकही पळसाच्या पत्रवाळ्या तयार करण्यात स्वतःला गुंतून घेत त्याचवेळी पंक्ती कोणी आणि कशा वाढायच्या याचेही नियोजन करायचे. वसंताच्या आगमना सोबत रंगांची उधळण करणाऱ्या फुलांमधील रंगामध्ये गर्दपणा येतो तो फाल्गुन महिन्यात, पूर्वीच्या काळी फाल्गुन महिन्यातील पळसाच्या फुलांचा नैसर्गिक रंग उधळून होळी खेळली जात होती, आता रासायनिक रंगामुळे होणाऱ्या हानीची जाणीव असली तरी फाल्गुन पौर्णिमेला रंगांची उधळण केली जाते याचा दिलासा अजूनही मनाला आहे कारण अनेक सण उत्सव काळाच्या ओघात विसरले जात आहेत. अर्थात रंगपंचमी साजरी होत असली तरी रंगांचा मेळ लावल्यापेक्षा मद्याचा मेळ लावण्यामध्ये आजची तरुणाई वेळ घालवत असते.

नात्यांमध्ये आणि विचारांमध्ये पाहिजे तेवढी शुद्धता न राहिल्यामुळे पूर्वीसारखे निर्मळ मनाने कुणाच्याही शरीराला स्पर्श करत रंग लावण्याची मुभा आजच्या काळात सर्वांना नक्कीच नाही. हा काळाचा महिमा आहे की काळा महिमा आहे याचा विचार करण्याची ही खऱ्या अर्थाने आज गरज आहे. एखादया वसंतात मुस्लिम बांधवांचा रमजान महिना येतो आणि त्यांचे पाण्याच्या घोटाशिवाय केले जाणारे उपास त्यांच्या सहनशीलतेचा परिचय देतात. वसंत ऋतूच्या काळात यात्रा, जत्रा त्यामानाने दिसत नसल्या तरी विदर्भातील सैलानी यात्रा होळीच्या दिवसातच फुललेली असते. लाखो लोक महाराष्ट्राच्या सह इतर राज्यातूनही तेथे गर्दी करत असतात. एकंदरीत गीत, संगीत, कला काव्य या सर्वांमध्ये या सर्वांमध्ये प्राण ओतण्याचे काम वसंतच करत असतो हेही तितकेच खरे!

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान

डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com




घरात शाळकरी/ महाविद्यालयीन नव्या पिढीचे आपल्या पालकांशी खुले संवाद होतात कां? पालक अलीकडे अधिक संरक्षण पुरवितात कां, अधिक काळजी वाहतात कां, मुलांच्या व्यक्तिगत आयुष्यात अधिक नाक खुपसतात कां, मित्रत्वाचे संबंध राखतात कां असे अनेक संगतवार प्रश्न पडतात हल्ली. विशेषतः विभक्त कुटुंब पद्धतीमुळे हम दो हमारा एक (किंवा फारतर दोन) अशा मर्यादशील आकाराच्या कुटुंबातील संवाद, संस्कार, नातेबंध हे सगळे अग्रक्रमाचे विषय बनलेले आहेत.

वेळ, ऊर्जा, व्यक्तिगत अवकाश आणि भावनिक ओलेपण असे अनेक घटक आजकाल संवादातील अडथळे बनलेले आहेत. अर्थात पाल्याची चिंता असतेच पायाभूत पण बांधकाम करायला, मशागत करायला कोठेतरी काहीतरी कमी पडताना जाणवत असते अलीकडे. याही उप्पर असेही एक चित्र आढळते की अति सांभाळणे. यामध्ये यश आणि कृतार्थता गवसणे कोठेतरी राहून जाते.

मागील शतकात अभ्यास कर, उत्तम गुणांनी उत्तीर्ण हो आणि आयुष्यात स्थिरस्थावर हो असा सर्वसाधारण आशीर्वादाचा हात पाल्याच्या पाठीवर असे.

एकदा शिक्षण संपलं की छानशी नोकरी ठरलेली त्यामुळे निवांत, त्यांतही सरकारी असेल तर विचारायलाच नको अशी मानसिकता. स्थिर उत्पन्न, सढळ निवृत्तीवेतन आणि मूलभूत सोयी मिळालं की अजून काय हवं? हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या कमी वर्षांमध्ये ही परिस्थिती बदलली.

साधारण १९८० च्या सुमारास स्वयंचलित यंत्रे वापरात आली. सोबतच वैश्विकीकरणाने जग खडबडून जागे झाले. कामगारांच्या ऐवजी यंत्रे आली किंवा संस्था बंद झाल्या आणि लाखो श्रमिक रस्त्यावर आले. मुंबईतील गिरणी संपाचे उदाहरण एक भळाळती जखम आहे. संसार उध्वस्त झाले, माणसे देशोधडीला लागली. बरीच यंत्रसामुग्री आणि कामे परदेशात हलविण्यात आली. तेव्हापासून ही घसरण आजवर सातत्याने सुरु आहे. हा परिवर्तनाचा परिणाम अजूनही ठळकपणे दृश्य आहे. एकेकाळचे निर्मितीचे/ उत्पादनाचे केंद्र ओस पडले, कामे गायब झाली, गावगाडा रिकामा झाला, उसकटून गेला आणि प्रगतीची कधी अधोगती झाली कळलेच नाही. कामगार बनण्याचा शाही मार्ग उध्वस्त झाला आणि त्याबरोबरच आश्वासन दिलेली सुरक्षाही दिसेनासी झाली.

खूपशा समाजांमध्ये ते हताशेचे वातावरण अद्यापही आहे. आयुष्यात आणि कामाच्या स्वरूपात साधारण असाच काळ पुढे वाढून ठेवलाय असं मानायला आता हरकत नाही. आपल्या पाल्यांशी पालकांनी गंभीरपणे बोलण्याची वेळ आता येऊन ठेपलीय. पण मुलांच्या आयुष्यातून केव्हा काढता पाय घ्यायचा याचे मात्र प्रशिक्षण नाही!

गेल्या काही दशकांमध्ये पालकांचा असा भ्रम झालाय की अभ्यासात प्रगती केली, नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतला/ शिक्षण पूर्ण केले आणि स्थिर नोकरीत प्रवेश केला की चिंतेचे कारण नाही.

कारखान्यांमधील स्वयंचलित यंत्रसामुग्रीने जशी औद्योगिक शहरे गिळंकृत केली तसेच आता कृत्रिम प्रज्ञेचे परिणाम व्हायला लागणार आहेत. पारंपरिक सुखवस्तू, सफेद-कॉलर कामांचे स्वरूप लवकरच बदलणार आहे. येतं ज्ञानार्जित क्रांतिकारक जग कदाचित आधीच्या औद्योगिक लाटेपेक्षा अधिक त्रासदायक असणार आहे. कृत्रिम प्रज्ञा अगणिक कामे अधिक वेगाने आणि कमी मूल्यामध्ये करणार आहे. परिणामस्वरूप आताचे गलेलठ्ठ पगाराचे काम बघता बघता दिसेनासे होईल असे चित्र सध्या आहे.

गेल्या चार वर्षांमध्ये ज्या प्रकारे कृत्रिम प्रज्ञा उत्क्रांत झाली आहे, तो वेग भयावह आहे. लवकरच त्यामुळे येऊ घातलेले व्यत्यय आणि अडथळे कल्पनेने डोळ्यांसमोर येताहेत. कृत्रिम प्रज्ञा काम नष्ट करणार नसून, तिचा सुयोग्य वापर न करणाऱ्यांना घरी बसविणार आहे. कृत्रिम प्रज्ञेमुळे कामाचे स्वरूप बदलणार आहे आणि म्हणूनच भावी आयुष्याची आखणी अवघड होत जाणार आहे.

आजच्या तरुण पिढीला प्रामाणिक आणि सुस्पष्ट मार्गदर्शनाची नितांत गरज आहे- विशेषतः ज्या विश्वात ते प्रवेश करणार आहेत, तिथे कोणती साधने, उपकरणे, हत्यारे त्यांच्याजवळ असावीत हे त्यांना आधीच माहित हवे. इंग्रजीत एक म्हण आहे उद्याचे युद्ध तुम्ही कालच्या शस्त्राने जिंकू शकत नाही. पालकांनी त्यांना कृत्रिम प्रज्ञेने चालविल्या जाणाऱ्या भावी संस्थांमध्ये कोणती कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे हे सांगणे आवश्यक आहे.

सॉफ्टवेअरची कामे हळूहळू नामशेष होताहेत. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांची संख्या ७० टक्क्यांनी घटली. याबाबत कोणी फारसे बोलताना दिसत नाही. मध्यम वर्गातील अभियंते आपल्या नजरेसमोर अदृश्य होताहेत. कारण काढून टाकणे किंवा बाजारपेठेचा तडाखा हे नसून त्यांची आता गरजच उरलेली नाहीए हे विदारक सत्य आहे.

**सध्या -**

(१) कृत्रिम प्रज्ञा शिकलेले विकसक (डेव्हलपर्स) संपूर्ण संघाला पर्याय ठरत आहेत.

(२) नव्याने नोकरीला लागण्याच्या संधी दुरापास्त होताहेत.

(३) मायक्रोसॉफ्टच्या म्हणण्यानुसार आजकाल प्रत्येक कर्मचाऱ्यामागे मिळणारे उत्पन्न सर्वाधिक असते.

(४) नवी उत्पादने दिवसभरात विकसित होताहेत, ज्याला पूर्वी महिना लागत असे.

**अभियंत्यांचे विश्व आता दुभंगले आहे-**

**(अ) उच्चभ्रू अभियंते -**

* सामान्य कृत्रिम प्रज्ञेची तोंड ओळख
* रॉकेटची संरचना यासारखी आव्हानात्मक कामे

**(ब) इतर अभियंते-**

* उत्पादनांची बांधणी
* सह-संस्थापकाबरोबर भागीदारीत व्यवसाय सुरु करणे
* स्वतःचा व्यवसाय

अधले-मधले पर्याय आता अनुपलब्ध आहेत.

**भविष्याची भाकिते-**

(१) मूलभूत संशोधन, प्राथमिक /अविकसित डेटापासून महत्वाची माहिती बाजूला करण्यासाठी करण्याची प्रक्रिया किंवा पुनरावृत्ती अंकीय कामे धोक्यात असतील.

(२) कृत्रिम प्रज्ञेचे अंतरंग समजून घेण्यासाठी उत्सुक आणि तत्पर असणाऱ्या व्यक्ती आपल्या कामकाजात त्याचा सहज वापर करून पुढे जातील. बाकीच्यांची गाडी चुकेल.

(३) मानवी नातेबंधांना घट्ट पकडून ठेवणारी कौशल्ये कधी नव्हे ते महत्वाची ठरतील. विशेषतः नेतृत्वगुण, अनुकंपा, नवसर्जन आणि संरचना ओळखून त्याच्याशी गट्टी करणे. ज्या व्यक्तींकडे अशी कौशल्ये जन्मजात असतील ती उच्चपदी पोहोचतील.

अशा या कृत्रिम जगात तग धरून राहण्यासाठी तीन अंगवैशिष्ट्ये महत्वाची ठरतील- योग्य मनोरचना, योग्य कौशल्ये आणि योग्य व्यवसायाचा अंगीकार !

**योग्य मनोरचना**

भूतकाळातील प्रत्येक तांत्रिक संशोधनाबद्दल एक कमकुवत बाजू कायम आढळली आहे- तिचा अतिवापर. सध्या घिब्लीने जसा उच्छाद मांडलाय तसा. याउलट एकेकाळी अगदी ई-मेल लाही विरोध असणाऱ्यांचा प्रवाह होताच की. तसे कृत्रिम प्रज्ञेला मिळणारा प्रतिसाद आहे.

या नवीन युगाचा वाहनचालक जर कृत्रिम प्रज्ञा असेल तर आपण मनांची तयारी नवीन ग्रहण करण्याकडे, ते आत्मसात करण्याकडे वळविली पाहिजे. आपल्या आरामदायी भूमिकेला ओलांडल्याशिवाय कृत्रिम प्रज्ञेचा अथांगपणा आणि तिचे सर्वव्यापी स्वरूप समजणार नाही, आपल्या कवेत येणार नाही. सत्याशी दोन हात करावेत, आणि कितीही भयावह वाटले तरीही नव्या प्रक्रिया अंगवळणी पडू द्याव्यात, तिथे विरोध नसावा. उद्याच्या जगातील यशस्वी व्यक्तींची ओळख त्यांच्या नित्यनूतन ज्ञानावरून होणार आहे. तंत्रज्ञानाचा बागुलबुवा जितका लवकर बाजूला सारता येईल तितका बरा. कृत्रिम प्रज्ञेबरोबर दोन हात करण्यापेक्षा तिच्याशी जुळवून घेत सोप्या आणि सुलभ कामाचे मार्ग धुंडाळून काढणे अधिक श्रेयस्कर.

सुरुवात हवी स्व-जागरूकतेपासून. प्रत्येक व्यावसायिकाने एक प्रश्न हमखास स्वतःला विचारायला हवा- कृत्रिम प्रज्ञेला अशक्य आहे असे मी काय करू शकतो? किंवा माझ्यातील कोणत्या उणिवांवर मात करण्यासाठी मी कृत्रिम प्रज्ञेचा हात धरायला हवा? शेवटी प्रासंगिक राहावयाचे असेल तर स्वतःमधील एखादे अनन्यसाधारण वैशिष्ट्य- कल्पकता, नातेबंधांची सहजता किंवा इतरांना प्रेरणा देण्याची कुवत यापैकी एखाद्याची निवड करावयास हवी.

**योग्य कौशल्ये**

ज्यांचा नवे शिकण्याकडे ओढा असतो त्यांना काहीही अशक्य नसते. शेवटी तंत्रज्ञानाला मर्यादा असतात, हे विसरून चालत नाही. त्या खाचखळग्यांना भरून काढण्यासाठी स्वतःची कुवत वापरायची असते.

उदा. भावनिक प्रज्ञा हा सध्या चलती असलेला विषय आहे. कृत्रिम प्रज्ञेच्या मदतीने आपण विचारमंथन करून माहितीचे विश्लेषण करू शकतो पण माणसांना समजून घेणे कार्यासाठी प्रेरणा देणे, उद्युक्त करणे आणि त्यांच्यात समन्वय साधणे हे अद्याप कृत्रिम प्रज्ञेच्या आवाक्याबाहेर आहे.

यशस्वी नेतृत्व केवळ ज्ञानाच्या आणि तथ्यांच्या आहारी जाऊन आपल्या भूमिका निभावत नसतात. त्याच्या अंगी सुसंवादाची हातोटी असावी लागते, भक्कम कार्यसंस्कृती बांधण्याची क्षमता असावी लागते, अचूक निवड करून सहकाऱ्यांना कार्यप्रवण करण्याचे कौशल्य असावे लागते आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या संघाला संस्थेच्या उद्दिष्टांप्रती न्यावे लागते. इथे केवळ चॅट जीपीटी कामी येत नाही. तसेच काही उत्कृष्ट कर्मचाऱ्यांना भविष्याचे वेध सांगता येतात, विश्वास बांधणी करता येते आणि माणसांच्या गरजा हाताळता येतात. ही कौशल्ये दिवसेंदिवस अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता बळावलीय.

थोडक्यात कृत्रिम प्रज्ञा कदाचित कामाची तांत्रिक अंगे चांगल्याप्रकारे हाताळू शकेल पण मानवी भावभावनांसाठी शेवटी नैसर्गिक बुद्धिमत्ताच कामी येईल.

कृत्रिम प्रज्ञेवर फार विसंबून राहता येईल अशी सध्यातरी परिस्थिती नाही कारण तिच्या निष्पत्ती, उत्पादनाबद्दल अद्याप विश्वासार्हता स्थापन झालेली नाहीए. आणि ती मानवासाठी मोठी संधी आहे- स्वतःचा वरचढपणा सिद्ध करण्याची.

**योग्य व्यवसायाचा अंगीकार**

**खालील घटकांचा विचार व्यवसाय स्वीकारताना अत्यावश्यक असतो-**

(१) बदलांची चलती

(२) वैचारिक मतभेद स्वीकारणे

(३) विकेंद्रीकरण

(४) व्यवहारातील लवचिकता

(५) शिक्षणातील सातत्य

अशा व्यक्तीसमोर कृत्रिम प्रज्ञा आव्हान निर्माण करू शकत नाही. नव्या युगातील पालकांना आपल्या पाल्यांशी कृत्रिम प्रज्ञेबाबत मनमोकळा संवाद साधून मानसिक दृष्ट्या तयार करणे म्हणूनच आवश्यक झालेले आहे. तरच त्यांचा उद्याच्या जगात टिकाव लागू शकेल. इंग्रजीत एक म्हण आहे. उद्याच्या युद्धांसाठी कालची शस्त्रे उपयोगी नसतात.

---

समाजभान

प्रा. अशोक ढगे




सशात दर १० वर्षांनी जनगणना होईल आणि त्यातील आकडेवारीच्या आधारे दर १० वर्षांनी परिसीमन केले जाईल आणि जागा वाढतील, असे राज्यघटनेत स्पष्टपणे लिहिले आहे. त्यानुसार १९५१, १९६१ आणि १९७१ मध्ये जनगणना आणि मतदारसंघाची पुनर्रचना झाली. दरम्यानच्या काळात दक्षिण भारतातील लोकांनी लोकसंख्येचे नियोजन केले आणि प्रगतीची वाट धरली; परंतु उत्तरेकडील राज्यांमध्ये मात्र लोकसंख्या वाढत गेली आणि विकासाची गती मंदावली. दक्षिण भारतातील राज्यांमधून विविध करांच्या रूपाने मिळणाऱ्या पैशातून उत्तर भारत फायदा घेत असून त्यामुळे त्या राज्यांमध्ये अगोदरच नाराजी आहे. त्यातच आता लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघाची पुनर्रचना केली गेल्यास एक तर दक्षिणेतील राज्यांमध्ये लोकसभेच्या जागा कमी होतील किंवा त्या फारशा वाढणार नाहीत आणि उत्तर भारतात मात्र लोकसभेच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढतील, अशी भीती दक्षिणेकडील राज्यांना आहे. त्यामुळे या राज्यांमधील भाजपचे मित्रपक्ष तसेच विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांचे प्रमुख एकाच सुरात बोलत आहेत. ते लोकसंख्यावाढीची भाषा बोलत आहेत. हे चुकीचे आहे; परंतु त्यांची अशी धारणा होण्याला केंद्र सरकारची धोरणेही कारणीभूत आहेत.

जगभरात लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कुटुंब नियोजन धोरणांवर भर दिला जात असताना आता कालचक्र उलटे फिरवणे योग्य नाही. दक्षिणेकडील राज्यांनी या मुद्यावर यापूर्वीही विरोध केला होता आणि आत्ताही सुरू आहे. लोकसभेच्या आणि विधानसभेच्या जागा वाढू नयेत, म्हणून परिसीमन १९९६ पर्यंत गोठवले गेले. त्यानंतर २००१ मध्येही २०२६ पर्यंत जागा वाढणार नाहीत, असा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी असेही सांगण्यात आले होते की, उत्तर भारतातील राज्ये आपली लोकसंख्या बिनदिक्कत वाढवत आहेत. अशा परिस्थितीत सीमांकन झाल्यास या राज्यांच्या जागा अधिक प्रमाणात वाढतील. त्या वेळी सीमांकन २५ वर्षे गोठले होते. त्यावेळी मानले जात होते की, २०२६ पर्यंत उत्तर भारतातील राज्ये लोकसंख्या स्थिर करतील; परंतु आजही तसे झालेले नाही. आताही लोकसंख्या मुख्यतः उत्तर भारतातील राज्यांमध्ये वाढत आहे.

केरळमधील एक खासदार १८ लाख लोकांचे प्रतिनिधित्व करतो तर राजस्थानचे खासदार ३३ लाख लोकांचे प्रतिनिधित्व करतात. दक्षिण भारतातील लोकसंख्यावाढीचा दर नकारात्मक झाला आहे. एका सरकारी मंत्र्याने सांगितले की, आता होणाऱ्या जनगणनेच्या आधारावर २०२६ मध्ये सीमांकन केले जाईल.

सध्या या परिसीमनावरून वाद निर्माण झाला आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी आता परिसीमन सीमांकन करू नये, २०३१ नंतर सीमांकन करावे, तोपर्यंत आम्ही लोकसंख्या थोडी वाढवू, अशी भाषा सुरू केली आहे. ही मागणी पायावर धोंडा पाडून घेण्याजोगी आहे. आता जनगणना झाल्यास त्याआधारे उत्तर भारतातील राज्यांमधील जागा परिसीमनात वाढतील, असे त्यांना वाटते. आत्तापर्यंत सीमंकनानंतर लोकसभेच्या जागांची संख्या सुमारे २०० ने वाढेल.

सध्याच्या ५४३ जागा वाढून ७५० होतील. यामध्ये उत्तर भारतातील राज्यांमधील जागा ४०० असतील. सध्या दक्षिण भारतात लोकसभेच्या १२९ जागा आहेत. सीमांकनानंतर येथे जास्तीत जास्त १०-११ जागा वाढतील. परिणामी सीमांकनामुळे उत्तर भारतातील राज्यांचा अधिक फायदा होईल. या कारणामुळे दक्षिणेतील बहुतांश राज्यांचे नेते आपापल्या राज्यांमध्ये लोकसंख्या वाढवण्यावर भर देत आहेत. सीमांकन ही भारताला आवश्यक असलेली बाब आहे. तामिळनाडूमधील सर्वपक्षीय बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावात सीमांकन ३० वर्षांसाठी पुढे ढकलण्याची मागणी करण्यात आली. हा ठराव केवळ एका राज्याच्या किंवा एका प्रदेशाच्या हिताचे रक्षण करणारा नाही.

प्रजासत्ताक स्थापनेच्या ७५ वर्षांनंतर आता संघाच्या कराराचा विचार का करायचा? हे गंभीर प्रश्न आहेत, ज्यांची प्रामाणिक उत्तरे हवी आहेत. आज प्रत्येक राज्यांतर्गत संसदीय आणि विधानसभा मतदारसंघांच्या सीमारेषा पुन्हा काढण्याच्या नियमित प्रक्रियेवर किंवा राज्यांतर्गत विधानसभेच्या जागांची संख्या वाढविण्यास कोणाचाही आक्षेप नाही. खरा मुद्दा विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागांच्या पुनर्वितरणाशी संबंधित आहे, जो ५० वर्षांपूर्वी पुढे ढकलण्यात आला होता. आता ही स्थगिती वाढवायची की कायमस्वरूपी स्थगिती द्यायची, याची चर्चा सुरू आहे.

**दर १० वर्षांनी मतदारसंघाची पुनर्रचना होते, परंतु विविध कारणाने देशात ती वारंवार पुढे ढकलण्यात आली. आता लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघाची पुनर्रचना केल्यास काही राज्यांवर अन्याय होईल, अशी भूमिका मांडली जात आहे. अर्थात मतदारसंघाची पुनर्रचनाच करू नये, ही मागणी गैर आणि अनेक मतदारसंघांवर अन्याय करणारी आहे.**



वास्तवात मूळ घटनात्मक तरतूद 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' या लोकशाही तत्त्वानुसार विधानमंडळाचा प्रत्येक सदस्य अंदाजे समान संख्येने व्यक्तींचे प्रतिनिधित्व करतो. गंभीर मतभेद असल्यास, मोठ्या मतदारसंघातील मतांचे मूल्य लहान मतदारसंघांपेक्षा कमी असते. उदाहरणार्थ लोकसभेत ३२ लाखांहून अधिक लोकांचे प्रतिनिधित्व करणारे अनेक खासदार उत्तर भारतामध्ये आहेत, तर केरळमध्ये हा आकडा १८ लाखांपेक्षा कमी आहे. त्यामुळे केरळमधील मतदाराचे मूल्य उत्तर प्रदेशातील मतदारापेक्षा जवळपास दुप्पट आहे. ही एक विसंगती आहे. ती दुरुस्त केली पाहिजे. राज्यघटनेने लहान राज्यांना संरक्षण दिले आहे. त्यांना लोकसभेत आपल्या लोकसंख्येपेक्षा जास्त प्रतिनिधित्व दिले गेले.

गेल्या तीन दशकांमधील आर्थिक वाढीच्या पॅटर्नमुळे दक्षिण-पश्चिम भारत आणि उत्तर आणि पूर्व भारत यांच्यात स्पष्ट विषमता निर्माण झाली. विशेष म्हणजे भाषिक विभाजनाचा फायदा घेणाऱ्या प्रदेशांचा या आर्थिक विभाजनात वरचष्मा आहे. भाजपाच्या उदयानंतर भाजपाचे वर्चस्व असणाऱ्या उत्तर भारतीय राज्यांमध्ये आणि कर्नाटक, ओडिशा, पश्चिम बंगाल, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ या तुलनेने कमी प्रभाव असणाऱ्या राज्यांमध्ये एक राजकीय 'फॉल्टलाईन' उघडली आहे. २०२६ मध्ये प्रत्येक राज्याच्या अंदाजित लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेच्या जागांचे पुनर्वितरण झाल्यास संभाव्य परिणाम काय असतील हे दिसते. केरळ (आठ जागा कमी), तामिळनाडू (आठ जागा कमी), आंध्र प्रदेश आणि तेलंगणा (एकत्रित आठ जागा कमी), कर्नाटक (दोन जागा कमी) असा फरक पडू शकतो.

पश्चिम बंगाल (चार जागा कमी), ओडिशा (तीन जागा कमी), पंजाब (एक जागा कमी), हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड (प्रत्येकी एक जागा खाली) वगळता इतर उत्तर भारतीय हिंदी भाषिक राज्यांना मोठा फायदा होईल. उत्तर प्रदेश (११ जादा जागा), बिहार (१० जादा जागा), राजस्थान (सहा जादा जागा) आणि मध्य प्रदेश (चार जादा जागा) या राज्यात जागा वाढतील. यामुळे हिंदी आणि बिगरहिंदी भाषिक राज्ये, विशेषतः दक्षिण भारतीय राज्यांमधील संतुलन बिघडवण्याची शक्यता आहे. सध्या ५४३ पैकी २२६ जागांवर नियंत्रण असलेल्या 'हिंदी हार्टलँड'ला आता २५९ जागा मिळतील. आज दक्षिणेकडील राज्ये पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील राज्यांशी हातमिळवणी करून कोणत्याही मोठ्या घटनादुरुस्तीला व्हेटो करू शकतात. नवीन सीमांकन व्यवस्थेत ते ही महत्त्वाची शक्ती गमावतील. सध्या त्यांच्याकडे १३२ जागा आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत त्याबाबत स्पष्टीकरण दिले असले, तरी त्यावर दक्षिणेकडील राज्यांचा विश्वास नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने तर मतदारसंघ पुनर्रचना हा सरकारचा विषय असून आम्ही त्यासाठी सरकारवर कोणतेही दडपण आणत नाही किंवा हस्तक्षेप करत नाही, असे स्पष्ट केले आहे. सध्या दक्षिण आणि उत्तर भारतात या विषयावरून सुरू असलेला वाद भारतीय संघराज्याच्या अंतर्गत असलेल्या गैरवर्चस्वाच्या भावनेच्या आणि 'विविधतेतील एकता' या कल्पनेच्या विरोधात आहे, हे मात्र नक्की.

लक्ष्यवेध

महेश जोशी

# ‘उडता पंजाब’ धोकादायक






अमृतसरमधील मंदिरावर बॉम्ब फेकला जाण्याची अलिकडच्या काळातील घटना ही गंभीर चिंतेची बाब ठरावी. कारण अलिकडच्या काळात पहिल्यांदाच हिंदू मंदिराला, तेही होळीच्या रात्री लक्ष्य केले गेले. याआधीही अनेक पोलिस चौकी आणि पोलिस ठाण्यांवर असेच बॉम्ब फेकले गेले आहेत. चेक पोस्ट आणि पोलिस ठाण्यांनंतर मंदिराला लक्ष्य करणे हे दहशतवादी घटकांच्या वाढत्या धाडसाचेच प्रतिबिंब नाही, तर पंजाबच्या जातीय सलोख्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न असल्याचे अधोरेखित करते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंदिरावरील हल्ल्यामागे ‘आयएसआय’ या पाकिस्तानी गुप्तचर संस्थेचा हात आहे; मात्र खलिस्तानसमर्थक घटकांनी हा बॉम्ब फेकला असावा, असा दाट संशय आहे. परिस्थितीही तेच दर्शवत आहे. राज्यातील वातावरण बिघडविण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचे मुख्यमंत्री भगवंत मान मान्य करीत असले, तरी नुसते बोलून फायदा होणार नाही, यावरूनही ही घटना किती गंभीर आहे, हे लक्षात येते. पंजाबमधील आम आदमी पक्षाच्या सरकारला राज्यातील बिघडत चाललेल्या कायदा आणि सुव्यवस्थेकडे अधिक लक्ष द्यावे लागेल आणि या क्रमाने खलिस्तान समर्थक घटकांविरुद्ध कडक कारवाई करावी लागेल. भूतकाळात पंजाबला दहशतवादाच्या आगीत झोकून देणारे खलिस्तानसमर्थक घटक कोणत्याही माफीला पात्र नाहीत. एवढेच नाही, तर पाकिस्तान त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य आणि मदत करण्यात गुंतला आहे.

पाकिस्तानमधून होणारी शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांची वाढती तस्करी याचा पुरावा आहे. या तस्करीत खलिस्तानसमर्थक घटक सामील आहेत, हे पंजाब तसेच केंद्र सरकारला माहीत नाही. पंजाबमधील विघटनकारी घटकांना पाकिस्तानसह पाश्चिमात्य देशांमधील खलिस्तान समर्थकांकडूनच पाठिंबा मिळत नाही, तर पंजाबमध्येही काही गट आणि संघटना आहेत, जे त्यांच्या कारवायांवर मौन बाळगणे पसंत करतात. खेदाची गोष्ट म्हणजे त्यांच्यात काही राजकीय आणि धार्मिक गटही आहेत. दहशतवाद आणि फुटीरतावाद निर्माण करणाऱ्या घटकांविरुद्ध जाणीवपूर्वक मौन बाळगणे म्हणजे गुन्ह्यात सहभागी होण्यासारखे आहे, हे अशा संकुचित गटांनी लक्षात ठेवले तर बरे होईल. खलिस्तान समर्थकांच्या कारवायांवर पंजाबमधील काही गटांचे मौन या घटकांचा दु:साहस वाढवत आहे. अलिकडच्या काळात पंजाबमध्ये अनेक हिंदू नेत्यांच्या हत्या झाल्या आहेत. खलिस्तान समर्थक घटकांनी या हत्यांची जबाबदारी घेतली आहे. सुरक्षा यंत्रणांचे लक्ष वळवण्यासाठी सीमेपलीकडून ‘आयएसआय’ बेरोजगार तरुण आणि कामगारवर्गाचा वापर करून स्फोट घडवून आणत आहे. पंजाबमधील सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये अमली पदार्थांच्या तस्करांवर सातत्याने कारवाई होत असल्याने मात्र पाकिस्तानचे नुकसान होत आहे. ‘आयएसआय’ या कारवाईमुळे हादरली आहे. कारण आता पंजाबमध्ये अमली पदार्थांचा व्यापार वाढविणारे लोक सापडत नाहीत. अशा स्थितीमध्ये ‘आयएसआय’ पंजाबचे वातावरण बिघडविण्यासाठी बेरोजगार तरुणांना छोटे स्फोट आणि इतर दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे; जेणेकरून एजन्सींचे लक्ष विचलित होऊन अमली पदार्थांचा व्यापार पुन्हा वाढू शकेल. ‘आयएसआय’च्या सांगण्यावरून परदेशात बसलेले दहशतवादी पंजाबमधील अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या तरुणांना पैसे आणि ड्रग्ज देऊन परदेशात पाठवत आहेत. या लालसेच्या बदल्यात हे तरुण दहशतवाद्यांच्या हस्तकांपर्यंत शस्त्रे आणि स्फोटक साहित्य पोहोचविण्याचे आणि स्फोट घडवून आणण्याचे काम करीत आहेत.

गेल्या वर्षभरापासून अनेक तरुणांना दहशतवादी कारवायांमध्ये सामील असल्याबद्दल अटक करण्यात आली आहे. त्यापैकी बहुतांश ड्रग्ज व्यसनी, बेरोजगार होते आणि त्यांना कामाच्या बदल्यात पैसे देण्याचे किंवा परदेशात नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन त्यांच्या हस्तकांनी दिले होते. परदेशात बसलेले हस्तक अमृतसर, तरणतारण, फिरोजपूरसह अनेक जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागातील स्थानिक तरुणांना आपल्याशी जोडत आहेत. पंजाब पोलिसांनी अलिकडेच एका टोळीतील दोघांना अटक केली होती. चौकशीत त्याने या नेटवर्कचा खुलासा केला. पंजाब पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, हा ट्रेंड गेल्या तीन-चार वर्षांपासून सुरू आहे; पण अलिकडे त्यात अचानक वाढ झाली आहे.

पाकिस्तानस्थित ‘इंटरनॅशनल यूथ शीख फेडरेशन’चा प्रमुख लखबीर सिंग रोडे २०२२ च्या पठाणकोट ग्रेनेड स्फोटात एसबीएसनगर पोलिसांनी आरोपी मानलेल्या सहा संशयितांपैकी एक होता. तो या घटनेचा सूत्रधार होता. या प्रकरणी अटक करण्यात आलेले इतर चौघे गरीब कुटुंबांमधील आहेत. या संशयितांच्या चौकशीत गुरदासपूरच्या खराळ गावातील ३० वर्षीय गुरविंदर सिंग याला दुबईमध्ये नोकरीचे आमिष दाखवून गंडा घातल्याचे उघड झाले. लुधियानाच्या कुलदीप कुमार उर्फ सनीव्यतिरिक्त मॉड्यूलचे इतर सदस्य सामान्य तरुण होते; जे गेल्या वर्षी ७ नोव्हेंबर रोजी ‘एसबीएस’ नगरमध्ये ग्रेनेड हल्ला करण्यासाठी तयार होते. स्थानिक तरुणांना आकर्षित करण्यासाठी सनीने वैयक्तिक संबंध किंवा दूरच्या मैत्रीचा वापर केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

या सर्वांना खलिस्तानबाबत फारशी माहिती नसल्याचे तपासात समोर आले आहे. सनीला १५ हजार ते एक लाख रुपयाचे आमिष दाखवण्यात आले. रमणकुमार या १९ वर्षीय व्यसनीला दहशतवादी मॉड्यूलमध्ये सामील होण्यासाठी फक्त १२ हजार रुपये दिले गेले. काऊंटर इंटेलिजन्स अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार आतापर्यंतच्या तपासात बहुतांश तरुण हे ड्रग्ज व्यसनी आणि बेरोजगार असल्याचे लक्षात आले आहे. भारतातील अमली पदार्थांच्या तस्करीचा मुकाबला करण्यासाठी अनेक आव्हाने पेलावी लागत आहेत.

डार्कनेटचे मार्केट निनावी असल्यामुळे आणि कमी जोखमीमुळे शोधणे कठीण ठरत आहे. त्याने पारंपारिक औषधांचा बाजार ताब्यात घेतला आहे. अभ्यासातून दिसून आले आहे की, ६२ टक्के डार्कनेटचा वापर अवैध अमली पदार्थांच्या तस्करीसाठी केला आहे. जगभरात डार्कनेटचा वापर करणाऱ्या तस्करांना पकडण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. कुरिअर सेवांद्वारे क्रिप्टोकरन्सी पेमेंट आणि डोअरस्टेप डिलिव्हरी यामुळे डार्कनेट व्यवहार सोपे झाले आहेत. तस्कर सर्जनशील आणि तंत्रज्ञानाचे जाणकार झाले आहेत. पंजाबमध्ये तस्करांनी ड्रोनद्वारे बंदुकांचा पुरवठा करण्यासारखे नवीन तंत्रज्ञान स्वीकारले आहे. त्यामुळे सुरक्षा दलांसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. कोरोना महामारीदरम्यान वाहन, जहाज, विमान वाहतुकीवर लादण्यात आलेल्या निर्बंधांनंतर, अमली पदार्थ तस्करांनी कुरिअर/ पार्सल/ पोस्टवर अधिक अवलंबून राहण्यास सुरुवात केली आहे.

२०२२ मध्ये, डमी ई-कॉमर्स वेबसाईट तयार करून अमली पदार्थांचे व्यवहार केल्याप्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आली होती. दुसऱ्या उदाहरणात काही लोकांना वेबसाईटवर बनावट उत्पादने सूचिबद्ध करून ॲमेझॉनसारख्या ई-कॉमर्स वेबसाईटद्वारे औषधे विकल्याबद्दल अटक करण्यात आली. अलिकडील तपासात कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, हाँगकाँगमध्ये खलिस्तानी दहशतवाद्यांचे अनिवासी भारतीयांसह भारतातील स्थानिक ड्रग लॉर्डस आणि गुंडांशी ड्रग कार्टेलचे संबंध उघड झाले आहेत. यातून एक नवीन ट्रेंड उदयाला आला आहे. त्यात अमली पदार्थांच्या तस्करीसाठी स्थानिक टोळ्यांचा वापर केला जात आहे. या पृष्ठभूमीवर आता भारताने ‘एनडीपीएस’ कायदा, १९८५ अंतर्गत कठोर दंड आकारण्यासारख्या उपायांद्वारे औषधांची मागणी कमी करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. मोहिमा आणि अशासकीय संस्थांच्या माध्यमातून अमली पदार्थांचे व्यसन कमी करण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती केली पाहिजे. त्या कारणाने औषध घेण्याशी संबंधित कलंक दूर करण्याची गरज आहे. समाजाने हे समजून घेणे आवश्यक आहे की, अमली पदार्थांचे व्यसनी हे बळी असतात, गुन्हेगार नसतात. ५० टक्क्यांहून अधिक अल्कोहोल आणि ओपिओईड्स असलेल्या काही तणनाशकांवर बंदी घालणे आवश्यक आहे. देशातील अमली पदार्थांचा विळखा रोखण्यासाठी पोलिस अधिकारी आणि उत्पादन शुल्क आणि अमली पदार्थ विभागाने कठोर कारवाई करण्याची गरज आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमात अमली पदार्थांचे व्यसन, त्याचे परिणाम आणि व्यसनमुक्ती या विषयांचाही समावेश असावा. याशिवाय योग्य समुपदेशन हा दुसरा पर्याय आहे. या वाढत्या धोक्याचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणांचे एकत्रित आणि समन्वित प्रयत्न आवश्यक असतील. रोजगाराच्या अधिक संधी निर्माण केल्याने काही प्रमाणात समस्या सुटू शकते. कारण जलद आणि जास्त पैसा बेरोजगार तरुणांना अशा उपक्रमांकडे आकर्षित करतो. त्यांचे समुपदेशनही परिणाम घडवू शकतो.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# कासवांचा अनोखा प्रजनन मेळा

**पृथ्वीचे अस्तित्व कासवांवर अवलंबून आहे. दरवर्षी भारतातील ओडिशाच्या किनारपट्टीवर जगातील दुर्मिळ प्रजाती असलेल्या ऑलिव्ह रिडले कासवांचा अनोखा मेळावा होतो. दरवर्षी वसंत ऋतूमध्ये ओडिशाच्या किनारपट्टीवरील केंद्रपारा जिल्ह्यातील गरियामाथा किनारा एका घटनेचा साक्षीदार असतो. त्याचे रहस्य जगभरातील पर्यावरणवादी आणि प्राणिप्रेमी सोडवण्यास उत्सुक असतात. लाखो कासवे हजारो किलोमीटरचा प्रवास करून अंडी घालण्यासाठी येथे येतात.**

पृथ्वीचे अस्तित्व कासवांवर अवलंबून आहे. दरवर्षी भारतातील ओडिशाच्या किनारपट्टीवर जगातील दुर्मिळ प्रजाती असलेल्या ऑलिव्ह रिडले कासवांचा अनोखा मेळावा होतो. दरवर्षी वसंत ऋतूमध्ये ओडिशाच्या किनारपट्टीवरील केंद्रपारा जिल्ह्यातील गरियामाथा किनारा एका घटनेचा साक्षीदार असतो. त्याचे रहस्य जगभरातील पर्यावरणवादी आणि प्राणिप्रेमी सोडवण्यास उत्सुक असतात. लाखो कासवे हजारो किलोमीटरचा प्रवास करून अंडी घालण्यासाठी येथे येतात.

मादी अंडी घालतात आणि नंतर समुद्राच्या प्रवासाला निघून जातात. सुमारे ५० दिवसांनंतर या अंड्यातून बाहेर आलेली पिल्ले पुन्हा त्याच सागरी मार्गाने हजारो किलोमीटर दूर त्यांच्या आईकडे जातात. इतकेच नाही, तर ही कासवांची पिल्ले ३० वर्षांनंतर प्रजननासाठी सक्षम होतात तेव्हा ज्या ठिकाणी जन्माला आली, त्याच ठिकाणी अंडी घालण्यासाठी येतात. ‘रेड लिस्ट’मधील सात जिवंत समुद्री कासव प्रजातींपैकी एक असलेले ‘ऑलिव्ह रिडले’ असुरक्षित म्हणून वर्गीकृत आहे. त्यांच्या अनोख्या प्रजनन पद्धतीमुळे आणि मानवी क्रियाकलापांमुळे ते धोक्यात आले आहेत. ऑलिव्ह रिडले कासव आपले संपूर्ण आयुष्य समुद्रात आणि जमिनीवर घालवतात. तेथील हंगामी बदलांमुळे प्रभावित होतात. महासागर आणि त्याच्या जैविक जगावर हवामान बदलाचा भयंकर परिणाम झाला आहे, ही वस्तुस्थिती कोणापासूनही लपलेली नाही. पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे समुद्राचे पाणीदेखील अस्पर्शित नाही. गरम पाण्यामुळे ऑलिव्ह रिडले कासवांच्या नैसर्गिक अधिवास आणि अन्नावर परिणाम झाला आहे.

समुद्राच्या पातळीत वाढ झाल्याने समुद्री कासवांना अंडी घालण्यासाठी योग्य जागा शोधणे कठीण होऊ शकते. सर्वात मोठी बाब म्हणजे हवामानातील बदलामुळे कासवांमध्येही लैंगिक असमानता निर्माण होत आहे. अंडी नर किंवा मादी कासवामध्ये उबेल, हे भ्रूणाच्या विकासादरम्यानचे तापमान निर्धारित करते. जास्त तापमानामुळे जास्त मादी कासवे जन्माला येतात, तर कमी तापमानामुळे नर जन्माला येतात, असे आढळले आहे. ऑलिव्ह रिडले समुद्रकिनाऱ्यांवरील वाळूच्या तापमानात वाढ होत असताना उबवणुकीचे लिंग गुणोत्तर जवळजवळ संपूर्णपणे मादी असू शकते. परिणामी कासवांना भविष्यात पुनरुत्पादनात समस्या येऊ शकतात. हजारो किलोमीटरच्या सागरी प्रवासात ऑलिव्ह रिडले कासव भारतातील गोवा, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेशच्या समुद्रकिनाऱ्यावरून जातात; पण आपल्या संततीच्या वाढीसाठी ते ओडिशाच्या समुद्रकिनाऱ्यांची वाळू निवडून अधिवास करतात, हे आश्चर्यकारक आहे. ऑलिव्ह रिडले कासवांची घरटी जगभरात फक्त सहा ठिकाणी आढळतात आणि यापैकी तीन ठिकाणे ओडिशामध्ये आहेत. या कासवांची पैदास कोस्टारिकामध्ये दोन ठिकाणी आणि मेक्सिकोमध्ये एका ठिकाणी होते. ओडिशाच्या केंद्रपाडा जिल्ह्यातील गरिमाथा समुद्रकिनारा हे जगातील सर्वात मोठे प्रजनन निवासस्थान आहे. याशिवाय रुसिकालय आणि समुद्रातील देवी नदी ही या कासवांची आणखी दोन आवडती ठिकाणे आहेत. मादी ऑलिव्ह रिडले एका वेळी सुमारे १५० अंडी घालते. हजारो किलोमीटरचा प्रवास केल्यानंतर ही चमत्कारिक कासवे समुद्राच्या किनाऱ्यावर वाळूत खड्डे करून अंडी घालण्यासाठी जागा बनवतात. या प्रक्रियेला ‘मास नेस्टिंग’ किंवा ‘अरिबाडा’ म्हणतात. ही अंडी ६० दिवसांमध्ये फुटतात आणि त्यातून छोटे कासव बाहेर येतात. हे लहान प्राणी वाळू वर ओढून समुद्रात पडतात.

प्रजननासाठी ते त्याच ठिकाणी ३० वर्षांनंतर पुन्हा येतात. यंदा ओडिशाच्या किनारपट्टीवर कासवांचे आगमन पाच मार्चच्या रात्री उशिराने झाले. केवळ एका रात्रीत सुमारे ७८ हजार मादी कासवांनी घरटे बांधले आणि अंडी घालण्यास सुरुवात केली. बदलत्या हवामानामुळे कासवांना फक्त त्रास होत नाही, तर मासेमारी करणाऱ्या ट्रॉलर्समुळे त्यांचे सर्वात जास्त नुकसान होते. गेल्या चार महिन्यांमध्ये ओडिशाच्या वन विभागाने २९९ मच्छीमारांना प्रतिबंधित भागात नियमांविरुद्ध मासेमारी केल्याबद्दल अटक केली. निर्बंध असतानाही श्रीलंका आणि थायलंडचे ट्रॉलर्स खुले आम मासे तसेच कासवांची शिकार करीत आहेत. याशिवाय ‘फेंगशुई’च्या वाढत्या ट्रेंडमुळे कासवांना हानी पोहोचली आहे. ऑलिव्ह रिडलेची पुनरुत्पादक क्षमता आणि त्यांची संख्या दरवर्षी कमी होत असल्याचे अनेक अभ्यास दाखवत आहेत. पृथ्वीच्या पर्यावरणाचा समतोल राखण्यात कासवे महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, ऑलिव्ह रिडले कासव ही निसर्गाची चमत्कारिक देणगी आहे. त्याचे गूढ अजूनही उकललेले नाही. मानवी निष्काळजीपणामुळे ही प्रजाती धोक्यात आल्यास निसर्गावर काय आपत्ती येऊ शकते, याची कोणालाच कल्पना नाही. मानवजात स्वतःच्या फायद्यासाठी आणि आरामदायी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी वनस्पती आणि प्राण्यांसह निसर्गाचा छळ करत आहे. याचे दुष्परिणाम मानवजातीला हळूहळू जाणवू लागले आहेत. जैवविविधता राखणाऱ्या प्राण्यांचे जीवन हळूहळू धोक्यात येत आहे.

ओडिशाच्या गहिरमाथा सागरी अभयारण्यातील एककुलनासी बेटावर संकटग्रस्त ऑलिव्ह रिडले कासवांनी ३३ वर्षांनंतर पुनरागमन केले आहे. ऑलिव्ह रिडले कासव तीन दशकांहून अधिक काळानंतर सामूहिक घरटे बांधण्यासाठी पुन्हा दिसली आहेत. सहायक वनसंरक्षक मानस दास सांगतात, ओडिशा वन विभागाकडून कासव संवर्धनासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. अशा स्थितीत ऑलिव्ह रिडले कासवांचे आगमन अत्यंत सकारात्मक आहे. याआधी १९९२ मध्ये तीन लाख कासवांनी अंडी घातली होती, तेव्हा त्यांना समुद्रकिनाऱ्यावर शेवटचे पाहिले गेले होते. या बेटावरील नयनरम्य समुद्रकिनाऱ्याची धूप होत असून समुद्रकिनाऱ्याचा आकार कमी होत आहे. तथापि, किनारपट्टीमध्ये वाढ होऊ लागली आहे. अंडी घालण्यासाठी सामूहिकपणे येणाऱ्या कासवांसाठी हे अनुकूल ठरले आहे.

समुद्रकिनाऱ्याची लांबी आठ किलोमीटरने वाढली आहे. एककुलनसी समुद्रकिनाऱ्याची लांबी पूर्वी सुमारे चार किलोमीटर होती. समुद्रकिनाऱ्यावर गाळ परत येण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेनंतर आता ती आठ किलोमीटरपर्यंत वाढली आहे. अलिकडे दोनच दिवसांमध्ये या बीचवर १.७ लाख कासवांचे आगमन झाले. नासी-२ बीचव्यतिरिक्त हा समुद्रकिनारा घर बनवण्याचे एक पसंतीचे ठिकाण म्हणून उदयास आला आहे.

२.६३ लाख कासवे नासी-२ समुद्रकिनाऱ्यावर अंडी घालण्यासाठी आली आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे जगातील सर्व समुद्री कासवांपैकी सर्वात लहान आहे. ही कासवे सामूहिक निवाऱ्यासाठी सर्वात प्रसिद्ध आहेत. ती प्रामुख्याने पॅसिफिक, अटलांटिक आणि हिंदी महासागराच्या उबदार पाण्यात आढळतात. दरवर्षी लाखो कासवे सामूहिक घरे उभारण्यासाठी ओडिशाच्या किनारपट्टीवर येतात. जैवविविधतेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कासवांना आज धोका आहे.

जगात कासवांच्या ३६५ प्रजाती आहेत; त्यापैकी ३४ प्रजाती भारतात तर त्यातील २१ प्रजाती आसाममध्ये आढळतात. पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. जयदित्य पुरकायस्थ हे ‘हेल्प अर्थ’चे सचिव असून कासवांचा अभ्यास आणि संशोधन करीत आहेत. त्यांच्या मते भारतातील राज्यांपैकी आसाममध्ये कासवांची सर्वाधिक विविधता आहे. कासव आणि त्यांच्या अर्ध्या प्रजाती नामशेष होण्याच्या धोक्यावर आहेत. कासव हे जगातील नामशेष होऊ शकणाऱ्या सर्वात धोकादायक प्राणिगटांपैकी एक आहेत. कासवांच्या प्रजाती नष्ट होण्यामागील मुख्य धोक्यांमध्ये अधिवास नष्ट होणे, पाणवठ्यांचा प्राथमिक नाश, मानवाकडून कासवाची अंडी लवकर खाल्ली जाणे, विकास उपक्रमांमुळे नदीकाठच्या अधिवासाचे नुकसान आदी कारणे दिली जातात.

आसाममधील उरलेल्या कासवांना, विशेषतः मंदिराच्या तलावांमध्ये नवा धोका निर्माण झाला आहे. लाल कान असलेल्या स्लाईडर कासवाच्या आक्रमक प्रजातीच्या आगमनामुळे आसाममधील उर्वरित कासवांना धोका वाढला आहे. या कासवांमुळे कासवांच्या इतर प्रजाती नष्ट होत आहेत. कासव पर्यावरणाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, पोषक चक्रात योगदान देतात आणि पर्यावरणीय आरोग्याचे सूचक म्हणून काम करतात.

केवळ जैवविविधतेच्या संवर्धनासाठीच नव्हे, तर परिसंस्थेची शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठीदेखील त्यांच्या लोकसंख्येचे संरक्षण आवश्यक आहे. आसाममधील कासवांच्या दुर्मिळ प्रजातींच्या संवर्धनात मठ महत्त्वाची भूमिका बजावतात. मंदिरांना कासव दान करणे ही धार्मिक परंपरा असल्याने अनेक मंदिरांमध्ये कासवे सुरक्षितपणे जतन करण्यात आली आहेत. लोक कासवांना नामशेष होण्यापासून वाचवू शकतात. त्यासाठी जागरूकता निर्माण झाली पाहिजे आणि शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये कासवांचा तपशीलवार समावेश केला पाहिजे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

